समर्थ महाविद्यालय लाखनी
ग्रंथालय
जि. भंडारा

# समर्थ महाविद्यालय, लाखनी

## अर्चना वार्षिकांक

## वर्ष१९६८-६९

# अर्चना

६८-६९

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| र. भों. नन्हे | भक्तियोग |
| रा. डों. शामकुंवर | भावनांचा अभाव |
| कु. रंजना भुते | बेकारी ही समस्या आहे काय ? |
| ना. बि. बनसकर | सौभाग्य |
| कु. र. ना. रहाटे | साहित्य की महत्ता |
| गु. ना. मेंढे | मोक्षाचे अधिकारी |
| आर. व्ही. ठाकरे | जगावे कसे ? |
| सी. डी. व्यवहारे | आई |
| एच्. एस्. बान्ते | रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ? |
| R. D. Shamkuwar | Dr. Babasaheb Ambedker |
| A. V. Subramanyam | Self Culture |
| एम्. एस्. बुलबुले | देश के प्रति विद्यार्थियों के कर्तव्य |
| केशव बान्ते | उत्तर भारताची सहल |
| तात्याराव काळे | काव्यकुंज, (स्नेहसंमेलनप्रसंगी म्हटलेले) |
| आ. द. भेंडारकर | राखी |
| मारोती गरपडे | तीर्थांचा सागर |
| माधव भुसारी | दोन घडीचा डाव |
| आ. द. भेंडारकर | प्रीत |
| आर. व्ही. ठाकरे | तरुण मने |
| र. डो. शामकुंवर | व्यथा |
| राम घुले | भास |
| लालचंद मेश्राम | असणारच |

| | |
|---|---|
| यादव झलके | जीवन माझे |
| माधव भुसारी | व्यथा |
| रा. बा. रहिमतकर | सूरज दर्शन |
| माधव भुसारी | घायाळलेल्या मनाचे |
| गु. ना. मेंढे | अमुचे नम्र प्रणाम |
| दे. भा. निर्वाण | भारताच्या मुला |
| दयाराम चौधरी | मुंग्यांची दुर्दैवी रांग |
| जनार्दन मने | सांगू कसे कुणा मी ? |
| अभिमन डडेमल | व्यापार, धर्म, शास्त्र आणि कला |
| अनील खेडीकर | भारतात हिंदीचे स्थान |
| कु. उषा देशपांडे | मातृप्रेम |

**आर्थिक व औद्योगिक**

| | |
|---|---|
| प्रा. गो. नी. हडप | भारतातील नियोजन एक सैद्धांतिक परीक्षण |
| मार्तंड हर्षे | प्रचलित शिक्षणपद्धतीतील दोष व उपाय |
| तेजराम भुरे | सहकारी योजना व तिचा उपयोग |
| बी. एस्. तितरमारे | भारताची अन्नसमस्या |
| शा. तु. भोंगाडे | कृषीउत्पादनाचे नियंत्रण |
| मारोती गरपडे | अवमूल्यन आणि भारताची आर्थिक स्थिती |
| परशुराम ब्रह्मपूरकर | शेतीचा कायाकल्प |
| एस्. व्हि. हलमारे | विद्यार्थी आणि राजकारण |

• • •

# काही थोडेसे

सुहृदांनो–

आमच्या महाविद्यालयाच्या वार्षिकांकाच्या वयाला नुकतेच दुसरे वर्ष सुरू झालेले आहे. बालपणात होणाऱ्या चुकांना हे तरी कसे अपवाद ठरू शकेल ? म्हणून ह्याकडे कोणी साहित्याचे टीकास्त्र धरून पाहू नये. ह्याकडे कौतुकाने पाहावे. अशी प्रेमाची सूचना प्रथमच करावीशी वाटते.

ह्यात परिपूर्ण साहित्याच्या कसोटीला उतरणारे साहित्यिक लेख नसले तरी अगदी टाकाऊ स्वरूपाचेही नाहीत. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना देण्याच्या दृष्टीने वार्षिकांकाची योजना आहे.


ग्रामीण विभागातील ग्रामीण महाविद्यालय नि ग्रामीण महाविद्यालयातील ग्रामीण विद्यार्थी आणि म्हणून भाषादेखील ग्रामीण. ह्या दृष्टिकोणातूनच ह्याकडे पाहणे उचित होईल.

वार्षिकांक तयार करताना माझे परमस्नेही जे. एस्. मने, आर. डी. शामकुंवर, एम्. एस्. निर्वाण, एम्. एस्. बुलबुले, ए. टी. कान्हेकर, एम्. डी. सुकरे, आर. एस्. लंजे, डब्ल्यू. टी. ब्राह्मणकर, वाय. एस्. नाईक ह्यांचे लाभलेले सहकार्य उल्लेखनीय आहे.

सर्वश्री प्रा० प्रभाकरराव दाढी, प्रा० मनोहरराव हडप, प्रा० कृष्णराव लाखनकर आणि प्रा० सुब्रमण्यम ह्यांच्या मार्गदर्शनाचा नि सक्रिय सहकार्याचा उल्लेख करणे औपचारिकच ठरेल.

**र. भों. नन्हे**
संपादक

# केंद्रीय शिक्षण मंत्री डॉ. त्रिगुण सेन यांची समर्थ महाविद्यालयाला भेट



राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष **मा. रामभाऊ गायकवाड** मा. शिक्षण मंत्र्यांचे प्रवेशद्वारावर स्वागत करीत असतांना



**महाविद्यालयाच्या यशाचा मानकरी**

**श्री. सदाशिव मुन्शी झलके**, बी. ए. प्रथम वर्ष ह्या परीक्षेत नागपूर विद्यापीठात इतिहास विषयात सर्वोच्च गुण प्राप्त करून डॉ. हिरालाल पारितोषिकाचा मानकरी ठरला आहे.

# नियोजन मंडळ १९६८–१९६९ PLANNING FORUM



रघुनाथ नऱ्हे, उपाध्यक्ष

प्रा. गो. नि. हडप, अध्यक्ष

म. त्र्यं. देशपांडे, प्राचार्य

हरिश्चंद्र चोले, कार्यवाह

जनार्दन मने, कार्यालयमंत्री

१. शामराव भोंगाडे, सदस्य २. पंचभाई सदस्य, ३. हटवार, सदस्य
४. कु. तुलसा भैसारे, सदस्य ५. चांदेवार सदस्य ६. रुखमोडे, सदस्य

# समर्थ महाविद्यालय लाखनी पंचवार्षिक प्रगतीचा अहवाल

आज आमच्या महाविद्यालयाचा जो वृक्ष उभा आहे त्याची स्थापना ११ जुलै १९६४ ला करण्यात आली. याचे सारे श्रेय राज्य पुरस्कार विजेते मा. बापुसाहेब लाखनीकर त्यांचे सहकारी आणि इकडील ग्रामीण जनता यांनाच आहे. आमच्या महाविद्यालयात कला आणि वाणिज्य ह्या दोन्ही शाखा एकाच वेळी अवघ्या ९२ विद्यार्थ्यांसह सुरुवात केल्या गेल्या. आज महाविद्यालयात ६११ विद्यार्थी ज्ञानग्रहण करीत आहेत. अधिकारी वर्ग, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी ह्या साऱ्यांच्या सहकार्याने महाविद्यालय आज प्रगतिपथावर चढत आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थी, प्राध्यापकांचा प्रगती-आढावा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

| वर्ष | विद्यार्थी | प्राध्यापक | कर्मचारी |
|---|---|---|---|
| १९६४–६५ | ९२ | ६ | ३ |
| १९६५–६६ | २५७ | ६ | ४ |
| १९६६–६७ | ३५९ | ११ | ५ |
| १९६७–६८ | ४९९ | १३ | ११ |
| १९६८–६९ | ६११ | १५ | १३ |

सांगितल्याप्रमाणे महाविद्यालयाचा विस्तार दिवसेंदिवस वाढत आहे. दरवर्षी येथील निकाल जिल्ह्यात सगळ्यात चांगले लागतात. महाविद्यालयाची अन्त्य बी. ए. ची प्रथम तुकडी १७ विद्यार्थ्यांसह मागच्या वर्षी म्हणजे १९६७–६८ या शैक्षणिकसत्रात परीक्षेला बसली आणि तिचा निकालही चांगला म्हणजे ४१% प्रतिशत लागला. यावर्षी बी. कॉम्. अन्त्य ची प्रथम तुकडी परीक्षेला बसेल. अन्त्य वर्गात यंदा बी. ए. त ३१ विद्यार्थी आणि बी. कॉम्. १७ विद्यार्थी आहेत. महाविद्यालयातील ६११ ह्या विद्यार्थीसंख्येत ३५ विद्यार्थिनींचीही संख्या आहे. सध्या महाविद्यालयाला स्वतःची इमारत आहे. नवीन इमारतीचे काम कै. चिटणवीस यांच्याकडून देणगीदाखल मिळालेल्या २ एकर जागेवर अद्यावत पद्धतीने तयार केलेल्या नकाशाच्या आधारावर सुरू आहे. दोनचार वर्षातच महाविद्यालयाची नवीन, भव्य, इमारत आपल्या नजरेस पडेल. विद्यापीठाने विद्यार्थी वर्गांच्या सोयींच्या दृष्टीने लाखनीला परीक्षेचे केन्द्र दिलेले आहे.

महाविद्यालयाचे एक समृद्ध उत्तम ग्रंथालय आहे. प्रशिक्षित ग्रंथपाल आहेत. ग्रंथालयात ४५ हजार रुपयांच्या किंमतीची पुस्तके असून पुस्तकांची संख्या अंदाजे ४३ हजारावर आहे. या ग्रंथालयात कला आणि वाणिज्य या शाखांना लागणारे उत्तम ग्रंथ, ज्ञानकोष, विश्व कोष, समग्र ग्रंथ, चरित्रे आणि भरपूर मनोरंजन देणारे ग्रंथ आहेत. आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात महाराष्ट्रातील अग्रगण्य वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके यांची आयात होते. वाचनालयाच्या पुस्तकांची देवाणघेवाण अगदी तंत्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थेशीर पार पाडल्या जाते. आमचे प्राध्यापक आम्हाला वाचनाच्या बाबतीत नेहमी मार्गदर्शन करीत असतात. एन. सी. सी. आमच्या महाविद्यालयात १९६४ पासूनच सुरू झालेली आहे. यंदा जरी एन. सी. सी. आवश्यक नसली तरी आमच्या विद्यार्थी-वर्गाकडून एन. सी. सी.

ला चांगलाच प्रतिसाद मिळालेला आहे. १९६६ ला झालेल्या छात्र-सैन्य-शिबिरात आमच्या महाविद्यालयाला प्रथम क्रमाकांचे बक्षिस मिळाले. छात्रसैनिकांना प्रशिक्षण देऊन प्रात्यक्षिके दाखविली जातात, तसेच त्यांच्याकडून ती करूनही घेतली जातात. महाविद्यालयाच्या एन. सी. सी. विभागाची माहिती खालील प्रमाणे.

| वर्ष | छात्र संख्या | प्रशिक्षक | अधिकारी |
|---|---|---|---|
| १९६४–६५ | ५० | १ | – |
| १९६५–६६ | १९० | १ | – |
| १९६६–६७ | १९५ | ३ | १ |
| १९६७–६८ | ७५ | ३ | १ |
| १९६८–६९ | १२५* | २ | १ |

*ऐच्छिक असूनही

महाविद्यालयात क्रीडाविभाग हा एक वेगळा विभाग ठेवलेला आहे. बौद्धिक वाढीबरोबर विद्यार्थ्यांच्या शारीरिक गरजांकडेही लक्ष पुरविले जाते. त्यांना हुतूतू, खो खो, हॉली बाल, भाला फेक, गोळा फेक वगैरेचे प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थीनींसाठीही महाविद्यालयात खेळांचे सामान आहे. परंतु इकडच्या ग्रामीण वातावरणामुळे इकडील विद्यार्थीनींकडून खेळविभागाला विशेष प्रतिसाद मिळत नाही. दरवर्षी आमचे महाविद्यालय आंतर महाविद्यालयीन, हुतूतू, खो खो, हॉली बाल वगैरे सामन्यात भाग घेत असते. मागच्या वर्षी आमच्या महाविद्यालयातील हुतूतू चमूने विद्यापीठातून प्रथम क्रमांक थोडचानेच गमावला. क्रीडाविभागासाठी एक प्रशिक्षित क्रीडाशिक्षक नेमलेले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना एन. सी. सी. नाही अशांना शारीरिक शिक्षण देण्याचे कार्य ह्या क्रीडाशिक्षकाकडूनच पार पाडल्या जाते.

सध्याचे युग योजनेचे मानल्या जाते. त्यामुळे देशातील नियोजित विकासाची कल्पना विद्यार्थ्याला यावी म्हणून आमच्या महाविद्यालयात १९६६ पासूनच नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली यावर्षी नियोजन मंडळाचे उद्घाटन मा. पां. पु. धर्माधिकारी, जनरल मॅनेजर, द भंडारा डिस्ट्रिक को-ऑपरेटिव्ह Central Bank भंडारा यांचे हस्ते झाले. उद्घाटन प्रसंगीच त्यांचे नियोजनावर एक चांगले दीड दोन तासांचे भाषण झाले. नियोजन मंडळातर्फे संबंधित विषयावर माहिती आणि समंक संग्रहित केल्या जातात. मागच्या वर्षी मंडळाने लाखनी भागातील बिडीमजूर आणि त्यांच्या समस्या यावर विचार केला होता. यावर्षीही Study Circules, Case studies, Lecturs Series, Essay Competation, Paper Readings वगैरे कार्यक्रम हाती घेतले आहेत. मागच्या वर्षी बऱ्याच विद्यार्थ्यांनी त्यांच्या अल्पस्वल्प प्रयत्नांनी अर्थशास्त्रीय, वाणिज्य, ऐतिहासिक दृष्टिकोनांतून कविता, लेख, तयार केले होते आणि त्याच वर्षी पासून सुरू झालेल्या छापील वार्षिकांकात त्यांना वाव मिळाला.

बहि:शाल योजनेच्या आधारे दरवर्षी महाविद्यालयात प्रसंगानुरूप कार्यक्रम साजरे केले जातात. मोठमोठचा व्यक्तींच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजऱ्या केल्या जातात. गतवर्षीच्या उन्हाळचात कोल्हापुरला जी प्राचार्यांची परिषद भरली होती त्या परिषदेच्या मार्गदर्शनानुसार यावर्षी युवककल्याणयोजना, महाविद्यालयातच श्रमदान, ग्रंथपेढी इत्यादी उपक्रम यशस्वीरीत्या हाती घेऊन पार पाडण्यात आले. हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते. यावर्षी येत्या दिवाळीच्या सुट्टीत लाखोटीला एक श्रमदान शिबिर आयोजित केले आहे. त्यासाठी विद्यार्थीवर्ग योग्य प्रतिसाद देईल अशी खात्री आहे. केवळ विद्यार्थीच श्रमदानकार्यात भाग घेत नाहीत तर त्यांच्या सोबतीला प्राचार्य आणि प्राध्यापक असतातच. दरवर्षीप्रमाणे यंदाही महाविद्यालयाची सहल दिल्लीला जात आहे.

यंदा छात्रसंघाची निवडणूक मोठ्या-उत्साहाने पार पाडण्यांत आली. विद्यार्थीवर्गाशी उमेदवारांची प्रत्यक्ष भेट, प्रचारपत्रके ध्वनिक्षेपकाद्वारे प्रचार वगैरे कार्यक्रमांनी तर निवडणुकीला आगळेच स्वरूप आले होते. तथापी निवडणुकीत गलीच्छ वातावरण मात्र शिरले नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. जणु काही राजकीय पक्षांच्या निवडणुकीचे स्वरूप ह्या आमच्या महाविद्यालयातील छात्रसंघनिवडणुकीत आल्यासारखे वाटत होते.

एकंदरीत विचार करता आमच्या महाविद्यालयात ग्रामीण शिक्षणासोबतच राष्ट्रीय भावना, समाजप्रेम, अल्प राजकारण आदींचा समन्वय घातल्या गेला आहे.

ग्रामीण महाविद्यालयातील विद्यार्थींना प्रामाणिकपणा, अभ्यासमग्नता, हुशारी, व मेहनत करण्याची क्षमता याचबरोबर शहरी उत्कृष्ट मार्गदर्शन, आधुनिक सोयी उपलब्ध झाल्या तर आपले ग्रामीण महाविद्यालय इतर शहरी महाविद्यालयांपेक्षा सरस ठरेल यात शंका नाही.

---

# विश्व रिकार्ड

(१) विश्व का सबसे शक्तिशाली रडार अमरिकी सेना के पास है जो छः मील दूर पुरुष और स्त्री के चलने के अंतर का पता लगा लेता है !

(२) विश्व की सबसे बडी नदी मिस्त्र की नील नदी है जिसकी लंबाई ४,१४५ मील है।

(३) विश्व का सबसे बडा द्वीप ग्रीनलँड है जिस का क्षेत्रफल लगभग ८,४०,४०० वर्ग मील है।

(४) विश्व का सबसे भारी चुंबक रुस में है, जिस का वजन ४०,३२० टन है।

(५) विश्व का सबसे लंबा किला सीरिया स्थित ऐलम्पो शहर में है। इस की चारो तरफ की दिवार १,२३० फूट लंबी है व ७७७ फूट चौडी है।

(६) विश्व का सबसे लंबा फुटपाथ केलिफोर्निया स्टेट ट्रेल है जो ३,००० मील लंबा है।

(७) विश्व की सबसे अधिक चौडी सडक ब्राजील की राजधानी ब्रेसीलीया में मोनुमेंटल एक्सिस नाम की है जिसकी चौडाई डेढ मील है।

(८) विश्व का सबसे अधिक व्यस्त सडक लास रिजेल्स में हार्बर फ्रिवे है जिस पर करिबन २,१९,००० गाडियाँ रोज गुजरती है।

(९) उडीसा की महानदी पर निर्मित हिराकुंड बांध विश्व का सबसे लंबा बांध है !

संग्राहक : एम. एस. बुलबुले.
बी. कॉम. उपान्त्य

# भक्तियोग

र. भों. नन्हे,
अन्त्य वाङमयस्नातक (B. A. III)

गीतेने ज्ञान, कर्म आणि भक्ती ह्या मोक्षमार्गांचा समन्वय उच्च भूमिकेवरून केलेला आहे. गीतेत जरी कर्म, ज्ञान आणि भक्ती हे विषय आलेले असले तरी ज्याप्रमाणे कपड्याला आतून अस्तर लावलेले असते, तसे या सर्वांचा योग साधण्यासाठी 'भक्तीचे' अथवा 'ईश्वर-निष्ठेचे' अस्तर आवश्यक मानले आहे. नारदांनी आपल्या भक्तिसूत्रात भक्तीची व्याख्या 'सात्व-स्मिन् परमप्रेमरूपा' अशी देऊन पुढे त्यांनी 'अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपं' असे लक्षण सांगितलेले आहे. परंतु त्या प्रेमाचे वर्णन त्यांनी 'गुणरहितं, कामरहितं प्रतिक्षणवर्धमानं अविच्छिन्नं, सूक्ष्मतरं अनुभवरूपम्' या सूत्रात केले आहे. याशिवाय प्रेमाचे 'अनन्यता' हे एक मोठे लक्षण मानले आहे व नारदांनीही त्याची व्याख्या 'अन्या-श्रयाणां त्यागो हि अनन्यता ।' अशी केली आहे. ही सर्व प्रमुख लक्षणे खऱ्या ज्ञानी भक्तांच्या ठिकाणीच संभवतात.

भक्तीचे मुख्य लक्षण 'अनन्यता' म्हणजे 'स्वतःस देवाला जीवें मनें आंगें विकणें' होय. त्याचप्रमाणे भक्ती ही प्रतिक्षण वर्धमानत्व पावणारी आहे. भक्तीत प्रेम हे मुख्य आहे. पान, फूल, फळ हे भजण्याचे नुसते निमित्त आहे. ह्यांच्या बुडाशी जर प्रेम नसेल तर ते बाह्योप-चार गौण ठरतात. 'देव भावाचा भुकेला । दास सेवकाचा झाला ॥' देवाला शुद्ध अंतः-करणाची भक्ती हवी. भक्तियुक्त शुद्ध अंतः-करणाने देवाला पोपटीचा नैवेद्यदेखील चालतो. ('भाव भक्तीचा आणि नैवेद्य पोपटीचा ।') भक्तियोगात शुद्ध अंतःकरण हवे. बाह्योपचारां-पैकी काही एक अर्पण न करता आणि अंतःकरण-पूर्वक भक्ती करणाऱ्या भागवतांना ईशप्राप्ती होते. परंतु मणांनी बेलभंडार वाहणाऱ्या आणि लाखो रुपये किंमतीचे जडजवाहीर अर्पण कर-णाऱ्या लोकांना ईशप्राप्ती कधीही शक्य झालेली नाही, नव्हे शक्यच नाही.

देवभक्त म्हणण्याकरिता तशी भक्ती देखील हवी. बाह्योपचारांना काहीएक महत्त्व नाही. 'भगवे तरी श्वान सहज वेष त्याचा' किंवा 'वाढवुनीं जटा फिरे दाही दिशा' अशांची तुकारामाने जंबुकाबरोबर केलेली तुलना योग्य नाही काय ? 'दाढी डोई मुंडी मुंडुनिया सर्व' अशा वेषाला देखील काहीएक महत्त्व नाही. अंतःकरणपूर्वक भक्ती नसलेल्यांची 'मोलें घातले रडाया । नाही असूं नाही माया' अशीच स्थिती होणार, यात काहीही शंका नाही. केवळ बाह्यो-पचारांना महत्त्व देणाऱ्या आणि अंतःकरणात खरी भक्ती नसणाऱ्यांचा तुकारामांनी 'साधक जाले कळी । गुरुगुडीची लांब नळी' असा उप-हास केला आहे. किंवा अशांचा 'जाले लोभाचें मांजर। भीक मागे दारोदार' अशा तीव्र शब्दात निषेध केला आहे. बाह्योपचारांना महत्त्व देणाऱ्यांचा समर्थांनी देखील 'तेथे देव कैंचा मूर्खा । भ्रांति पाडिली' असा निषेध केला आहे.

देवाशी सख्यत्व जोडण्यासाठी भक्ति-मार्गाचाच अवलंब आवश्यक आहे. अर्थात भक्तीचे देखील प्रकार असतात. निर्गुणाचे उपा-सक आणि सगुणाचे उपासक, हे दोन्ही उपासक

शेवटी देवालाच जाऊन मिळतात. भक्तीचा कोणताही मार्ग असो, त्या मार्गाने ईश्वराप्रत जाता येते हे निश्चित.

'आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥'

या वचनाप्रमाणे भागवत–मग तो कसलीही, कसल्याही उपास्यदैवतांची उपासना करणारा असो–तो मात्र आकाशातून पडणारे पाणी जसे ओहळाच्या, नदीच्या स्वरूपाने शेवटी सागराला जाऊन मिळते–तसा ईश्वराप्रत जाऊन पोहचतो आणि ईश्वराची भक्ती करणारा साधक व भक्त परमेश्वराला अत्यंत प्रिय असतो. परमेश्वर भक्ताची इच्छा पूर्ण करतो. ईश्वरानीच 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्' असे म्हटले आहे. परमेश्वराला अनुसरलेल्या भक्ताची सर्व चिंता तोच वाहत असतो. आणि परमेश्वराने तर

'अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम् ॥'

अशी स्पष्ट हमीच दिली आहे. भक्तानें फक्त परमेश्वराला अनुसरावे एवढेच एक कर्तव्य त्याचेकडे आहे. परंतु हे अनुसरण देखील आत्मैकनिष्ठ असावे. कारण–

'पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥'

असे आहे. परमेश्वराची भक्ती करणारा भक्त सिद्धीस पात्र होतोच अशी परमेश्वराने–सध्याच्या भाषेत बोलायचे झाल्यास–'गॅरंटी' दिलेली आहे.

परमेश्वराला त्याचा भक्त अत्यंत प्रिय असतो. तो त्याच्या जीवाहूनही प्रिय असतो. इतकेच नव्हे तर–

'ऐसे जे मत्पर । उपासिति निरंतर
ध्यानमीसें घर । माझेंचि जाले ॥'

असे परमेश्वराने स्वतः सांगितले आहे. भक्ताने जर अनन्यभक्तीने जीव व शरीर परमेश्वराला विकले तर 'तेयां काइयेक सांगें । जें मी न करी' अशी सहजस्थिती प्राप्त होते. अनुसरलेल्या भक्तांना संसाराची कसलीही चिंता उरत नाही.

'माझेया आणि भक्तां । सवंसारिंची चिंता ।
काइ समर्थाची कांता । भूकेतें शोची ॥'

म्हणजे भक्ताला संसाराची काळजी कशाला ? श्रीमंताची बायको भूक लागली म्हणून कधी रडेल काय ? म्हणून भगवंत भक्ताची प्रापंचिक अडचण दूर करतात व त्याच्या घरची कामंही करतात. परमेश्वराला उच्च, नीच हे काहीच नसते. असा हा परमेश्वर 'चर्म रंगु लागे रोहिदासासंगे । कबीराचे मागे शेले विणी'. त्याचप्रमाणे 'सजन कसाया विकूं लागे मांस । माळचा सांवत्यास खुरपू लागे'. एवढेच नव्हे तर 'नरहरी सोनारा घडूं फुंकूं लागे । चोखामेळ्यासंगे ढोरे ओढी'. असा हा परमेश्वर 'नामयाच्या जनीसवे वेची शेणी । धर्माघरीं पाणी वाहे झाडी'. अर्जुनाच्या रथाचं सारथ्य करणारा व त्याची घोडी धुणारा हा परमेश्वर 'भक्षी पोहे प्रिती सुदाम्याचे'. 'गवळियांचे घरी अंगें गाई वळी । द्वारपाळ बळीद्वारीं झाला'. येकोबाचे ऋण फेडणारा हा ऋषीकेशी 'अंबऋषीचे सोसी गर्भवास'. मीराबाईसाठी विष प्राशन केले तर दामाजीचा पाडेवार झाला. 'घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी त्या मेहत्याची अंगें भरी ॥ दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्या घरीं रक्षी प्रल्हादासी ॥' आणि पंढरीचा पांडुरंग–परमेश्वर–पुंडलिकासाठी अजूनही तिष्ठत आहे. भगवंत भक्ताशी नाते देखील जोडायला मागंपुढं पाहत नसतात.

'चोखोबाची बहीण झाला सारंगधर.' असं देखील केवळ भक्तीच्यापायी घडू शकते. भक्तीमुळेच परमेश्वर सेवकाच्या पादुका देखील शिरीं धारण करण्यास लाजत नाही. भक्तीमुळेच सत्यभामा परमेश्वराला दान करू शकते.

एकनाथमहाराजांच्या घरी श्रीखंडयाच्या रूपाने भगवंताने पाणी वाहिले व जनाबाईची लुगडीही धुतली.

'जनी जाय पाणियासी । मागे धावे हृषीकेशी ।।'

असे देखील परमेश्वराला करावे लागले. गोरोबा कुंभाराची मडकीं परमेश्वरालाच करावी लागलीं. इतकंच नव्हे तर गोरोबाचं मूल, गोरोबाचे हात देखील परमेश्वरच परत देतो. भक्तासाठी परमेश्वर काहीही करतो.

'भक्तासाठी तो जगजेठी बसुनि माळचावर ।
पाखरें उडवी सारंगधर ।।'

कारण खरे भगवद्भक्त हे आपल्या प्रपंचाविषयी उदासच असतात. एवढयाकरिता भगवंताला त्यांची अधिक काळजी घ्यावी लागते. अशा भक्तांना भगवंत 'तैसे ते माझे । कलत्र ऐसे जाणिजे ।।' असे म्हणतात. आणि त्यांच्यासाठी करावयाच्या कोणत्याही कृत्याची लाज वाटत नाही. राजसूय यज्ञामध्ये परमेश्वराने स्वतः उष्टीं काढण्याचे काम केले व भक्ताकरिता हलके अवतारही घेतले. 'आम्हांसाठी अवतार। मत्स्यकूर्मादि सूकर' किंवा 'तुका म्हणे अर्धनारी । ऐसी धरी रुपडी ।।' प्रल्हादाकरिता नृसिंहाचा अवतार घेतला. असा हा परमेश्वर-- 'साधावया भक्तिकाज । नाही लाज हा धरीत।।' वास्तविक जन्ममरणासारखी लाज दुसरी कोणतीही नाही. परंतु भक्ताकरिता देवांनी ती पत्करली आणि गर्भवास सोसले. 'भक्ताकारणें येणें घेतलीसे आळी । दहा गर्भवास सोशी वनमाळी ' ज्यावेळेस पत्नी ही आपले सर्वस्व पतीला अर्पण करते त्या वेळेपासूनच त्याला तिची सर्वप्रकारे काळजी लागते. त्याप्रमाणेच ज्यावेळेस भक्त देवाला आपले कायावाचामन अर्पण करतो. म्हणजे त्याच्याशी अनन्य होतो, त्या वेळेपासूनच देव त्याची सर्व काळजी वाहतात. 'ते एकवटुनि जिथे क्षणीं । अनुसरले गा माझिये वाहणी । तेव्हांचि तयांची चितवणी । मजचि पडली ।।' भक्ताचा देवाला इतका छंद असतो की, त्याचे कल्याण व्हावे म्हणून देव स्वतः त्याच्यापुढे ज्ञानरूपी मशाल घेऊन चालतात. पाणी ज्याप्रमाणे माळचाच्या सत्तेत विलीन होते. त्याचप्रमाणे मनुष्याने ईश्वराच्या सत्तेत विलीन होऊन राहावे.

भगवंत भक्तांच्या अंतःकरणातच वास करीत असतात. ते इतरत्र कुठेही नसतात.

'मद्भक्ताः यत्र गायन्ति । तत्र तिष्ठामि नारद ।।'

ईश्वर पाण्यात नाही, ईश्वर दगडात नाही, ईश्वर प्रासादामध्ये वा मंदिरामध्ये नाही, तर तो भक्ताच्या भक्तियुक्त शुद्ध अंतःकरणात आहे. देव भक्तांचे दुःख सहन करतो व त्यांना आपले सुख देतो.

परमेश्वर हा भक्त कोणत्या जातीचा आहे, किती शिकला आहे किंवा किती वयाचा आहे हे काही पाहत नसतो. त्याला फक्त भक्ती हवी असते.

'देव भावाचा भुकेला । दास सेवकाचा झाला ।।'

परमेश्वर प्राप्तीच्या मार्गात भक्तीचे स्थान श्रेष्ठ नि सर्वप्रथम आहे. देवाची प्राप्ती ही भक्तीवर अवलंबून आहे. ज्या प्रकारची भक्ती असेल त्याचप्रकारे देव प्राप्त होईल. अर्थात् देव एकच आहे. देव अनेक नाहीतच. शुद्ध अंतःकरणयुक्त नि निष्ठापूर्वक भक्तीला महत्त्व आहे. भक्ताचे प्राणावर जरी बेतत असेल तरीही त्याने भगवन्नाम सोडू नये. गंधमादनाच्या रामभक्तीसारखी भक्ती हवी. भक्तीमुळे अशक्य असा परमेश्वर प्राप्त होतो. म्हणून भक्तीची कास धरावी आणि परमेश्वरच माझा सर्वकाही आहे असा दृढ विश्वास ठेवावा. 'रामा तू माझा यजमान' ही अनन्यवृत्ती असायला हवी

'माता रामो मत्पिता रामचन्द्रः
स्वामी रामो मत्सखा रामचन्द्रः ।'

अशी वृत्ती ईश्वराचे ठिकाणी ठेवावी. इतकेच नव्हे तर--

'सर्वस्वं मे रामचन्द्रो दयालुः
नान्यं जाने नैव जाने न जाने ।'

अशी जबर निष्ठा हवी.

व्यवहारातील प्रत्येक बाबीला भक्तीचे अधिष्ठान असायला पाहिजे. भक्तीविण जे जे आहे ते 'बोखटे' आहे असे जाणावे. इतकेच नव्हे तर काव्याला देखील भक्तीचा आधार असावा.
'भक्तिवीण जे कवन ते जाणावे श्वानाचे वमन ।

असे समर्थ सांगतात. भगवत्प्राप्तीचे पुष्कळ मार्ग आहेत, परंतु त्या सर्वांत भगवन्नाम हा सोपा व सर्वांना आचरण्यास सुलभ असा मार्ग आहे. भगवन्नामामध्ये काही अडचणी नाहीत. भक्तीकरिता सर्व संसारत्याग केलाच पाहिजे, असे नाही. स्वकर्मरत होऊन देखील ईश्वरभक्ती होते. किंबहुना स्वकर्मच म्हणजे ईश्वर 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धि लभते नरः' आणि म्हणूनच सांवता माळी 'कांदा भाजी मुळा । विठ्ठल माझा सावळा ।।'' असे म्हणतो. सेना न्हावी देखील 'आम्ही वारिक वारिक । करू हजामत बारिक ।।' असे म्हणून त्यातच ईश्वर मानतो. परंतु भोक्ता असून अभोक्ता राहण्याची वृत्ती असायला हवी. आणि केलेल्या सर्व कर्माची मोहर भगवंताकडे लावावी, फलाची अपेक्षा असू नये.

ह्या भक्तीमुळेच गजेंद्र मोक्षाप्रत पोहचू शकला. ह्याच भक्तीमुळे वाल्ह्याचा वाल्मिकी झाला. ह्याच भक्तीमुळे आसुरी वृत्तीच्या असलेल्या रावणाचा व कंसाचा देखील उद्धार झाला. ह्याच भक्तीमुळे अहिल्या शिळा राघवाने उद्धरली. ह्याच भक्तीमुळे अजामिळ, अघासुर, बकी, पिंगलादिक प्रभृतींचा उद्धार झाला. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात–

'हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा
गोड हे चरण सेवा तुझी ।
करुनी उचित देई हेंचि दान
आवडे कीर्तन नाम तुझे' हीच मागणी

मागितलेली आहे.

'मोक्ष तुमचा देवा । तुम्ही दुर्लभ तो ठेवा
मज भक्तीची आवडी । नाही अंतरी ते गोडी ।।'

असे तुकाराम महाराजांनी भक्तीचे माहात्म्य स्पष्ट केले आहे आणि भक्ती करीत असतांना 'देह पडो या चिंतने । विठ्ठल नामसंकीर्तने' अशी वृत्ती असावी.

समग्र ऐश्वर्य, धर्म, यश, श्री. वैराग्य व मोक्ष या सहांना भग अशी संज्ञा असून, ही ज्याच्या ठायीं निरंतर पूर्णपणे वसत असतात त्यास 'भगवान्' म्हणतात. मग अशा भगवंताची भक्ती मानवाने कां करू नये बरे !

---

जितक्या प्रमाणात आशा कमी तितक्या प्रमाणात सुख अधिक असते. (आशा हि परमं दुःखम् नैराश्यं परमं सुखम्)

**एकनाथी भागवत**

* * * *

सामान्य मनुष्य स्वार्थी असेल पण त्याला परमार्थही कळतो. व्यवहारात मनुष्य मनुष्याचा शत्रू असेल, पण तो त्याचा मित्रही होऊ शकतो. माणसे केवळ युद्ध करतात असे नाही तर ती एकमेकावर प्रेम करू शकतात. या जगात साम्राज्याच्या विस्ताराइतकाच भूतदयेचा विस्तारही अशक्य नाही.

# भावनांचा अभाव

र. डो. शामकुंवर
बी. कॉम (उपान्त्य)

कसल्याही परिस्थितीत यंदाच्या महाविद्यालयाच्या वार्षिकांकात एखादा चांगला, कलात्मक लेख द्यावयाचा, मी निर्धार केला. तो असा फक्कड लिहावयाचा की चार लेखांत उठून आणि दर्जेदार दिसेल. आणि मग जर्वजण आपले कौतुक करून आपली पाठ थोपटतील.याविषयीची कल्पना मी माझ्या वर्गमित्रांना सुद्धा दिली होती. आमच्या कॉलेज कुमारांनी 'T, ह्या आंग्लभाषीय अक्षराचा 'तीनदां, इतका उपयोग करून नावलौकिक मिळविला आहे की, त्याची कल्पनाच केलेली बरी. त्यांच्या बाह्य स्थितीवरून प्रथम T=टेरिलीन, टेरिकाट वगैरे; द्वितीय T=ट्रान्झीस्टर आणि तृतीय T=टर्रेबाजी, टिंगलबाजी म्हणजे कॉलेजमधील कुमारांचे प्रमुख अंग बनलेले आहे. तरी जवळच्या एका मित्राने टोमणा मारलाच की, एखाद्या लेखाची 'True copy' करून नावलौकिक करण्यास पात्र ठरशील काय ? दुसऱ्या मित्राने त्याला साथ पण दिली.

एवढेच नव्हे तर प्राध्यापकांची सुद्धा टिंगल करण्यात महाविद्यालयीन विद्यार्थी मागेपुढे पाहत नाहीत. एके दिवशी तर एका विद्यार्थ्याने स्पष्ट आणि शुद्ध टिंगल करताना प्राध्यापक कसा असावा ? त्याचा त्याने खालील प्रकारे उलगडा केला. प्रा=प्रामाणिक, ध्या=ध्यानस्थ, प=पगारी, क=करमणूक करणारा. अर्थात ही सुद्धा 'True copy' असावी म्हणून तिसऱ्याने होकार दिला. अशा प्रकारे, कॉलेजच्या वार्षिकांकात 'True copy, सारखे चोरटे व्यवसाय सुरू असले आणि ते बहुतांशी सत्य असले तरी कुणाच्या लिखाणात उद्याच्या साहित्यिक यशाची पूर्वचिन्हे दिसतील, कुणाच्या लिखाणात नुसतेच उसासे दिसले तरी पण त्यांनीच खरी तळमळ पोटी बाळगून लिहिले हे स्पष्ट होईल.

जीवन व साहित्य ह्यांचा अन्योन्य संबंध आहे. गुलाबाच्या फुलाला सुवासाशिवाय महत्त्व नाही तसे जीवनाला साहित्याशिवाय अर्थ नाही. आणि हे सत्य आहे की, 'जीवन हे विचार–भावना, अनुभव आणि श्रद्धा ह्यांचे घनफळ आहे. मला वाटते की, टिंगल व टर्रेबाजी करण्यामधून विचार, कल्पना आणि भावना यांना वाव मिळू शकतो. साहित्याकरिता कल्पना, भावना आणि अनुभव ह्यांची नितांत गरज आहे. परंतु आजच्या विद्यार्थ्याला टिंगल करणे सुद्धा जमत नसल्याने त्यांच्यात भावनांचा अभाव आहे. अनेक विद्यार्थी 'जैसे थे' आणि 'मम' बसण्यापेक्षा आपली स्थिती विस्तृतपणे वाढविण्यास अपात्र ठरतात. अरे, पण मी माझ्या 'कलात्मक लेखाविषयी' न सांगता फारच दूर गेलो. चूक झाली. क्षमा करा. हं !

रविवार दिवस होता. लिखाणाचे साहित्य घेऊन बसलो देखील; पण माझे बसणे एखाद्या कुरूप स्त्रीने केलेल्या शृंगाराप्रमाणे निरर्थक ठरले. मला काहीच सुचेनासे झाले.

काहीच न सुचले की लेखक नवकथा आणि नवकविता करतात असे मला प्रामाणिकपणे वाटते. म्हणूनच साहजिकपणे मी तिकडे वळलो. पण छेः तेही मला जमेना. नंतर मला वाटले जाऊ द्या त्या नवकथा आणि नवकविता. यापेक्षा सर्वांत सोपी आणि सर्वत्र आढळणारी

प्रेमकथाच लिहावी. अचानक प्रियकर प्रेयसीची भेट घालून द्यावी, नंतर एखादे आलिंगन, अर्धे-मुर्धे चुंबन आणि शेवटी बाप 'आडवा' आला आणि म्हणून प्रेमभंग. डोक्याला ताण नको आणि नको त्या नवकथेच्या कटकटी. आपले सोप्यात काम भागते आणि मार्ग तरी किती सोपा आणि सरळ.

पण मला तेही जमेना. आणि जमेल तरी कसे? माझा आणि प्रेमाचा संबंध म्हणजे छत्तीसचा आकडा. प्रेम म्हणे महाविद्यालयाच्या कक्षेत येते. आता तर कुठे माझे महाविद्यालयाचे दर्शन घेऊन दोन वर्षे पूर्ण झाली होती. छेः असे म्हणणे निरर्थक आहे. प्रेमकथा लिहिण्यासाठी प्रेम करावयास पाहिजेच असे मला म्हणावयाचे नाही. पण आपली कथा थोडीतरी वास्तवाला धरून नको का व्हायला?

नंतर मी तर अगदी विचारसागरात बुडून गेलो. कथांचे जाळेच्या जाळे माझ्या डोळ्यांपुढे उभे राहिले. मग वाटले सर्वजण कथाच देतील छापायला आणि आपल्या कथेची नुसतीच व्यथा होईल. दर्जेदार तर नाहीच नाही पण चार लेखांत श्रेष्ठ ठरायला देवाचा धावा करावा लागेल. आणि शेवटी निराशेखेरीज काहीच पदरात पडणार नाही. कारण वास्तवता खूपच असणार आमच्या कथेत.

विचारसागरात बुडत असताना मी अगदी तळाशी चाललो होतो. पण एकदम मला वाटले की एखादा सामाजिक व विद्वत्तापूर्ण असा लेख द्यावा. त्यामुळे आपल्या लेखाला साहजिकच किंमत येईल आणि आपल्याला पण...

चार उत्तम असणाऱ्या लेखांत देखील आपला लेख नमुनेदार आणि फक्कड ठरेल. सूर्यप्रकाशाच्या उगवत्या किरणांमुळे प्रकाश जसा वाढतो तसा माझा आनंद सामाजिक लेखाच्या नुसत्या कल्पनेमुळे वाढत होता. छोटयाशा पोटॅशियम परमँगनेटच्या खड्याने पाणी लाल करावे तसे नुसत्या कल्पनेने माझे मन अगदी रंगून गेले. हर्षाला नवी पानेफुले येऊन मन बहरलेल्या नव्या आनंदाच्या जोमाने डोलू लागले. मग काय पेन दोनदा झटकला आणि कागद जवळ ओढला. विविध प्रकारच्या विषयांच्या याद्या तयार केल्या. आणि एकेकावर विचार करू लागलो. पण छे !

काहीतरी अडचण काढून मी विषय नापसंत करू लागलो. एक एक विषय घेऊन खूप विचार करू लागलो. तेव्हा तशा उपरोक्त विषयावर मला एक शब्ददेखील सुचेना. थोड्या वेळापूर्वीचे जोमाने डोलणारे मन आता निराशेने कोमेजत चालले होते. हर्षाने आणि उत्साहाने भरलेले मन आता उद्वेगाने व्याकुळ होऊ लागले होते. खरे म्हणजे मला त्या विषयांची माहितीच धड नव्हती. धड नव्हती म्हणण्यापेक्षा मुळीच नव्हती असे म्हणणेच अधिक योग्य ठरेल. विचार, कल्पना आणि भावना ह्यांचे किंचितही अस्तित्व आपल्या बुद्धीमध्ये नाही, याबद्दल स्वतःचाच तिरस्कार वाटू लागला. कल्पना आणि विचारपूर्ण भावनांचा साहित्यात संगम आढळून येणे म्हणजे दुधात साखर घातल्यासारखे असते. परंतु विहिरीतच नाही ते पोहऱ्यात तरी कोठून येणार? वाटले, जाऊ द्या ते सामाजिक लिखाण. एवढे भारदस्त आणि कठीण विषय आपणास जमणार नाहीत.

शेवटी एखाद्या साध्या सहलीचे वर्णन करण्याचा विचार केला. कारण वाणिज्य विभागाचा विद्यार्थी असल्यामुळे एखाद्या एतिहासिक स्थळाचे किंवा एखाद्या व्यक्तीचे शब्दचित्रही रेखाटू शकत नव्हतो व्यापारी युगाच्या वाटचालीत आम्ही साहित्यक्षेत्रात मागे जात आहोत असा संशय येऊ लागतो आणि तो ग्राह्य आहे. व्यापारी युगात आमच्या ठायी उदासीनता, कठोरता आणि भावना-कल्पनाविरहितता आली

असून जीवनात पोकळी निर्माण होऊ पाहत आहे. आणि ही पोकळी भरून काढण्यासाठी जीवन हे Business Methods & Organisation च्या बंधनात नसून निसर्गात निर्माण झालेल्या कमळाच्या पत्रावर खेळणारे दवबिंदू आहे ही जाणीव सत्यार्थाने पूर्ण झाली पाहिजे. आणि म्हणूनच व्यवसायाबरोबरच साहित्याची दृष्टी वाढविणे अपरिहार्य आहे. व्यवसाय हा माणसाचा डावा डोळा आहे तर साहित्य त्याचा उजवा डोळा आहे. जीवनात क्रांती करून समाजजीवन-विश्वजीवन समृद्ध करण्यासाठी, आम्ही सारे एक आहोत ही भावना फक्त साहित्य निर्माण करू शकेल. जीवनावर होणारा अन्याय-जुलूम यांची चीड आम्हाला आली पाहिजे आणि हे सारे करण्याची किमया फक्त साहित्यात आहे.

अशा प्रकारचे विधान फक्त सांगता येते. परंतु साहित्यामागील प्रेरणा, भावना, कल्पना, विचार ह्यांचा अभाव असल्यामुळे साहित्य निर्माण करण्यास आपण असमर्थ आहोत असे कळल्याबरोबर दुःख वाटू लागले. पण सहलीच्या विषयाने माझा आत्मविश्वास जागृत झाला. खूष होऊन लिखाणाला आरंभ केला. वैतागाने टाकलेला पेन आणि कागद उचलला, "आमची सहल" असे छानदार आणि टुमदार नाव दिले. पेन्टींग म्हणून बाजूला एक दोन फुले आणि एक दोन चांदण्या काढल्या. पण सुरुवात करण्यास वर्णनाची समस्या माझ्यासमोर उभी राहिली. वर्णन मला काही केल्या जमेना आणि जमेल तरी कसे ? सहलीच्या वेळी आमच्या ठराविक मुलांचे लक्ष वनश्रीच्या हिरव्या शालूकडे आणि पक्ष्यांच्या आवाजाकडे आणि विविध फुलांकडे नसायचे तर आपसांत चांभारचौकशा आणि चर्चाच करण्याचा ते प्रयत्न करीत होते.

एकंदरीत मला तेही जमेना म्हणून मी हिरमुसला झालो. उत्साहाने सिनेमाला जावे आणि तिकिट न मिळाल्यामुळे परत यावे, अशी माझी स्थिती झाली. शेवटी केविलवाण्या चेहऱ्याने आणि किंचितशा रागाने मी कागद फाडून टाकला.

निराशेने माझ्या मनात कळस बांधला. क्षणभंगुर विचार करून करून मी अगदी हताश झालो होतो. कारण उठावदार तर सोडाच पण चार लेखांत ऐकायला मिळेल असा साधा लेख-देखील मी लिहू शकत नव्हतो. दिलगीर आणि शून्य अंत:करणाने मी रेंगाळत पडलो होतो.

आणि त्या रेंगाळण्यात माझी सुप्त बुद्धी जागृत होत नव्हती. विविध विचार डोळ्यांसमोर येत होते. नंतर माझी चूक माझ्या ध्यानात आली. मला तीव्रतेने वाटू लागले की आपण चुकीच्या मार्गाने जात आहोत. आपण स्वत:ला आणि जीवनाला चटोर साहित्य वाचण्यातच रमविलं. डोक्याला ताण पडेल असे किंवा बुद्धी प्रगल्भ होईल अशा भावना आणि कल्पनांचा आधार असलेल्या वाङमयाकडे आपण तिरप्या नजरेनं देखील पाहिलं नाही. आपल्या सुप्त बुद्धीला, कल्पना-भावना आणि विचार ह्या-विषयींची जागृतताच उपलब्ध झाली नाही याबद्दल असमाधान वाटत होते. श्रेष्ठ साहित्याचा व्यासंगच नाही. चार ओळी मनाने लिहिणे सोडून घोकंपट्टीवरच सगळं आधारलेलं ! भावनात्मक आणि कल्पनात्मक लिहिण्याचं तंत्रच जर अवगत नाही तर लेखणी तरी कशी चालणार ?

असे कितीतरी विचार माझ्या मनाला भेडसावीत होते. हे विचार भेडसावीत असता-नाच मला वाटलं की लिहिण्याची आताच घाई नको. आपल्याला लेखकाची सूक्ष्म दृष्टी यावयाला हवी. त्यापूर्वी संवेदनाशील, भावनात्मक हृदय हवे; की ज्यामुळे प्रयत्न केला तर वास्तव चित्रण करता येईल.

पण भावनात्मक आणि कल्पनात्मक विचारांचा अभाव आपल्या अंत:करणात

असल्यामुळे निराशावादातच कळून चुकलं की आपली विद्यार्थ्यांची भूमिका ही संग्रहकाची भूमिका आहे. जे काही चांगल आढळेल त्याची साठवण करावयाची, त्याची चांगली जपणूक करावयाची आणि योग्य वेळी त्याची नीट मांडणी करावयाची. मात्र मांडण्यापूर्वी त्याच्या साधनात यत्किंचितही कसूर होऊ देता कामा नये. नाहीतर अर्धवट शिजलेले अन्न पचणार तरी कसे? अर्थात असे प्रयत्न करताना बऱ्याचं अडचणी आहेत याची जाणीवही मला आहे. परंतु दुःखाशिवाय सुख ते कसे मिळणार? हे सुखच आपल्या साहित्याचा हा बहुमान प्राप्त होणे एक प्रकारचे आत्मिक समाधानच होय. लेखनाचा दिव्य मार्ग सापडला म्हणून मी इतका आनंदी होतो की जणु गौतम बुद्धाला शांतीचा मार्गच सापडला होता.

## गंमत जंमत

उत्तमरावांचा चेहरा सकाळपासून उतरला होता. त्यांच्यावर कसलेतरी संकट ओढवल्यासारखे दिसत होते. त्यांच्या मित्रांनी त्यांच्या चिंतेचे कारण विचारले.

उत्तमराव म्हणाले; "माझ्या पत्नीचे व माझे भांडण झाले असून एक महिनाभर ती माझ्याशी बोलणार नाही अशी तिने शपथ घेतली आहे."

"मग यात बिघडलं कुठं ?" असे मित्रांनी विचारले. त्यावर ते म्हणाले—

"पण या अबोल्याला आजच महिना पूर्ण होत आहे !"

* * *

राज्यपालांनी दिलेल्या मेजवानीला तीन शस्त्रवैद्य एकत्र आले. एकजण म्हणाला "एका माणसाचा मोडलेला हात मी परत बसविला. आणि आता तो उत्तम प्रकारे हॉकी खेळतो." दुसऱ्यांनी सांगितले "मी एकाचा बिघडलेला पाय परत बसविला आणि आता तो तर फुटबॉल उत्तम प्रकारे खेळतो." तिसरा म्हणाला "तुम्ही माणसाबद्दल सांगता ! मी तर एका गाढवाच्या चेहऱ्यावर स्मितहास्याचे ऑपरेशन केले आणि आज तो सरपंच म्हणून निवडून आला."

* * *

मुंबईच्या मलबारहिल रोडवरील ड्राईव्हवरून एक बाई ताशी ८० मैलाच्या वेगाने गाडी चालवित होती. वेगनियंत्रण करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने पाठलाग करून गाडी थांबविली व तिच्या गुन्ह्याची तिला जाणीव दिली. त्यावर ती बाई म्हणाली, "मर्यादेपेक्षा अधिक वेगाने मी गाडी चालविली हे खरे तरी तोच गुन्हा तुम्हीसुद्धा केला आहे, हे लक्षात ठेवा."

अनिल रामकृष्णबापू खेडीकर

# बेकारी ही समस्या आहे काय ?

कु. रंजना भुते
बी. ए., प्रथम वर्ष

आधुनिक भारताची अवनती होण्याचे कारण म्हणजे भारतासमोरील अनेक प्रकारच्या समस्या, त्यातील प्रमुख म्हणजे (१) राजकीय समस्या, (२) सामाजिक समस्या. राजकीय समस्येत प्रामुख्याने देशाचे संरक्षण ह्या गोष्टीचा अंतर्भाव होतो, सामाजिक समस्येत प्रामुख्याने सुशिक्षितांची बेकारी, तांत्रिक बेकारी, अशिक्षित मजुरांची बेकारी, कृषिक्षेत्रातील घटते उत्पादन ह्या सर्व बाबींचा अंतर्भाव होतो. वरील सर्व विविध बेकारींपैकी भारतातील आजच्या युगातील दिवसेंदिवस वाढती बेकारी म्हणजे सुशिक्षितांची बेकारी.

सुशिक्षितांची बेकारी ही खरी नसून आपण निर्माण केलेली ती एक समस्या आहे. आज शिक्षण मिळविण्याचे ध्येय फक्त नोकरी करून उदरनिर्वाह करणे हेच आहे. प्रत्येकाची दृष्टी संकुचित असून व्यक्तिवादी आहे. त्यामुळे शिक्षणाचा खरा उद्देश काय हेच माहीत नाही. त्यामुळे मनात साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की ज्या शिक्षणामुळे फक्त नोकरी करून प्रतिष्ठा वाढविण्याऐवजी कमी करून घेतली जाते अशाप्रकारचे शिक्षण तरी काय कामाचे ? ज्या शिक्षणामुळे स्वावलंबन, चारित्र्य व आत्मविश्वास यांची वाढ होते ते खरे शिक्षण होय. परावलंबित्व, आत्मविश्वासाचा व दानतीचा अभाव यामुळे शिकलेले तरुण आपल्या बेकारीचे खापर उगीच सरकारच्या माथी फोडतात. वास्तविक हे बरोबर नाही.

सध्या आपण सारेच नेणिवेच्या अंधःकारात गुरफटून गेलो आहोत. आपल्या ठिकाणी विचारांची दृढता नाही. उद्यमाचे साहस नाही. हृदयाचे सामर्थ्य नाही. मनोबल नाही, वाईट वागणुकीबद्दल तिटकारा नाही, संस्कृतीबद्दल स्वाभिमान नाही. परंतु भारतात आज शिल्लक असेल तर तो तीव्र मत्सर, द्वेष, स्वार्थ, दुराचार व सहानुभूतिशून्यता. त्यामुळे वृत्ती निष्क्रिय बनली आहे. आपणास आज असेच वाटते की आपली सभ्यता ही परकीय राष्ट्रांच्या अनुकरणात आहे. वास्तविक अशी दृष्टी ही फसविणारी आहे. कोणतीही गोष्ट अनुकरणाने आत्मसात होत नाही तर त्यामागे प्रभावी शक्तीचे पाठबळ असावे लागते.

भारतात आज उत्पादक उद्योग करणाऱ्यांची संख्या ही मर्यादित झाली असून नियामक उद्योग करणाऱ्यांची संख्या वाढती आहे. व त्यामुळेच राष्ट्रीय संपत्ती ही संपुष्टात आली. ह्याचा परिणाम दिवसेंदिवस बेकारांची संख्या वाढत असून परदेशांतून अन्नधान्याची आयात करावी लागते. फ्रान्समध्ये १७८९ मध्ये जी क्रांती झाली त्याचे प्रमुख कारण म्हणजे वाजवीपेक्षा नियामक उद्योग करणाऱ्यांची संख्या वाढली. त्यामुळे देशाचे पुष्कळ नुकसान झाले व त्यामुळे तेथे उत्पादक उद्योग करणाऱ्यांची संख्या वाढविण्यात आली. ज्या देशात उत्पादक उद्योग करणाऱ्यांची संख्या जास्त तो देश स्वकर्तृत्वाने प्रगतशील होत असतो असे

कै. आगरकर यांनी आपल्या एका लेखात म्हटले आहे. त्याचप्रमाणे बेकारांची संख्या कमी करावयाची असेल तर उत्पादक उद्योग करण्यास सुशिक्षित तरुणांना भाग पाडले पाहिजे. भारतात पडीत जमीन पुष्कळ आहे, त्यासाठी सरकारने मर्यादित शिक्षक, कारकून, लष्करी शिपाई, न्यायाधीश, वकील, पोलीस ह्यांची संख्या परिमित करून बाकीच्यांना शेतीसारख्या उत्पादक उद्योगात घातले पाहिजे. शेतकी उत्पादन तोपर्यंत वाढत नाही जोपर्यंत आपण स्वयंपूर्ण होऊ शकत नाही.

बेकारीची समस्या ही वाढती आहे म्हणून निष्क्रिय वृत्तीने राहून सर्व गोष्टी योग्य काळ येताच प्राप्त होतील असे समजून राहण्यात अर्थ नाही. 'कालाय तस्मै नमः' ही वृत्ती जीवनात अडथळे निर्माण करीत असते व म्हणून अशी परिस्थिती शरणता स्वीकारण्यापेक्षा स्वतःच्या कर्तृत्वाने व दुर्दम्य महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन अनुकूल असणारा काल स्वतःच्या प्रबल प्रयत्नाने प्राप्त करून घेतला पाहिजे, ह्यातच खरा पुरुषार्थ व स्वार्थी वृत्तीचे दमन हा एक उपाय आहे.

भारतातील सुशिक्षित वर्गाची स्थिती आज अशी आहे की त्यांना दुसऱ्याच्या गुलामगिरीत कार्य करण्यात व पदवी मिळविण्यात भूषण वाटते. पण स्वकर्तृत्वाने स्वतंत्र उद्योग करण्यात कमीपणा वाटतो. त्याचे कारण मनोवृत्ती ही दुबळी आहे. आज कोणतेही कार्य हे स्वार्थी दृष्टिकोनातून केले जाते. राष्ट्राच्या हितात आपले हित समाविष्ट आहे ही भावनाच मुळी लयास गेली आहे. ह्या राष्ट्रीय वृत्तीच्या जागरणाची जाणीव तरुणांत शिक्षणातून निर्माण केली पाहिजे.

बेकारी ही समस्या नसून आभास आहे. आमच्या निष्क्रिय वृत्तीमुळे उन्मत्त झालेला तो भस्मासूर आहे. आमच्याच डोक्यावर तो हात ठेवायला निघाला आहे.

सुफला, सस्यश्यामला असे मातृभूमीचे चित्र आम्ही भविष्यकाळात पाहू शकणार नाही का? पण आम्हा चाळीस कोटी हिंदूंच्या ऐंशी कोटी हातात सामर्थ्य आहे व आमच्या मातृभूमीला कुणीही अबला म्हणू शकणार नाही. ह्या आत्मविश्वासाने सर्व राष्ट्र समृद्धीच्या सर्व क्षेत्रात अग्रेसर होणे आवश्यक राहील. नोकरशाही वृत्तीने कोणतेच राष्ट्र उभे राहू शकत नाही. नोकरीत पैसा मिळेल पण लक्ष्मी नाही. जिथे श्रमयज्ञ तिथे विष्णुकृपेचा पाऊस. तिथेच लक्ष्मीचा निवास. उद्योगाच्या घरी ऋद्धिसिद्धी पाणी भरतील पण आजच्या सुशिक्षितांना हे कळेल काय? आळश्याघरी गंगा कधीच येत नाही तर ती भगीरथाच्या प्रयत्नाने पाताळात सुद्धा सगरपुत्रांच्या संजीवनासाठी स्वर्गातून खाली येते. हा गंगेचा प्रवाह स्वतःच्या मस्तकी पेलणारे शिवाचे नि शक्तीचे उपासक आमच्या सुशिक्षित तरुणातून उत्पन्न झाले पाहिजेत. त्यावेळी 'बेकारी' ह्या क्षुद्र कल्पनेचा मागमुसही आमच्या देशात राहणार नाही. भस्मीभूत जर्मन राष्ट्र, तुरन्त प्रतिशोधाच्या आशेने होरपळलेले इस्रायल, ॲटमबाँबच्या संहारक शक्तीमुळे जळलेले जपान राष्ट्र जगाच्या समोर महायुद्धानंतर अभिमानाने उभे राहिलेले आपण आज पाहतो आहोत. त्यांतील तरुणांना विचारा, तुम्ही नोकरीच्या मृगजलामागे धावलात काय? ते तुम्हालाच तुमच्या ऋषीवर्यांचा संदेश ऐकवितील——

उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत ॥

ह्या मोहिनीमंत्राच्या सामर्थ्याने बेकारीचा भस्मासूर नष्ट झालाच पाहिजे.

# सौभाग्य

ना. बि. बनस्कर
बी. ए. ( अन्त्य )

दुपारची वेळ होती उन्हाळ्याचे ऊन रखलेलेलं होतं. उष्मा नकोसा वाटत होता. शालू खोलीत बसली होती. पुस्तक असेल कदाचित तिच्या हातात पण तिच लक्ष त्यात नव्हतसं वाटत होत. कुठल्यातरी विचाराच्या वणव्यात तिचं मन पेटत होतं. कशाचा तरी दाह तिला जाणवत असावा. चेहरा तिचा हसरा पण चिंतित होता. हवा आली आणि टेकलेले दार उघडले. तिला ते बंद करावसं वाटत होतं. पण तसंच ठेवून ती बाहेर पडू लागली. घराबाहेर आंब्याची झाडं होती. लहान लहान कैऱ्या लागलेल्या होत्या. जवळचा शामू तिथे खेळत होता. मनुही तितक्यात तिथं आली. भातुकलीचा त्यांचा खेळ. उन्हात काय रे करतोस म्हणून आईने शामला हाक मारली. शामुही गेला. भानुने आमुची जागा भरून काढली. मनू आणि भानू दोघीही खेळू लागल्या. त्यांच्या खेळाला रंग चढत होता. शालू ते पाहण्यात दंग झाली.

इतक्यात दारात कोणीतरी उभे असण्याचा भास तिला झाला. पाहतो तर तो रमेश ! तिच्या मामाचा तो पोर. सुसंस्कृत आणि सुशिक्षित. बी. ए. ला होता तो. ऐन तारुण्याच्या उंबरठ्यात नुकताच प्रवेश केला होता. डोळ्यात थोडा उन्माद होता. शालूशी तो बाळपणापासूनच परिचित. प्रत्येक उन्हाळ्यात त्यांच्या गावी यायचा, हंसायचा, खेळायचा आणि बागडायचा. मधली तीन वर्षे तो आलाच नव्हता. शालूचं लग्न होऊन काय ती दोन वर्षे झालीत. तो महाविद्यालयीन जीवनात वाढलेला पोर.प्रेमाच्या पिचकाऱ्या मारण्यात त्याला फार हौस वाटत असे. उन्हाळी सुट्यांत एकटाच असल्यामुळे त्याला करमणार तरी कसे ! म्हणून तो शालूच्या खोलीत यायचा. तरी शालू रूपाने नव्हतीच. परंतु तारुण्यात एक वेगळ्याच प्रकारचा बहर येतो. त्या उन्मादाचा वास बहर काही औरच असतो.

तारुण्यात माणसाचं मन कुठे नेईल हे सांगणे अशक्यच म्हणायचं. तारुण्य म्हणजे जीवनातील वसंत ऋतूचं. ज्वानीच्या बहराचा सुगंध मात्र त्यात दरवळत असतो.

शालू ही तारुण्यात येऊन फुललेली कळी! लग्नानंतर मिलींदाचा स्पर्श अद्याप तिला जाणवायचा होता. परंतु दैवगती निराळी होती. तीन महिन्यांनी ते एकाएकी आजारी पडले. लग्न झालेल्या पत्नीला स्पर्शसुद्धा त्याने केला नव्हता. मुसमुसलेल्या ज्वानीचा आनंद त्यानी लुटला नव्हता. डॉक्टरने सल्ला दिला तीन वर्षे स्त्रीसहवासापासून दूर राहावे म्हणावे. परंतु ते त्यास शक्य होते काय ? शेवटी शालूलाच काही दिवस पण माहेरी येणे भाग पडले आणि वैशाखवणव्यात तगमणारे जीवन जगणे अपरिहार्य ठरले.

आणि याच विचारांच्या तंद्रीत असता रमेश समोर !

न सांगताच तो पलंगावर बसला आणि त्याने बोलण्यास सुरुवात केली. निरनिराळे विषय त्यांच्या बोलण्यात यायचे पण त्या बोलण्याला रंग चढत नव्हता. ते दोघेही एकमेकापासून काहीतरी लपवून ठेवून गोष्टी सांगत

होते. मनात मात्र विचारांचे वेगळेच द्वंद्व चालले होते. रमेश एक महिना तिथे राहणार होता. रोज दुपारी शालूच्या भेटीकरिता यायचा.तिच्याशिवाय त्याला एक क्षणभर देखील करमत नसे. शालूलाही तो एक मनाचा विरंगुळा होऊन बसला होता. सर्वांचे डोळे चुकवून दोघे निराळेच मनोगत रचायचे. मात्र दोघेही तरुण-तारुण्यात काय प्रकार होतील हे सांगता येत नाही. सहवासामुळे रमेशच्या भावना अनावर होत असत. रात्रीची वेळ होती. एकदा असाच तो फिरावयास निघाला. चांदणी रात्र होती. आकाशात चंद्र होता. मात्र कुठून तरी एक दोन पांढरे ढग आकाशात आले. ते चंद्राच्या आड गेले. तरी पण चंद्र समोर येत असे. जणू लपंडावच !

कदाचित आपल्या बरोबर शालू लपंडाव खेळत असेल हीच त्याची भावना. त्याच्या मनात विचाराचे काहूर उठले. मात्र स्पष्टपणे आपल्या मनातील व्यथा तो सांगू शकत नव्हता. त्याने शालूच्या मनातील भावना जाणून घेण्यासाठी तिला एक छोटेसे पत्र भीतभीतच लिहिले.

प्रिय —शालू

चिठ्ठी लिहिण्याची माझी ही पहिलीच वेळ. तारुण्याच्या उन्मादात मनात काय काय तरंग येतील हे सांगणेच नको. माझ्या मनात तुझ्याविषयी प्रेम आहे हे शब्दांनी तरी कसे सांगू ? अव्हेर न करता स्वीकार करशील हीच अपेक्षा.

तुझाच —रमेश

किती थरथरत्या मनाने नी हातांनी त्याने ही चिठ्ठी लिहिली आणि ती शालूस दिली. त्याच्या मनात आपण काही तरी पाप करीत आहोत ही भावना जागृत झाली. अबलेवर हल्ला करीत आहोत; एका सौभाग्यवतीचं सौभाग्य हिरावीत आहोत याचा त्याला फार पश्चात्ताप झाला. क्षमा मागण्यासाठी तो तिच्या खोलीत गेला,शालू रडत होती. तिच्या कपाळावरील कुंकू अश्रूंच्या ओल्या स्पर्शामुळे पुसट दिसत होते. आपल्या हाताने पुन्हा कुंकू लावून रमेशनी तिला क्षमा मागितली.

'नाही रे रमेश माझंच चुकलं. एक विरंगुळा म्हणून तुझ्याशी मी मोकळा संबंध ठेवला. पतीच्या प्रेमळ शब्दाचा तुटवडा तुझ्याशी बोलून भरून काढावा हीच माझी इच्छा. माझ्या मनात कपट नव्हतं. दोन वर्षांच्या वैशाखवणव्यात सारखी मी जळत आहे. शांत जळत्या मनाच्या वेलीवर तुझ्या प्रेमाच्या जलसिंचनाचा उपयोग मी करीत होते. पण तो अशा तऱ्हेने नव्हे. माझं सौभाग्य अद्यापीही जिवंत आहे. तुझा गैरसमज व्हायला मीच कारण झाले. क्षमा कर.

रमेश निघून गेला. त्याला कितीतरी वाईट वाटलं. तोही सुशील व सुसंस्कृत होता. त्याने शालूस पुन्हा पत्र लिहिलं.

चिरंजीव —सौभाग्यवती शालूस

अनेक आशीर्वाद. तुझा आणि माझा लहानपणचा केवळ मैत्रीचा संबंध ! त्याचा मी गैरफायदा घेतला असे भलतेच विचार तू मनात आणू नकोस. अशीच पतीशी निष्ठेने राहा. त्यातच तुझे कल्याण आहे. तोच तुझा मोक्ष. तेच तुझे सौभाग्य. वासनेच्या विकारांनी मोहून न जाता मनावर ताबा ठेवणे हा संयम आणि तेच भूषण. स्त्रियांचं शील हे कांचेप्रमाणे आहे. ते स्वच्छ असायला पाहिजे. ते नाजुक आहे. फुटण्याची भीती असते, माझ्यामुळे कदाचित तुझ्या अंतरंगात भावनांचे तरंग उठले असतील. मी खडा मारून तरंग निर्माण केले असतील त्याबद्दल क्षमा कर.

तुझा भाऊ —रमेश

# साहित्य की महत्ता

कु. र. ना. रहाटे
बी. ए. १

साहित्य का मतलब तो सब को मालुम है। लेकिन उस की क्या महत्ता है यह बहुत कम व्यक्ति जानते हैं।

साहित्य एक ऐसी चीज है; जो की मनुष्य के मस्तिष्क को बढाती है। सदसद्-विवेकबुद्धि को प्रेरणा देता है। जिस तरह व्यक्ति को तंदुरुस्त या सुदृढ रहने के लिये अच्छे भोजन की आवश्यकता है; उसी तरह मस्तिक को सुदृढ रखने के लिये अच्छे साहित्य की आवश्यकता पडती है। यदि भोजन दूषित हो तो मनुष्य बिमार होता है; या उसका आरोग्य बिघड जाता है; वैसेही यदि मस्तिष्क को अच्छा खाद्य नहीं मिला तो वह भी बिगड जाता है। अर्थात् वह मस्तिष्क बुरे विचार का बन जाता हैं। इससे न केवल मनुष्य के विचार बुरे होते हैं, बल्कि मनुष्य की चाल–चलन भी बिगडती है।

तो फिर प्रश्न यह उठता है, की सही या अच्छा साहित्य कौनसा होगा? तो अच्छा साहित्य वही है जो व्यक्ति के विचार और भावना को जागृत करके उसमें वह शक्ति निर्माण करे जिससे वह स्वयं का विकास कर सके और साथही साथ दुसरोंका भी। अतएव अच्छा साहित्य निर्माण करना है, न की कुविचारोंका।


आजकल बुरा साहित्य बहुत प्रचलित हो रहा है! साथ ही साथ वह सस्ते किंमत पर बिकता भी है। इसलिए सब कोई वही साहित्य खरीदते हैं। विद्यार्थियोंने हमेशा अच्छे साहित्य की तलाश में रहना चाहिये।

मनुष्य कितना भी प्रतिभाशाली क्यों न हो उसकी प्रतिभा के तेज को विकसित होने के लिये अध्ययन की आवश्यकता होती है। उसी प्रकार मनुष्य की बुद्धि को विकसित होने के लिये उस पर अच्छे संस्कार का प्रभाव होना आवश्यक है। और ये संस्कार एक अच्छे साहित्य के द्वारा ही हो सकते हैं।

साहित्य के अनेक प्रकार हैं जैसे उपन्यास, लघुकथा, नाटक, कविता आदि आदि...। साहित्य यह मानव के अनुभवरूपी अमृत में नहाया हुआ होता है। अतः वह केवल कल्पनाहि नहीं तो वास्तविकता का आविष्कार लेकर पैदा होता है। अच्छा साहित्य तो वह होता है जो बारबार पढने के पश्चात् भी फिर एक बार पढने की इच्छा होती है। जैसे तुलसीदासजीका रामायण (रामचरित मानस), वालिमकी का रामायण, ज्ञानेश्वर की ज्ञानेश्वरी आदि...। कला के लिये निर्माण किये गये साहित्य को आकाशस्थित ग्रह, तारे, आकाशगंगा इत्यादि ...। साहित्य की मानवजीवन में महत्ता होती है।

# महाविद्यालय

## प्राध्यापक तथा कर्मचारी



प्रा. गो. नी हडप, वाणिज्य
प्रा. अ. वा. सोमण, वाणिज्य
प्रा. दा. न. निमाळ, वाणिज्य

श्री. गो. तु. पोहरकर, कुल सचिव
प्रा. अ. वा. मुंडले, वाणिज्य
प्रा. रा. आ. ठेंगडी, इतिहास

प्राचार्य म. त्र्यं. देशपांडे

---

[१] श्री. जीवन पवार–सेवक [२] श्री. भानुदास बंजारी–लेखापाल [३] श्री. काशीकर–शारीरिक शिक्षक
[४] श्री. आगाशे – टंकलेखक [५] श्री. विठ्ठलराव भांडारकर – लिपिक [६] श्री. निनावे – ग्रंथपाल
[७] श्री. रामकृष्ण मेहेर – सेवक [८] श्री. श्रीपती सिहूरकर – सेवक


---

[१] श्री वसंत हटनागर–सेवक [२] प्रा. प्र ल. पऱ्हाड, मराठी [३] प्रा. अ. श्री. देशपांडे, वाणिज्य
[४] प्रा. प्र श्री दादी, मराठी [५] प्रा ना रा. खेकाळे, राज्यशास्त्र [६] श्री. गोपाळ कुंभरे, सेवक

---

[१] धनीराम शेंडे, सेवक [२] प्रा. अमलकांती चटर्जी, इंग्रजी [३] प्रा. सुब्रम्हण्यम्, इंग्रजी
[४] प्रा. सौ. राका डे, इंग्रजी

# समर्थ महाविद्यालय, लाखनी
## विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ, १९६८-६९



खुर्चीवर बसलेले पहिली रांग : [१] कु. रंजना भूते, मुलींची प्रतिनिधी [२] वाय. एम्. झलके, कार्यवाह [३] श्री. म. त्र्यं. देशपांडे, प्राचार्य [४] श्री. रा. आ. ठेंगडी, प्रभारी प्राध्यापक [५] जे. बी. पंचबुद्धे, सहकार्यवाह [६] एम्. एस्. निर्वाण, सांस्कृतिक विभाग

खुर्चीवर बसलेले दुसरी रांग : [१] एम्. जी. झलके, वर्ग प्रतिनिधी [२] आर. डी. शामकुवर, विद्यापीठ प्रतिनिधी [३] पी. एन्. ब्रह्मपूरकर, कोषाध्यक्ष [४] सी. बी. राऊत, क्रीडा विभाग [५] आर. बी. नन्हे, संपादक [६] जी. टी. चेटुले विद्यापीठ प्रतिनिधी [७] केवळराम हलमारे ( वर्गप्रतिनिधी ).

उभे असलेले तिसरी रांग : [१] ए. के. पचारे, वर्गप्रतिनिधी [२] रामटेके, वर्गप्रतिनिधी [३] रामदास बावनकुळे वर्गप्रतिनिधी, [४] टी. टी. नांदगावे, वर्गप्रतिनिधी [५] एम्. एस्. गभणे, वर्गप्रतिनिधी [६] डब्ल्यू. डी. देशमुख, वर्ग प्रतिनिधी [७] डी. डी. वंजारी, वर्ग प्रतिनिधी

उभे असलेले चवथी रांग : [१] आर. एन. नागदेवे, वर्गप्रतिनिधी [२] एस्. ए. भूते, वर्गप्रतिनिधी [३] वी. एम्. भूते, वर्गप्रतिनिधी [४] अे. बी. नागलवाडे, वर्गप्रतिनिधी [५] वडवाईक, वर्गप्रतिनिधी.

# मोक्षाचे अधिकारी

लेखक : गु. ना. मेन्ढे, बी. कॉम. २

फार प्राचीन काळापासून, वर्षानुवर्षे आणि तपेच्या तपे चालत आलेली आणि विश्वाच्या सर्वांगीण क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान जिला आहे, अशी संस्कृती जर कोणती असेल तर ती भारतीय संस्कृती होय. जगातील राष्ट्रांच्या मालिकेत मुकुटमण्याप्रमाणे शोभायमान असणारा असा तो भारत देश. या भारत देशात राहणारे सगळे भारतीय आहेत. मग ते हिंदु असोत, बौद्ध असोत, खिस्ती असोत, ईसाई असोत वा मुसलमान असोत त्यांचा या ठिकाणी आपपरभाव असा भेद नाही. सर्व धर्मांतील लोकांचे माहेरघर असेल तर तो आमचा भारत देश. आणि म्हणूनच तर सर्वधर्मियांना या देशात स्थान मिळालेले आहे आणि ते येथे राहत आहेत.

आपल्या या भारत देशात हिंदु लोक राहतात. अर्थात त्यांचा धर्म हा सुद्धा हिंदुच आहे. या देशाला हिंदुस्थान नाव का पडले असावे याबाबत असे मत आहे की, हिंदुस्थान म्हणजे हिंदूंचे स्थान. या देशात हिंदु लोक राहतात आणि म्हणून या हिंदूंच्या स्थानाला हे नाव देणेच योग्य वाटले असेल म्हणूनच आपल्या देशाला हिंदुस्थान असे संबोधित असावेत. हिंदुधर्म हे सर्व धर्मांचे उगमस्थान आहे आणि सर्व धर्मापेक्षा श्रेष्ठ असा हा धर्म आहे, हे स्वामी विवेकानंदानी जगातील सर्वधर्मियांच्या धर्मपरिषदेत स्पष्टपणे सांगितले होते आणि ते सिद्ध पण करून दाखविले होते. परंतु ह्या हिंदुधर्माच्या तत्त्वांची आपणास पूर्णपणे जाणीव नाही. ही तत्त्वे आचरणात आणून त्यांचा अवलंबसुद्धा आमच्याकडून पुरेशा प्रमाणात होऊ शकत नाही. अशा ह्या श्रेष्ठ हिंदु धर्माचा अभिमान आम्हा भारतीयांना नको तर कुणाला असावा ? ह्या हिंदु धर्मातच जगातील सर्व धर्मांचे मर्म सामावलेले आहे. थोर स्वामी विवेकानंद म्हणूनच म्हणत की, "हिंदुधर्मा इतकी मानव्याची उदार मूल्ये सांगणारा दुसरा धर्म नाही आणि हिंदु धर्माइतके प्रत्यक्ष आचारात उदार लोक अन्यत्र सापडणार नाहीत." हिंदु धर्म हा प्रमुख धर्म आणि बाकीचे धर्म ही त्याची निरनिराळी रूपे आहेत. सत्य वस्तू एकच आहे, परंतु तिला नानाप्रकारे संबोधण्यात येते इतकेच.

हा हिंदुधर्म जेव्हा लयास गेला त्याकाळी महाराष्ट्रात जिकडे तिकडे भ्रष्टाचार माजला होता. हिंदुधर्माविषयीची भावना लोकमनातून लोप पावली होती. हिंदुधर्माविषयीची आस्था कुणाला वाटू नये असा त्या हिंदुधर्मविरोधकांनी प्रयत्न सुरू केला होता. परंतु असा प्रकार श्री समर्थ रामदास स्वामींना पाहवला नाही. त्यांनी आपल्या आत्मतेजाने हिंदुधर्माचे पुनरुज्जीवन करण्याची प्रेरणा श्री शिवाजी महाराजांना दिली व त्यांना "मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा" असा संदेश दिला. आणि ह्या संदेशाचा त्यांनी पुरेपुर अवलंब करून महाराष्ट्रात हिंदुधर्माची स्थापना केली. श्री शिवाजी महाराज हे हिंदुधर्मसंस्थापनेचे प्रणेते होत. अशा रीतीने त्यांनी हिंदुधर्माची मराठी राज्यात स्थापना केली.

हिंदुधर्मात उल्लेखिलेले आहे की, जर मोक्ष प्राप्त करावयाचा असेल तर आपण धर्म सोडता कामा नये. कर्तव्य कर्म अविरत करीत राहावे. आणि धर्मावरच तर राष्ट्र अवलंबून आहे. धर्म बुडाला तर राष्ट्र बुडेल, पण धर्म

म्हणजे तरी काय ? मनापासून केलेले कोणतेही कर्म धर्मच आहे ते पवित्र असते. मग ते कर्म समाजसेवेचे असो की अन्य कोणतेही. देवाच्या दृष्टीने कोणतेही कर्म उच्च किंवा तुच्छ नाही. ती ती सेवाकर्मे मंगल व पवित्रच होत. एका विद्वान लेखकाने म्हटले आहे की, "There is nothing great or small, in the eye of God".

समाजसेवेची कोणतीही कर्मे घ्या. ती सगळीच पवित्र आहेत. तुम्ही जर समाजाची सेवा केली तर तुम्ही मुक्त व्हाल. सारे संत हीच गोष्ट सांगत असत. त्यांचे म्हणणे असे की, समाजसेवेचे कार्य करण्यातच खरा धर्म आहे. तेच पवित्र कार्य आहे. संतांनी हेच सांगितले आहे. ते देवभक्ती करीत टाळ कुटत बसणारे नव्हते, आळशी नव्हते, परावलंबी नव्हते, त्यांनी स्वत:चा भार समाजावर कधीच टाकला नाही. कोणतेही संत असोत ते समाजोपयोगी कार्य करीत असत. सेना न्हावी हजामत करी, जनाबाई दळी, सावता माळी भाजी देई, गोरा कुंभार मडकी भाजी, कबीर शेले विणी, तुलाधार वैश्यवाण्याचा धंदा करी, सज्जन कसाई खाटकाचा धंदा करी अशा प्रकारे सर्व संत समाजोपयोगी कार्य करीत. हे सारे संत 'मोक्षाचे अधिकारी' होते

पुरुषाला जितका अधिकार तितकाच अधिकार स्त्रीलाही आहे. स्त्रीने केलेले प्रत्येक कार्य श्रेष्ठ आणि पवित्र आहे. जी स्त्री पतीच्या इच्छेत आपली इच्छा मिळवून टाकते, मुलाबाळांचे संगोपन करण्यात गढून गेलेली असते, ती कर्मयोगी स्त्री मोक्षाची अधिकारी नाही तर मग कोण आहे ? श्रीकृष्णाने खाडखाड मोक्षाची द्वारे उघडी केली. स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार नाही असे समजले जाई श्रीकृष्ण म्हणतो "चुलीजवळ बसणारी, दळण दळणारी,शेणी करणारी,पाळणा हलविणारी स्त्री हीमोक्षाची अधिकारी आहे"

समाजाला नवनवीन विचार जो पुरुष देतो, आणि तो आपल्या नवविचारांनी समाजातील लोकांची मने पालटवितो, त्यांना ज्ञान देऊन त्यांच्या भावना, आचारविचार सुसंस्कृत आणि विकसित करतो, तो मनुष्य जितका थोर, तितकाच समाजाला धान्य देणारा शेतकरी सुद्धा थोर. कारण त्याच्या श्रमजीवी अंगातून गळणाऱ्या पाण्याने उजाड दिसणाऱ्या जमिनीला तो हिरवी, हिरवीगार करतो. फळाफुलांनी तिला नटवितो. तरीपण त्याची आजची दशा पाहिली तर आपल्याला कीव आल्यावाचून राहणार नाही. त्याचप्रमाणे समाजाचे रक्षण करणारा सैनिक जितका श्रेष्ठ, तितकाच समाजाला मोट करून देणारा चांभारही श्रेष्ठच; शाळेतील शिक्षक जितका थोर तितकाच स्वत:च्या डोक्यावर घाणीची टोपली वाहून नेणारा आणि इतके कार्य करूनही ज्याचेवर नेहमी वाईट शब्दांची वृष्टी होत असते, आणि ज्याला तुच्छ लेखण्यात येते तो झाडूवालाही तितकाच थोर आहे. त्यांनी हृदय ओतून केलेले कार्य त्यांना मोक्ष देणारे आहे.

स्वकर्म कुसुमी त्यास पूजितां मोक्ष लाभतो । गीतेमध्ये मोक्ष मिळविण्याचे साधन म्हणून स्वकर्म सांगितले आहे आणि हे सर्व आपल्या समाजकार्य आणि स्वकार्याने परमेश्वराला भूषित करणारे मोक्षाचे अधिकारी नाहीत तर कोण ?

आपल्या कार्याने समाजाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणाऱ्या, समाजाला वस्तू पुरविणाऱ्या, समाजाची सेवा करणाऱ्या ह्या सगळ्या व्यक्ती स्वकर्मे आचरित असतात आणि त्यांच्या त्या स्वकर्मामुळे ते आपल्या समाजाचा उद्धार करू शकतात. समाजाचा उद्धार झाला की गावाचा होईलच, गावांचा झाला की राष्ट्राचा होणारच. असे हे राष्ट्रोद्धाराचे जे अनेक उद्योग आहेत त्यातला जो उद्योग आपल्याला आवडेल तोच उद्योग प्रत्येकाने केला पाहिजे. त्याच उद्योगात आपले कर्तृत्व, कौशल्य आणि हृदय ओतले पाहिजे. त्याच उद्योगाचा अहर्निश जप केला पाहिजे. आणि असे जेव्हा घडेल तेव्हा तो उद्योग आपल्याला आणि आपल्या राष्ट्राला मोक्ष दिल्यावाचून राहणार नाही आणि हे आपण जेव्हा स्वकर्म हाच धर्म आहे या न्याय्यबुद्धीने आपली कर्मे करू तेव्हाच आपण 'मोक्षाचे अधिकारी' बनू शकू.

---

# जगावे □ कसे ?

आर. व्ही. ठाकरे
बी. ए. अन्त्य

प्रत्येक व्यक्तीला असे वाटत असते की, आपल्यासमोर सर्व सुखे हात जोडून समोर उभी असावी. आपल्याला सर्वोच्च सौंदर्य, सर्वोच्च श्रीमंती उपभोग घेऊन आपण चैनी, विलासी, सुखी आणि आनंदी जीवन घालवावे अशी साधारणतः प्रत्येकाच्या मनात सुप्तावस्थेत का असेना परंतु महत्त्वाकांक्षा असते हे तेवढेच खरे आहे. परंतु "सत्यं शिवं सुन्दरम्" ह्याची म्हणजे अशा प्रकारच्या आशयाची विचारसरणी ठेवून जगण्याची प्रवृत्ती फारच थोड्यांची आहे. एवढेच नव्हे तर आजच्या काळात निदान भारतात तरी अशी परिस्थिती आहे की, माणसाने माणुसकीने जगावे तरी कसे ? जिकडे तिकडे स्वार्थी वृत्ती, वाचाळपणा, भ्रष्टाचार अशा अनेक गोष्टी निदर्शनास येत आहेत.

वास्तविक पाहता आपला भारत देश इतक्या उत्कृष्ट संस्कृतीच्या शिखरावर पोचलेला आहे की, जगात त्याची स्तुती केली जाते. दिसायला साध्या परंतु परदेशातील लोकांना सुद्धा त्या वस्तू बहुमूल्य वाटतात. आपल्या दिल्लीवरून कोंबडी न्यूयार्कला जाते, मुंबईवरून श्रीखंड इंग्लंडला जाते, रशियाला आंबे जातात याशिवाय कॉफी वगैरेसारख्या अनेक वस्तू परदेशात आवडीने मागवतात. आपली वेरूळ व अजिंठा येथील कलाकृती आणि चित्रकला पाहून अमेरिका, इंग्लंडसारख्या विदेशात त्यांची वाखाणणी केली जाते. आपल्या ज्ञानेश्वरीचे ज्ञान एवढे मोठे आहे की, त्याची वाढ अभ्यासाने आणखी केल्यास तिचे बहुमोल मार्गदर्शन आपल्याला मिळते. तरीपण आपल्या संस्कृतीचा अभिमान आपण विसरतो. "तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी" अशी आपली स्थिती झाली आहे. एकीकडे श्रीमंत आणि अमलदार अमाप पैसा खर्च करून मिरवीत आहेत तर दुसरीकडे गरीब आणि विशेषतः शेतकरीवर्गात सुद्धा उपासमारीची पाळी दिसत आहे. अशा स्थितीला कारणीभूत आपल्यातील विविध व्यक्ती, चालक आणि संघटक, स्वार्थी आणि सत्तालोलुप व्यक्तींच्या बेलगाम धोरणामुळेच असे सर्वसामान्य विचारी माणसाला म्हणायला हरकत नाही. साध्या चपराशापासून तर वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत आपली अहंकारी प्रवृत्ती दाखविण्यास मुळीच भीत नाही. अगदी वरच्या स्तरावरून खालच्या स्तरापर्यंत पाहू गेल्यास असे दिसते की, सामान्य माणसाला त्यांच्यासमोर जाणे म्हणजे देवासमोर जाणे असेच वाटायला लागते. किंबहुना देवदेखील असा असणार नाही !

सरकारने धान्यवाटपाची पद्धती जी सुरू केली तिच्यात तरी व्यवस्थित वाटप केले जाते काय, त्याचा उद्देश साध्य होतो काय, याला उत्तर म्हणजे नाही असेच द्यावे लागेल. कारण पुष्कळदा असे दिसते की, गरीब जनतेची रांगेत उभे राहूनही पिळवणूक होते. खेड्यातील शेतकरी प्रसंग आला तर कोर्ट कचेरीत जातो. तेव्हा त्याला त्या कामाकरिता एक दिवसाऐवजी

दोन दिवस लागतात, ५ रु. ऐवजी त्याला १० रु. लागतात. ही अगदी सत्यस्थिती आहे. बरे! खऱ्या न्यायाने काम होते म्हणावे तर तसेही नाही. एखाद्या ठिकाणी अमुक कारकुनाच्या इतक्या जागा आहेत व अमुक अमुक पात्रता पाहिजे असे वर्तमानपत्रात दाखविले जाते. परंतु प्रत्यक्ष आवेदनपत्र गेल्यानंतर त्यात सल्लागार समित्या असोत वा कमिशने असोत त्यात त्याच्या नजिकचा उमेदवार असून त्याने त्याला खुणविले तरी त्याचे काम होते. परंतु आजकाल तसेही दिसत नाही तर शिफारस, नोटांनी पाकिट फुगले की, उमेदवारांची डाळ शिजली म्हणून समजावी. जे अशा भानगडीत पडणार नाही त्यांची निराशा झालीच म्हणून समजावे. ह्यात लायक उमेदवाराला किंमत नसून ती पैशाला दिली जाते. हीच स्थिती राजकारणात आहे. खेड्यातल्या गुणी, हुशार, कर्तबगार माणसाकडे लक्ष दिले जात नाही. त्याचा उपयोग करून घेतला जात नाही. कारण तो प्रसिद्धीपासून, पुढे पुढे करण्यापासून अलिप्त असतो. जो राजकारणात किंवा राजकीय पक्षात असेल तोच शहाणा आणि कर्तबगार असे मानून राजकारणाबाहेरच्या गुणी माणसाची उपेक्षाच केली जाते.

आपण प्रवासाला निघालो तर रेल्वेचे प्लॅटफॉर्मवर तसेच बसस्टँडवरही अशीच गम्मत असते. रेल्वेत कितीतरी व्यक्ती आपल्या मालासह फार कमी दराने प्रवास करतात. हयात दलाली असते की चेकरची प्रवाशाची ५ रु. ची तिकीट लागत असली तर तो तिकीटचेकरला १ रु. देऊन आपले ४ रु वाचवितो व आपणाला १ रु. फायदा झाला म्हणून तिकीटचेकर समाधानी असतो. रोजच्या परिचयानी हा भ्रष्टाचार अधिक वाढत जातो. बस स्टँडवर एखादा सेठ आला तर त्याला तिकीट अगोदर मिळते. रांगेत राहणारी गरीब व्यक्ती ओरडतच राहते. एवढेच नव्हे तर मंदिर आणि देवाला आपण सत्यतेचे आगरच समजतो. परंतु अनेक मंदिरात पैसा दिल्याशिवाय त्या देवाच्या उपासकाला देवाचे दर्शन घेता येत नाही. बहुतेक मंदिरांत दक्षिणा म्हणून एक ना दोन तरी रुपये मागितल्याशिवाय देवाचे दर्शन घेणे कठीण होते. आता विद्यार्थी प्रामाणिक आणि सत्प्रवृत्तीने राहणारा वर्गसुद्धा लायब्ररीतून मासिके आणि कादंबऱ्या, चित्रे आणि आराखडे लुबाडण्यास कमी करीत नाहीत. "गीत गाया पत्थरोंने" ह्या चित्रपटात आपल्या भारतीय संस्कृतीमधील जुन्या अनेक अशा प्रणययुक्त आणि नग्न अशा देवदेतांची चित्रे दाखविली जातात. त्या चित्रांचा उपहास करणारे आजकालचे तरुण म्हणजे एक अनोळखेच समजावे लागेल. रस्त्यावरील तरुणीकडे आसक्त नजरेनी पाहणारा तरुण त्या सिनेमातील चित्रांना वाईट म्हणवून घेतो, परंतु त्याला हे समजत नाही की, त्या चित्रांनी आपल्या पिढीला कोणते मार्गदर्शन होते आणि जुन्या पिढीतील संस्कृतीचे निरीक्षण करून आपण कुठे चुकतो याचा तो विचार करीत नाही.

आज वस्तूंचे भाव इतके कडाडले आहेत की गरीब व्यक्तीला जीवन जगणे कठीण झाले आहे. आज अनेक कार्यालयात एवढेच नव्हे तर सचिवालयात अधिक काम कोणाला असेल तर ते 'टेलिफोनला' आणि 'बेल' ला. मंत्री आणि अनेक कार्यकर्ते दौरे करतात; परंतु दौरा खऱ्या अर्थाने लोकांच्या अडचणी समजावून घेऊन त्या दूर करण्यासाठी उपयोगी पडला पाहिजे. मंत्र्याची सत्ता किंवा ज्ञान, डामडौलपणाबद्दल हेवा वाटण्याचे कोणाला कारण नाही. पण ही सत्ता लोकांच्या कल्याणाकरिता वापरली जात आहे, राज्याची शोभा वाढविण्यास कारणीभूत होत आहे, याचा प्रत्यय लोकांना यायला पाहिजे. एखादा कार्यकर्ता चांगले कृत्य करीत असेल तर "He is shaping very well" असे म्हणून आपण त्याचा गौरव करतो. त्यामुळे तो शालीन

होण्याऐवजी मलीन होऊ लागतो व लीनतेऐवजी अहंकाराचा दर्प त्याला येऊ लागतो. कोणी किती पैसे खाल्ले आणि कोणी कोणाकोणाच्या नावाने काय काय धंदे केले याचे वृत्तपत्रातून आलेले वृत्त वाचले की, धक्का बसल्याशिवाय राहत नाही.मंत्र्यांची शान आणि मंत्र्यांचा खर्च पाहिला की, आपण भारतासारख्या गरीब देशात आहोत की, अमेरिकेसारख्या श्रीमंत, असा संभ्रम पडतो. आमच्याकडे कमी उत्पादन, कमी उत्पन्न आणि कमी सुख हे जीवनाचे सूत्र जेथे राजकारण कमी आणि अर्थकारण अधिक हवे तेथे अर्थकारण नावापुरते आणि सारेच राजकारण अशी अवस्था, मग माणूस कसा सुधारणार आणि देश कसा पुढे जाणार ! पायाभरणी आणि कोनशिला, प्रकाशन आणि उद्‌घाटन यासाठी शेकडो मैलांचा प्रवास, त्यासाठी अनेकांना दगदग, त्यात कित्येक तासांची उधळपट्टी हे या मागासलेल्या देशास परवडण्यासारखे आहे काय ? आणि यामुळेच देशातील गरीबी काही हटत नाही आणि श्रीमंती काही कमी होत नाही. कार्यकर्ते सत्तेच्या मागे लागल्याने शासनाने सत्ताधीशावर कुरघोडी केली असून अधिकारी खरे राज्यकर्ते बनले आहेत. दौरे आणि समारंभात मशगुल असलेल्या मंत्र्यांना त्यांचे सचिव हातोहात बनवीत नसल्यास नवल ! गावात तलाठी, तालुक्यात मामलेदार, जिल्ह्यात कलेक्टर आणि मुंबईत सेक्रेटरी राजा बनला आहे.

'अंधा पिसे कुत्ता खाय' अशी या राज्याची अवस्था झाली आहे. सत्तारूढ पक्ष बदनाम होत असून सरकार वशिलेबाजी, लाचलुचपत,सत्तेचा लोभ आणि त्यासाठी कारवाया यांनी पोखरून गेले आहे. परदेशी प्रवासासाठी काही खासदार मंडळी एवढी लाचार बनलेली आहेत की त्यासाठी ते आपल्या देशाच्या धोरणाची, सरकारच्या कर्तृत्वाची परकीयांच्या चार चौघात नाचक्की करीत असतात. व रशिया-अमेरिका-इंग्लंडचे गुणगान गात असतात. हिन्दी जनतेच्या ह्या प्रतिनिधींचा हा देशाभिमान व ही बौद्धिक उंची पाहून त्या परकीयांना काय वाटत असेल कोणास ठाऊक ?

आज शेतकऱ्यांची स्थिती किंवा गरीब जनतेची फार पिळवणूक होत आहे. परंतु 'कोणी वंदा अथवा निंदा आमचा स्वहिताचा धंदा' असे आमच्या कार्यकर्त्यांचे चालले आहे. काही ठिकाणी भूमिहीनांना जमीन मिळते म्हणून काही कार्यकर्ते भूमिहीन अशा खेडूत गरीब व्यक्तीकडून पैसे लुबाडतात. व ते पैसे ऑफिसात खटपट करण्यात खर्च झाले असे सांगून आपली डाळ शिजवितात. शेतकऱ्यांना बी-बियाणे देतानासुद्धा सरकारी ऑफिसरकडून फसविले जाते. शेतकऱ्यांना चांगले पीक येते म्हणून संकरीत ज्वारी लावा असे सांगितले जाते. परंतु त्यांना संकरीत नं. १ च्या ठिकाणी संकरीत नं. २ दिली जाते. वास्तविक त्यांना संकरीत नं. १ ची ज्वारी सरकारकडून मिळेल असे सांगण्यात येते. शेवटी नं. २ ची ज्वारी जड असल्यामुळे तिचे पीक येणे कठीण जाते व शेतकऱ्याला जास्त पीक येण्याऐवजी नापिकी होऊन शेतकऱ्याने काढलेले कर्ज व केलेली मशागत व्यर्थ जाऊन शेतकरी शेवटी नुकसानीत येतो. अगदी आपल्या नजरेसमोरची गोष्ट आहे. 'हवाई फवारणी' करिता म्हणून लाखनीला दोन हेलीकॉप्टर आले होते. काही दिवस त्यांचे उडणे-उतरणेच खूप चालत असे. शेतीतील पिकांवर फवारणी होणार असे शेतकऱ्यांना सांगण्यात आले. परंतु प्रकार वेगळाच झाला. साकोली येथे एक दिवस त्यांचे चढणे आणि उतरणे फारच जास्त प्रमाणात होते. परंतु असे ऐकण्यात येते की, ह्या हेलीकॉप्टरवाल्यांनी एका व्यक्तीकडून ५ रु. घेऊन त्यांना हेलीकॉप्टरमध्ये बसविले जात होते. आणि त्यात अधिकारी वर्गालाही संधी मिळाल्यामुळे हेलीकॉप्टरमध्ये बसण्याचा आनंद त्यांनी लुटला. फवारणी

झाल्यानंतर १५ दिवस शेतातील गवत गुरांना चारता येणार नाही अशी ताकीद देण्यात आली होती. परंतु १५ दिवस न होताच तेथे गुरांना गवत चारण्यात आले. तेव्हा गुरांना काही अपाय झाला नाही. तेव्हा त्यांनी विषारी औषध शिंपडले की, निव्वळ पाणी शिंपडले ह्याची चौकशी कोणत्याही अधिकाऱ्यांनी केली नाही. ग्रामसेवक किंवा पटवारी वगैरे अधिकारी फक्त शेत दाखविण्याचे काम करीत होते. यावरून असे दिसते की, वरचे अधिकारीसुद्धा किती पैसा लुटतात व किती अव्यवस्था आहे. त्याचे वास्तव्यात खर्च झाला असेलच तरी पण भंडारा जिल्हा तर सोडाच पण साकोली तालुक्यात-सुद्धा पूर्णपणे फवारणी झालेली आपणास दिसत नाही. आपल्या देशात नटनटद्यांकडे काळा पैसा एवढा पडला आहे की, त्यातून एखादे धरण बांधता येईल. त्या धरणाऐवजी त्यांचे ते पैसे 'नटराज,' 'ग्रीन्स,' किंवा 'व्हनिस' मध्ये खर्च होत असतात. रात्रीची नृत्यगृहे मुंबईत जोरात चालू आहेत. परदेशी तरुणी येथे आणून त्यांना भरपूर पैसे देऊन अर्धनग्न नृत्यांची खैरात चालू आहे. घोड्यांच्या रेसेसवर पैसा उधळला जात आहे. परदेशी वकालतींच्या मदिरा-मदिराक्षीच्या जोरावर सरकारी वरिष्ठ अधिकारी एवढे भारून गेले आहेत की, एखादे दिवशी काहीतरी भयंकर घडणार अशी सच्छील, सत्प्रवृत्त माण-साला भीती वाटल्यावाचून राहत नाही.

आज आपण आदर्श ठेवू म्हटले तर कोणाचा? अशिक्षिताचा की, सुशिक्षिताचा हा प्रश्न समोर येतो. कारण जनतेला चोर म्हणून पकडणारे, न्यायाधीश म्हणून न्याय देणारे, निरीक्षक म्हणून काम करणारे सरकारी अधि-कारी चोर म्हणून पकडले जातात. कुठे पोलीस-इन्स्पेक्टरला अटक करण्यात आली, तर कुठे सॅनिटरी इन्स्पेक्टरला पकडण्यात आले अशा अनेक वार्ता आपल्या कानावर येतात. सरकारी अधिकारीच जेव्हा असे करतात तेव्हा जनता न्याय मागण्याकरिता न्यायालयाकडे धाव घेते. तेथेही खऱ्याचे खोटे, खोटयाचे खरे होतेच. तेव्हा ही सगळी परिस्थिती पाहिल्यास सामान्य माण-साला सत्य कोणते, निःस्वार्थ कोणता, देशसेवा कोणती, न्याय कोणाला मागावा, जगावे कसे? हाच प्रश्न भेडसावतो. तरुण वर्गापुढे, विद्या-र्थ्यांपुढे चांगला आदर्शच दिसेनासा झाला आहे.

या सर्व गोष्टींवर आळा घालण्यासाठी "ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असू द्यावे समाधान" असे म्हणून चालणार नाही. अमे-रिकेने कष्टातून काढलेला सोन्याचा धूर आणि जर्मनीने जिद्दीने, देशाभिमाने बेफाम होऊन जर्मनीची केलेली फेरउभारणी वरील मंडळींच्या डोळयात अंजन घातल्याशिवाय राहणार नाही. येथे कष्ट कमी, काम कमी, सुकाळ आहे तो वाचाळतेचा, समारंभाचा आणि काळचा बाजा-राचा! तेव्हा आपल्याला ही स्थिती उलटी करण्याकरिता "जगण्यासारखे जोवर काही आहे तोवर मरण्यात मौज आहे" ही म्हण लक्षात घेऊन आपल्याला असलेली परिस्थिती उलथून पाडता येईल. त्यासाठी प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आणि व्यक्तीपेक्षा देश मोठा हे सत्य आपण समोर ठेविले पाहिजे. "Old order changeth yielding place to new" नव्यासाठी जुने बदलत असते म्हणून ते बदलविणे भाग आहे. परंतु "Life is for living, work, drink, eat and be merry" असे म्हणणारे ते कार्य पार पाडू शकत नाही. तर त्याकरिता म्हणजे देशाचे रक्षण जर समर्थपणे करायचे असेल आणि प्रत्येक विचारी माणसाला चांगल्या जीवनाचा आस्वाद घ्यावयाचा असेल तर संपत्तीच्या प्राथमिक शिक्षणाप्रमाणे व्यायामही सक्तीचे करून नागरिकांची शरीरे आणि मने निकोप केली पाहिजेत. सदाचार आणि सुविचाराची पेरणी केल्याशिवाय समाज सुधारणार नाही.

समर्थ महाविद्यालय लाखनी
ग्रंथालय
जि. भंडारा

# आई

चंद्रकांत व्यवहारे
बी. ए. अंत्य

आपल्या मराठी भाषेत अनेक शब्द आहेत. पण जो शब्द उच्चारला असता त्रिभुवनातील सारी सुखेंही तुच्छ वाटतात असा एक शब्द आहे. आणि तो म्हणजे 'आई'. महाराष्ट्राचे राजकवी यशवंत पेंढारकर यांनी 'आई' या कवितेत आईची थोरवी किती श्रेष्ठ आहे याचे भावप्रधान वर्णन दिग्दर्शित केले. कवी यशवंत म्हणतात––

"स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी" हा अनुभव ज्यांना आई आहे त्यांना नवा नाही. जगातील पावित्र्य, औदार्य, स्वार्थत्याग, उपकारीपणा या साऱ्या गुणांची मूस जर कोणती असेल तर ती आई हीच आहे. या जगाचे दर्शन आपण आईच्या उदरातून आलो म्हणजेच घडते. या एकाच गोष्टीवरून आईचे श्रेष्ठत्व कळून येईल.

आपला आद्य गुरू म्हणजे आई होय. मातीच्या ओल्या गोळयाला जसा आकार द्यावा तसे त्याला रूप मिळते तद्वतच आई मुलांच्या मनावर जे संस्कार करील ते त्याच्या मनावर कायमचे टिकतील. अर्थातच आईचा एकमेव संस्कार बालमनावर प्रभावी ठरतो. हे संस्कार मेणावर चटकन उमटणाऱ्या ठशाप्रमाणे असतात. बालपणी आपण जरी आपल्या पायावर उभे राहत असलो तरी चालावयास मात्र आईचीच मदत मिळते. आणि पुढील भविष्यात मुलांचे पाऊल नीट वळणाकडेच पडावे याची दक्षता आईशिवाय कोणी घेतच नाही.

Mothery's love is boundless as ocean and fragrant as rose, म्हणजेच आईचे प्रेम सागराप्रमाणे अमर्याद व गुलाबाच्या फुलाप्रमाणे सुवासिक असते. प्रेमळपणा व भावनोत्कटता ही आईची खास वैशिष्टचे होय. मुलांच्या नखाला लागले तर त्याच्या आधी आईच्या डोळयांत पाणी येते. मुलगा तापाने फणफणला व उपाशी राहिला म्हणजे आईच्याही घशाखाली अन्न जात नाही. अन्न रुचकर लागत नाही. हे कशाचे द्योतक आहे? तर हे शुद्ध प्रेमाचे लक्षण आहे. आईसारखे नि:स्वार्थी प्रेम जगात कुणाचेच नसते. काकू, आत्या, मामी ह्यांच्यात आपणाला आईसारखे नि:स्वार्थी प्रेम आढळत नाही. कवी यशवंत म्हणतात. 'आई तुझ्याविना गे कां ह्या करील गोष्टी' खरोखरच आईच्या प्रेमाची सर ह्या जगात कोणीच करू शकणार नाही. सर्व मुलांवर तिचा सारखाच लोभ असतो. आपला मुलगा पुढे आपल्याला सुख देईल, पैसा पुरवील या इच्छेने आई मुलांवर कधीच प्रेम करीत नाही, तिचे प्रेम निर्हेतुक असते. आणि म्हणूनच आईच्या प्रेमाची पाखर ज्यावर असते त्यांना दुःखाचे काहीच वाटत नाही. आईचे प्रेम हे नैसर्गिकरीत्या झाडावर पिकलेल्या फळाप्रमाणे असते, आणि इतरांचे प्रेम हे कृत्रिम उपायांनी पिकविलेल्या फळाप्रमाणे असते.

श्री शिवाजी महाराज जिच्या पोटी जन्माला आले ती जिजाबाई माता होती आणि ती वीरमाता असल्यामुळेच तिने शिवाजीला लहानपणी रामायण, महाभारतातील गोष्टी सांगून वीरपुरुष बनविले. नेपोलियन बोनापार्टची स्थिती तशीच होती. आई प्रसंगी कठोर बनते. कधी कधी रागानेही, पण तिचा राग

अथवा कठोरपणा नारळाच्या वरच्या कवटी-प्रमाणे कठोर असतो, व आत मात्र निर्मळ प्रेमाचे गर, ओलावा असतोच. मुलाला वळण लागावे म्हणून ती प्रसंगी कठोर वागते इतकेच. कवी यशवंत म्हणतात——

रुसणार मी न आता, जरि बोलशील रागे
ये रागवावयाही, परि येई येईं वेगे.

आईची थोरवी ही जगाच्या आरंभापासून गायिली आहे. आणि ती अंतापर्यंत गायिली जाईल. बापाचे ऋण काशी केल्याने फिटते असे म्हणतात पण आईचे ऋण कधीच फिटत नाही. त्यातील मर्म हेच आहे. आईची ही महती पाहून असे वाटते की जगात जर कुठे ईश्वर असेल, तर तो एकच आहे आणि तो म्हणजे 'आई'. आईमुळे जगाला उत्तम थोर पुरुषांची मदत होते, असे म्हणतात. "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी" ज्या पुरुषाने निःस्वार्थीपणाने देशाची सेवा केली त्या मातेची कूस धन्य झाली. 'आई' म्हणजे साक्षात परमेश्वराची मूर्तिमंत प्रतिमाच. संस्कृतमध्ये म्हटलेच आहे की, "मातृदेवो भव"। आणि "न मातुः पर दैवतम्"। तसेच "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि"।

## मी कोठे – चुकतो बरं ?

१) मी काम करतो पण त्यात राम नाही.

२) मी धर्म करतो पण त्यात मर्म नाही.

३) मी फळ मिळवितो पण त्यात बळ नाही.

४) मी गाणी म्हणतो पण त्यात पाणी नाही.

५) मी संचार करतो पण त्यात विचार नाही.


६) मी हासतो पण त्यात कस तो नाही.

७) हे सगळें मला कळतं पण वळत नाही.

संग्राहक
घनश्याम महादेवराव वंजारी
बी. ए. १

## स्नेहसम्मेलन प्रसंगी मुख्य पाहुणे प्राचार्य लांजेवार (धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर)


अध्यक्षीय भाषण करीत असताना–



व्यासपीठावर डावीकडून अनुक्रमे–
[१] जनार्दन पंचबुद्धे, सहकार्यवाह [२] यादव झलके, कार्यवाह [३] मा. अध्यक्ष ( उभे ) [४] मा. बापुसाहेब लाखनीकर–संस्थापक [५] मा. म. त्र्यं. देशपांडे, प्राचार्य [६] प्रा. रा. आ. ठेंगडी प्रभारी प्राध्यापक.


संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी

मा. अध्यक्षांचा परिचय
मा. प्राचार्य करून देत असताना–



# समर्थ महाविद्यालय, लाखनी

## अन्त्य वाङ्मय स्नातक ( B. A. III )



● १) रघुनाथ नन्हे [संपादक], २) श्री. रा. आ. ठेंगडी [प्रा.], ३) श्री. प्र. श्री. दाढी [प्रा.], ४) श्री. म. त्र्यं. देशपांडे [
५) श्री. प्र. ल. पऱ्हाड [प्रा.], ६) कु. भगवती पटेल ७) कु. शकुंतला खोत

१) केशव वान्ते २) गजभिये ३) जयदेव मेश्राम ४) तुळशीराम नांदगावे [वर्गप्रतिनिधी] ●
५) आनंदराव भेंडारकर ६) खोब्रागडे ७) प्रभुकुनार जांभूळकर

१) मुदाम दोनोडे २) पुरुषोत्तम बोरकर ३) दोनोडे ४) श्रीराम गोमासे
५) नामदेव बनसकर ६) करंजेकर ७) गायकवाड

१) चन्द्रकांत व्यवहारे २) हलमारे ३) श्रीराम मेश्राम ४) रामचन्द्र ठाकरे ●
५) राजेन्द्र लंजे ६) दुलीचंद कोसलकर ७) दुर्योधन रामटेके

छायाचित्राचे वेळी अनुपस्थित विद्यार्थी

१) खरावे २) वुइके ३) सौ. शिदोरे ४) एस्. टी. खरावे ५) डी. डी. मेश्राम ६) उमराव बावनकुळे ७) पुंडलीक बाव

# रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?

एच्. एस्. बान्ते
बी. कॉम्. (अुपान्त्य)

हिंदुस्थानात पसरलेली मुसलमानी सत्ता नाहीशी करून शिवाजी महाराजांनी हिंदुस्थानात हिंदुपतपादशाही निर्माण केली, पुढे संभाजीसुद्धा बापाप्रमाणे शूर निघाले. पण दुर्व्यसनामुळे ते फार काळ टिकू शकले नाहीत. पुढे राजारामाने काही काळ मुसलमानांशी झुंज दिली पण हिंदुस्थानात सर्वत्र भाऊबंदकी निर्माण झाली व अखेर बाजीराव पेशवा नादान, रणभित्रा निघाल्यामुळे हिंदुस्थान धूर्त आणि कपटी इंग्रजांच्या हाती गेला आणि देशात सर्वत्र ख्रिश्चन धर्मप्रसार जोरात सुरू झाला ह्या आंग्लराज्याने शताब्दी पूर्ण केली. धर्माचा समूळ नायनाट होण्याच्या परिस्थितीत भगवान श्रीकृष्णाने गीतेत म्हटल्याप्रमाणे--

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥

अशी परिस्थिती निर्माण झाली. आणि देशात ईश्वराचे अंश असे अनेक स्वातंत्र्यवीर जन्मास आले. त्यांना कळून चुकले की, मुसलमानी सत्ता नष्ट करण्यासाठी शिवाजीची बाजू जरी सत्य आणि न्यायाने भरलेली होती तरी महाराजांना रणात जाऊनच स्वातंत्र्य मिळवावे लागले. माशाने गिळलेला परीस त्याचे पोट फाडल्याशिवाय मिळू शकत नाही हे क्रांतिकारकांना कळले; म्हणूनच १८५७ साली देशात सर्वत्र स्वातंत्र्ययुद्ध झाले. त्यावेळी झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, आणि कितीतरी देशभक्त प्राणास मुकले. या वेळी योग्य समय योजकता, संघटना, शिस्तबद्धता असती तर आपण त्याच वेळी स्वतंत्र झालो असतो. परंतु हिंदुस्थान त्यावेळी स्वातंत्र्यास मुकला. त्यानंतर इंग्रजांनी देशात सुधारणांचा सपाटा सुरू केला. आगगाडी, तारायंत्रे वगैरे सुरू झाले. त्यामुळे साहजिकच अशिक्षित जनतेला इंग्रजी राज्य म्हणजे एक ईश्वरी वरदानच वाटू लागले. याच काळात वासुदेव बळवंत फडके यांनी स्वातंत्र्यासाठी प्रयत्न सुरू केले. पण अशिक्षित लोकांना मूळ कल्पनेपासून परावृत्त करणे त्यांना अशक्य झाले. म्हणून फडक्यांनी रामोश्यांची संघटना करून इंग्रजास त्रास दिला. जिकडे तिकडे इंग्रजास धाक वाटू लागला. खेड्यातील इंग्रज पुण्यात जाऊन राहू लागले. या त्यांच्या कार्यवाहीमुळे सरकारने त्यांना पकडून देणारास १५०० रु. चे बक्षीस जाहीर केले. त्यानंतर त्यांचा पाठलाग सुरू झाला व पुढे १८७९साली 'डेव्हीड' नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याने त्यास पकडले व अखेर १८८३ साली हालहाल केले जाऊन ते मरण पावले.

फडक्यानंतर पंडित रामसिंह कुका यांनी प्रयत्न केलेत. इंग्रजाशी टक्कर देण्यासाठी त्यांनी एक संघटना निर्माण केली. ती पुढे कुका संप्रदाय नावाने प्रसिद्धीस आली. त्यांनीसुद्धा इंग्रजाविषयी द्वेष व भारतमातेसंबंधी स्वाभिमान निर्माण केला. पण सुसूत्रतेच्या अभावी या संप्रदायातील लोकांना सुद्धा तोफेच्या तोंडी जावे लागले.

चाफेकर बंधू आणि सावरकर बंधू यांना तर स्वातंत्र्याचे मुकुटमणीच म्हणावे लागेल,

२२ जूनला हिंदुस्थानच्या दुर्भाग्याने व्हिक्टोरीया राणीचा हीरक महोत्सव समारंभ गणेशखिंडीत गव्हर्नर साहेबाच्या बंगल्यात होणार होता. हा कार्यक्रम मध्यरात्रीपर्यंत चालू होता. अशा सुवर्ण प्रसंगात दामोदरपंत चाफेकरांनी दिवसभर प्रार्थना केली. आणि रात्री धाकटा बंधू बाळकृष्ण याला साहाय्यार्थ घेऊन ते गणेशखिंडीत दबा धरून बसले. रॅण्डसाहेब केव्हा परतणार हे त्यांना माहीत होते. मध्यरात्रीच्या सुमारास रॅण्डसाहेब परतत असताना त्यांची मोटार बंगल्यापासून सुमारे ५०० यार्डावर आली असता वीरश्रेष्ठ दामोदरपंतांनी गाडीमागून चढून रँडसाहेबांना गोळ्या झाडल्या व ते अदृश्य झाले. लगेच आयर्स्ट यांची गाडी आली असता बाळकृष्ण चाफेकरांनी त्यांचा बळी घेतला. लगेच लोकमान्य टिळकांना काम झाले असल्याची वार्ता कळविण्यात आली.

याचप्रमाणे सावरकरबंधूंनी सुद्धा स्वातंत्र्यासाठी अभूतपूर्व कार्य केले आहे. चाफेकरबंधू नी सावरकरबंधू भारताच्या स्वातंत्र्योपासकाच्या दृष्टीने देवतुल्यच ठरले आहेत. एक बंधुत्रयी वधस्तंभावर हौतात्म्याचे अमर चित्र लेखांकित करून गेली. तर दुसऱ्या बंधुत्रयीच्या वाट्याला स्वातंत्र्यलक्ष्मीच्या भावोज्ज्वल मूर्तीवर प्रकाश टाकण्यासाठी आपले जीवन नंदादीपाप्रमाणे सतत तिळतिळ जाळण्याचे त्याहूनही अधिक दारुण वृत्त झाले. हा नियतीचा संकेत म्हटला पाहिजे. सावरकर तुरुंगात असताना त्यांनी आपल्या वहिनीला पाठविलेल्या पत्रात म्हणतात—

> "हे काय बंधु असतो जरि सात आम्ही।
> त्वत्स्थंडिलीच असते दिधले बळी मी ॥
> दीप्तानलात निजमातृविमोचनार्थ ।
> हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलो कृतार्थ" ॥

यानंतर रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांनी हिंदुधर्माविषयी लोकात जागृती केली. त्यामुळे इंग्रजांना जगणे कठीण होऊ लागले. आणि म्हणून हिंदुस्थानातील नेत्यांनाच हाताशी धरून १८८५ साली मि. ह्यूम यांनी काँग्रेसची स्थापना केली. पुढे यातही मतभेद होऊन जहाल आणि मवाळ पक्ष निर्माण झाला. १९२० साली जहाल—पक्षाचे पुढारी लोकमान्य टिळक मरण पावले. आणि देशाचे राजकारण मवाळ पक्षाकडे गेले. त्यांनी शांतता आणि अहिंसेचा मार्ग धरून स्वातंत्र्य मिळविण्यास सुरुवात केली. इंग्रजी कायद्यावर बहिष्कार करण्यात आला. १८५७ पासून तर १९४७ पर्यंतचा काळ हा असा एकसारखा देशजागृतीत गेला. आणि साहजिकच जनता जागृत झाली. त्यावेळी इंग्रजांना हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यापलीकडे कोणताही तरणोपाय उरला नाही. आणि म्हणून १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपण स्वतंत्र झालो. त्याच स्वातंत्र्यास आपले पुढारी रणावाचून आणि रक्तपातावाचून मिळालेले स्वातंत्र्य म्हणतात; परंतु हे योग्य आहे काय? एखाद्या मोठ्या दगडाला जमीनीतून काढण्यासाठी अगोदर त्याच्या सभोवतालची जागा खोदून काढावी लागते व नंतर तो दगड आपल्या हातात येतो. त्याचप्रमाणे अनेक क्रान्तिकारकांनी ह्या स्वातंत्र्यरूपी दगडाला अनेक घाव घातले आणि घाव घालतानाच ते मरणसुद्धा पावले. पण अशा अनेक आघातांनी तो खिळखिळा होऊन एक वेळ अशी आली की, तो स्वातंत्र्यरूपी दगड एका लहानशा घावाने बाहेर निघाला. या प्रकाराला आपण रक्तपातहीन स्वातंत्र्य म्हणू शकतो काय? यानंतरची परिस्थितीसुद्धा अतिशय भयंकर आहे. ज्यावेळी फाळणी झाली त्यावेळी अनेक लोकांना प्राणास मुकावे लागले. दिवसाढवळ्या आपल्या आई—बहिणींची भर रस्त्यावर बेअब्रु होत होती. पाकिस्ताननिर्मितीचे पाप आपण अजूनसुद्धा भोगत आहेत. आणि पुढे देखील भोगावे लागणार आहे. पाकिस्तान जर निर्माण झाला

नसता तर आपण ताश्कंद करार केला नसता आणि अर्थातच आपल्या प्रिय शास्त्रीजी-सारख्या नेत्याला मुकलो नसतो अशाप्रकारे आपसात झगडे लावून इंग्रज निघून गेले. ते काय आपल्याला शांततेने म्हणता येईल काय ? तर आपल्यास ते शांततेने म्हणता येणार नाही.

आणि म्हणूनच म्हटले आहे की, आपल्याला रणाशिवाय आणि रक्तपाताशिवाय स्वातंत्र्य मिळाले नाही आणि कोणालाही ते मिळू शकत नाही.

रणावाचून आणि रक्तपातावाचून स्वातंत्र्य मिळाले अशा भ्रामक कल्पनेत गुंग असणाऱ्यांना स्वतंत्र भारताची कदर वाटत नसावी काय ?

" माणसाचे मोल त्याच्या रूपावर किंवा त्यांनी मिळविलेल्या पदव्यावर नसतं तर त्याची अंतर्यामी माणुसकी ज्या प्रमाणात असेल त्यावर त्याचा चांगलेपणा असतो व त्याचेच खरे मोल."

* * *

विस्तव विझवायचा तर पाणी ओतावे, अंधार पडला तर दिवा लावावा ह्या गोष्टी कोणाला समजत नाही ? आणि जर ह्या गोष्टी समजतात तर दुष्टाला प्रेमाने जिंकावे, बुराईला भलाईने जिंकावे नि खोटचाला खऱ्याने जिंकावे.

* * *

"लक्ष्मी बरेचदा दार ठोठावीत असता मूर्ख माणसे दार उघडण्याची तसदी घेत नाहीत." (डॅनीश म्हण)

* * *

"चांगल्या कायदयांपेक्षा चांगल्या न्यायाधीशांची अधिक आवश्यकता आहे." (रशियन म्हण)

* * *

"म्हातारे जे करु शकतील ते तरुण करु शकणार नाहीत" (काश्मीरी म्हण)

* * *

"गुलामाप्रमाणे काम करणारा मनुष्यच राजासारखे खातो." (पंजाबी म्हण)

संग्राहक : तेजराम भुरे

# Dr. Babasaheb Ambedkar

–R. D. Shamkuor
B Com. II (Jr.)

" Thy life was like a star
That rose to guide the millions."

Every country produced great men who are hard-working as well as patriotic. Dr. Babasaheb Ambedkar belonged to such line of such men. He was one of the greatest leaders of mankind. He was born on April 14th 1891 at Mahu in Maharashtra State. He was the 14th child of his parents, Ramaji and Bhimabai. He lost his mother, when he was hardly six years old. Dr. Babasaheb sprang up from one of the low castes. His full name was Bhimrao Ramaji Ambewadekar. He passed his childhood amidst many troubles and difficulties. His school life was passed by him similarly. He had read a book on the life of the great Buddha and was greatly influenced by his teachings.

He started his educational career in Satara and thereafter in Bombay. After his graduation, he left for the United States, with great help rendered by the late Shri Shahu Maharaj, Chhatrapati of Kolhapur and the late Shri Sayajeerao Maharaj Gaikawad of Baroda. After a stay of three or four years in the U. S. A he went to London. Afterwards he went to Germany. After getting his doctorate there, he returned to India.

After his graduation he got into service at Baroda.His short stay at Baroda was very unhappy. During his student career, he was humiliated at the hands of the high caste Hindus. Really, his life was very miserable. He observed, with pain, the social life of the downtrodden untouchables. He made up his mind to serve the just cause of these people. These people had lost their self-respect. His pity for them, gave him strength and courage.

During his second visit to America he obtained the L L.D. degree. As a great scholar, he came across many hardships. For him library was a useful means of education. After his return from America he started his practice in a Court. He was insulted in the Court, as he was an untouchable. He could not get, therefore, cases to plead in the Court.

He arrived at a stubborn determination to dedicate himself to the cause of the untouchables. He started his fight for his social and political rights. Sometimes he was punished with Lathies and stones.

Dr. Babasaheb Ambedkar was a versatile personality. We always remember him not only as a social reformer and as a great educationist but also as a very famous constitutionalist. In fact he was one of the makers of our constitution. To many, he is the modern Manu.

He fought for equality. He never hoped, that our caste system would vanish from our soil. He felt terribly to disguested

and frustrated. He decided to die not as a Hindu. As a result, he adopted Buddhism as his sole religion. According to him, man but not miracle is the test of true religion.

He contributed a lot to the development of our education. He dedicated all his efforts to education and founded 'The People's Education Society ?'

On October 14th 1956, Dr. Ambedkar became a converted Buddhist. He gathered his followers everywhere and in a large number. He was a Fillip to the depressed classes of India. He was a destiny-maker.

In fact, 6th of December was a very bad day for our country. On that day this great leader breathed his last. This patriot of India will be immortal in the hearts of our people. To conclude, he was one of those men who have created our golden history.

(1) A man is a social animal; if he is not social, he is animal.

(2) Some fools make foolish love with other fools, and we fools pay to see that in pictures.

(3) One can be soldier without dying and one can be a lover without sighing.

(4) An enemy cannot be convinced, and a friend need not be covinced.

(5) The first of the first is the first of you,
The first of the last is the last of you, In between these are
Zeroes two,
Please, let me know who are you ?

Ans –[ Fool ]

* * * *

Remember that the most beautiful things in the world are the most useless peacocks and lilies for example.

—John Ruskin

* * *

A good deed is better done,
Which, having done, one does not later repent.

–Bhagavan Buddha

# SELF-CULTURE

–by A. V. Subramanyam
Lecturer in English

"The best part of every man's education is that which he gives to himself," said Walter Scott. The education rendered in schools or colleges is just a beginning for training our minds to the continuous application of study. But knowledge earned by individual labour becomes a possession. The best teachers have always emphasized on the importance of self-culture and tried to make their pupils take active interest in cultivating self-education.

Work educates the body as much as study educates the mind. So work and study are the two instruments through which we can develop our self-culture. Mental self-culture is hard work combined with trained application of knowledge gained through intensive study of books. It is impossible to acquire without labour as it is foolish to expect harvest without sowing the seed. Excellence is never granted to you but as a reward of industry. If you have great talents industry will improve them, if you have moderate abilities, industry will supply to defficiency.

Self-culture can also be acquired through study. Thoroughness and accuracy are the two principal objectives to be aimed at in prosecuting study.

The value of knowledge does not consist in the quantity of matter you collect from books but in its proper application to solve your day to day problems. A little knowledge of an exact nature is more valuable than any extent of superificial knowledge. Books of great authors are useful guides for us to develop our knowledge and self-culture. Read and understand them thoroughly. But remember that experience gained from books is learning, whereas the experience gained from actual life is wisdom. Therefore always learn to be wise.

To conclude self-culture may not end in eminence, may not bring in wealth, but it will surely give us the good company of elevated thoughts. A nobleman once contemptuously asked of a sage "what have you got by all your philosophy". "At last I have got society in myself" was the reply of the sage. So try to develop in you a cultured society through work and study when only you can appreciate the spirit of the maxim "knowledge is power".

# देशो के प्रति विद्यार्थिओं के कर्तव्य

एम्. एस्. बुलबुले, बी. कॉम. II [ ज्युनि. ]

आज हमारा भारत देश स्वतंत्र है । हर विद्यार्थीका आज यह कर्तव्य है कि, वह अपने देश की स्वतंत्रताकी रक्षा करें तथा देशकी प्रगति के लिए प्रयत्न करें ।

आजके विद्यार्थी कल के नागरिक हैं । देशकी सर्वांगीण उन्नति उन्हींपर निर्भर है । और यह काम विद्यार्थियोंसे उसी समय संभव होगा जब की उनपर उनके शिक्षणकालमें अच्छे संस्कार पडे हो । देश के प्रति विद्यार्थिओंके कर्तव्य क्या है इसका अच्छा विचार करना चाहिए । इसिलिए हर विद्यार्थीको उत्तम ढंगसे शिक्षा ग्रहण करना आज आवश्यक है ।

आजतक हमारा इतिहास साक्षी है की, हमारे विद्यार्थियोंने समय समयपर स्वतंत्रता-आंदोलनमें सक्रिय भाग लेकर विदेशी शासनका डटकर मुकाबला किया। किंतु स्वतंत्रता प्राप्तिके पश्चात् स्थिति बिलकूल बदल गई । आजका विद्यार्थी सही माने तो विद्यार्थी नहीं रहा । उसका ध्यान अन्य बातोंपर केंद्रित हो रहा है । वह अपनी पढाईको महत्त्व न देकर फिजूल वक्त की बरबादी करनेपर तुला है। वह समाज में समाजिक दृष्टीसे हीन प्रतीत हो रहा है । तथा उसने स्वयं का अस्तित्व खो दिया है । इन्हीं विचारोंसे आजका विद्यार्थी समाजके दृष्टिसे गिरता जा रहा है। यह विद्यार्थी के लिए अशोभनीय है । आज हमें देशोन्नतिके लिए विद्यार्थियोंके नियमित योजनाबद्ध कार्योंकी आवश्यकता है । अतएव विद्यार्थियोंने अपने अध्ययनकी ओर पुरा पुरा ध्यान देकर देशकी एकमात्र कामना को पुरा करनेका बिडा उठाना चाहिये ।

देश के प्रति विद्यार्थियोंके कर्तव्य और भी है । जब कठिण समय पड़ता है तब देशमें एकता का निर्माण होना आवश्यक है । यह एकता कोई बाजारी वस्तु नहीं कि, कोई भी उसे बाजारसे खरीद सके । एकता विद्यार्थियोंमें होना आवश्यक है । ताकि वे एक मिसाल सिद्ध हो सके । विद्यार्थियोंको अनुशासनमें रहना सिखना चाहिये ।

योग्य अनुशासनका यह आदर्श विद्यार्थी जीवनका एकमात्र प्रतीक है । विद्यार्थियोंको वास्तव में भारतका उज्ज्वल भविष्य निर्माण करना है । किन्तु उसके पहले उन्हें स्वयं अपने व्यक्तित्वका पुरा पुरा विकास करना चाहिए । दुसरों के हितोंका अच्छी तरह ध्यान रखना चाहिए । साहस और उदारतासे कोईभी काम करना चाहिए । जब विद्यार्थी इन सभी गुणोंसे सुशोभित होंगे तो देशकी उन्नति होगी ।

इस प्रकार देशकेप्रति विद्यार्थियोंके कर्तव्य देशका रक्षण करना या उसकी उन्नति के लिए प्रयत्न करना यही उनके जीवनका प्रमुख कर्तव्य है ।

विद्यार्थी से आज समाज कुछ उम्मीद करता है। उसे पुरा करना उसका कर्तव्य है। देश-ऋण या मातृऋण चुकाना उसका फर्ज है। और इस पुनीत कर्तव्यको निभाना उसका महान् धर्म है। हमारी भारतभूमिपर चीन तथा पाकिस्तान जैसे शत्रु आँखे गड़ाये बैठे हुए हैं। विद्यार्थी अपना संगठन करके N. C. C. का 'ट्रेनिंग" प्राप्त कर सकते हैं। और इन्हींमें से उत्तम "कमांडर" तथा "लेफ्टनंट" आदि सुरमाओंका उदय हो सकता है।

विद्यार्थी देश का आधारस्तंभ है । यदि यह आधारस्तंभ दुर्बल हो तो देशकी हालत किसी भी समय बिगड़ सकती है । अतएव विद्यार्थीका चरित्र ऊँचा होना चाहिए । ताकि देश का भी नाम ऊँचा हो सके । विद्यार्थियोंने अपने गुरुजनोंका आदर करना चाहिए। विद्यार्थी-ने इन सब बातोंको ध्यान में रखना चाहिए । और मातृभूमि की रक्षा करनी चाहिए तथा आदर्श बनना चाहिए ।

# उत्तर भारताची सहल

केशव बान्ते
बी. ए. अन्त्य

दिल्ली, दिल्ली, दिल्ली ! फक्त नावच ऐकले होते या शहराचे आणि ऐकीव वर्णन ! बरेचसे मित्र दिल्ली, आग्रा वगैरे ठिकाणी जाऊन आल्याने तिच्या वैभवाविषयी महती गात; त्यांच्या तोंडून ह्या शहराविषयी गोष्टी ऐकल्या की आपणही एकदा त्यांना भेट द्यावी असा विचार मनाला चाटून जाई.

बऱ्याच दिवसांनी का होईना पण भविष्यावर विसंबून न राहता दिल्लीदर्शनाची संधी मिळाली आणि ती विद्यार्थीजीवनातच.

आम्ही आपल्या महाविद्यालयातर्फे उत्तर भारतातील प्रेक्षणीय व ऐतिहासिक स्थळे पाहण्याकरिता दिनांक २८-१०-६८ ला लाखनी-वरून निघालो. आम्ही आपला पहिला मुक्काम भोपाळ येथे ठोकला. येथे बिरला यांनी बांधलेले बिरला मंदिर पाहण्यासारखे आहे. मंदिर संगमरवरी दगडांनी बांधलेले असून त्यावर गीता कोरून लिहिली आहे. तसेच सचिवालय, लहान तलाव, मोठा तलाव वगैरे पाहण्यासारखे आहेत.

आम्ही आपला दुसरा मुक्काम सांचीला केला. तेथे बुद्धकाळात बांधलेला भव्य दगडी स्तूप पाहण्यासारखा आहे.

तेथून आम्ही झांशीला गेलो. तेथे प्रसिद्ध राणी लक्ष्मीबाईचा किल्ला बघितला. हा किल्ला बुंदेल राजा वीरसिंग यांनी १६१० मध्ये बांधलेला आहे.

नंतर आम्ही पुढचा मुक्काम ग्वाल्हेरला ठोकला. तेथील किल्ला पाहण्यासारखा आहे. तसेच चिडीयाचा महाल इ. स्थळे पाहण्यासारखी आहेत.

ग्वाल्हेर वरून आम्ही आग्रा येथे येऊन पोहचलो. तेथील ताजमहालचे आतापर्यंत निव्वळ वर्णन ऐकले होते; पण जेव्हा प्रत्यक्ष पाहिला तेव्हा एकदम थक्कच झालो. शहाजहानने आपल्या पत्नीची समाधी ताजमहालच्या रूपाने यमुनेच्या काठावर बांधलेली आहे. इमारत संगमरवरी दगडांनी बांधलेली असून त्यावर कुराण लिहिलेले आहे. त्यात इराणवरून आणलेले रंगीत दगड फसविले आहेत. ते चंद्राच्या प्रकाशात चमकतात. तेथे मधोमध शहाजहानची पत्नी मुमताजची समाधी असून बाजूला शहाजहानची समाधी आहे,

लाल किल्ला, अकबरका मकबरा वगैरे ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. त्याचप्रमाणे तेथे राधास्वामींची समाधी पाहण्यासारखी आहे. ही समाधी तेथील एक मारवाडी १९०४ पासून बांधीत असून पहिलाच मजला पूर्ण व्हायचा आहे. ही समाधी संगमरवरी दगडांचीच असून ताजमहाल पेक्षाही सुंदर होईल असे म्हणतात.

नंतर आम्ही मथुरेला गेलो. मथुरा हे शहर यमुना नदीच्या काठावर असून श्रीकृष्णाचे जन्मस्थान आहे. तेथे अनेक मंदिरे आहेत, तसेच श्रीकृष्णांनी कंसाला मारून ज्या यमुनेच्या घाटावर विश्राम केला होता त्याला चिर किंवा विश्राम घाट म्हणतात. ह्या पवित्र घाटावर अनेक लोक स्नान करतात. तसेच तेथून जवळच ६ मैलावर वृंदावन आहे. हे सुद्धा

पवित्र क्षेत्र आहे. कालिया डोह; रंगजीका मंदिर; जयपूरचा राजा मानसिंहानी १५९० मध्ये बांधलेले श्री गोविन्ददेव मंदिर, मदन मोहन मंदिर, राधिकेचे क्रीडा-क्षेत्र म्हणजेच निधिबन, बिरला मंदिर, द्वारकाधीश मंदिर, नन्दबाबा मंदिर, कांच मंदिर, मानसी गंगा मंदिर इ. अनेक भव्य मंदिरे पाहण्यासारखी आहेत.

नंतर आम्ही दिल्लीत येऊन पोहोचलो. मुसलमान व इंग्रज अशा दोन भिन्न संस्कृतींच्या राजांनी दिल्लीत राज्य केले व ह्या दोघांनीही आपापली प्रतीके ठेऊन ते निघून गेले. मुसलमानी राजांचे प्रतीक म्हणजे जुनी दिल्ली आणि इंग्रजांची राजवट सध्याच्या नवी दिल्लीत होती.

प्रथम आम्ही गाईड बसनी श्री लक्ष्मी-नारायण मंदिर पाहावयास गेलो. हे एक सुंदर प्रेक्षणीय मंदिर आहे. त्याचे बांधकाम व देवा-धर्मांची चित्रें फारच सुंदर आहेत. हे मंदिर घनश्यामदास बिरला यांनी १९३८ मध्ये बांधले या मंदिरापासून सुमारे १½ मैलावर बिरला भवन आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी येथे शेवटची प्रार्थना केली. ते पवित्र ठिकाण आम्ही पाहिले. या ठिकाणाचे दर्शन घेताना महात्मा गांधींची आठवण झाली. आणि डोळचांत अश्रू आले. येथे फक्त तुळशी वृंदावनासारखा ओटा असून त्यावर "हरे राम" असे लिहिले आहे. तेथून आम्ही जवळच असलेले जंतर-मंतर पाहावयास गेलो. राजा मानसिंहाने १७२४ मध्ये बांधलेली जुन्या प्रकारची ही वेधशाला आहे.

लोकसभागृहाकडे जाताना रस्त्यात आकाशवाणी केंद्र आहे. All India Radio हे आशियातील सर्वांत मोठे रेडिओ स्टेशन आहे. येथून जवळच असलेले भारताचे सचिवालय १९३० मध्ये सर हारबर्ट बाफेर यांनी लाल दगडांनी बांधलेले आहे. नंतर लोकसभागृह Parliament House पाहिले.

नंतर आम्ही राष्ट्रपतिभवनाकडे गेलो. हे संगमरवरी दगडांनी बांधलेले आहे जवळचे 'मोगल उद्यान' विशेष प्रेक्षणीय आहे.

नंतर आम्ही तेथून कुतुबमिनार पाहा-वयास गेलो. याची उंची २३८ फूट असून त्याला ३७१ पायऱ्या आहेत. मिनाराच्या पायथ्याचा व्यास ६० फूट आहे. वरून दिल्ली शहराचे दृश्य प्रेक्षणीय आहे व खालील लोक बदका-सारखे दिसतात. मिनारावर चढताना जी मजा वाटली ती अवर्णनीय आहे.

राष्ट्रपतिभवनासमोरच सुमारे १ मैला-वर इंडिया गेट आहे (India Gate) हा दरवाजा १९१४ मध्ये झालेल्या जागतिक महा युद्धात मेलेल्या भारतीय सैन्यातील शिपायांची आठवण म्हणून बांधलेला आहे.

नंतर आम्ही चिडियाघर पाहावयास गेलो. हा पांडवांचा "इंद्रप्रस्थ" म्हणजेच जुना किल्ला जवळच आहे. यांचे क्षेत्रफळ २५० एकर असून अनेक प्रकारचे प्राणी यात आहेत.

तेथून सरळ मार्गाने आम्ही "राजघाट" गांधीजींची समाधी, "शान्तीवन"–नेहरुजींची समाधी, "विजयघाट" शास्त्रीजी यांच्या समाधीचे दर्शन घेत गेलो.

तेथून आम्ही कै. लाल बहादूर शास्त्री-जींच्या घरी गेलो. त्यांचे राहण्याचे घर म्हणजे साध्या माणसाच्या घरासारखे दोनच खोल्यांचे आहे. तेथे सध्या त्यांच्या पत्नी ललिता देवी शास्त्री राहतात. त्यांना आम्ही भेटलो.

नंतर आम्ही नेहरुजींच्या निवासस्थानी गेलो. त्याला तीनमूर्ति–भवन म्हणतात. नेहरुजींच्या वस्तू जशाच्या तशाच अजून ठेवलेल्या आहेत तसेच तेथे त्यांच्या मृत्यूपासून सतत एक ज्योत जळत ठेवली आहे.

नंतर आम्ही सरळ लाल किल्ला पाहण्या-साठी गेलो. हा किल्ला शहाजहान बादशहाने १६५० मध्ये बांधलेला आहे. हा किल्ला पूर्ण लाल दगडांनी बांधलेला आहे. तसेच जवळच असलेली जामा–मशिद पाहण्यासारखी आहे. त्याचप्रमाणे चांदणी चौक, कॅनॉट सर्कल पाहण्यासारखे आहेत.

नंतर आम्ही सर्व विद्यार्थी व प्राध्यापक मिळून दिल्ली–मद्रास जनतेनी दिनांक ८।११।६८ ला परत आलो.

# समर्थ महाविद्यालय !

हे समर्थ महा विद्यालय जणु मूर्तिमंत विद्येचे आगर,
इथ स्वयम् शारदा माता उधळिते ज्ञान सर संहिता सागर,
तो समर्थ कुणि संस्थापक अवतार रामचंद्राचा किंकर,
तो ज्ञान प्रसारिक ज्ञाता लाखणीस कुणितरी होता सुंदर,
चाल– जाहले, नवल पाहिले, अचुक घडविले,
धन्य हे गाव, धन्य हे नाव,
हे समर्थ विद्यार्थ्यांचे मंदिर ॥ १ ॥

वंदुनी सुविद्यालय हे श्री राम समर्था गाऊ चिंतनी,
या समर्थ कीर्ति–ध्वजेची यश–गाथा उज्ज्वलतेची प्रेरणी,
हे सुंदर विद्या–मंदिर आदर्श दर्शनी थोर भूषणी,
तुम्ही आम्ही जाऊ राहु युग युग युगी वैभव पाहू रंगुनी,
चाल– हे रूप-स्वरूपि अनुरूप-ज्ञान सुखरूप,
लाखनी मान, विश्व विज्ञान,
हे ज्ञान-छत्र विद्येच्या, प्रांगणी ॥ २ ॥

हे सत्त्व शील तेजाचे सामर्थ्य समर्था घरचे लाभले,
विद्यार्थी गण बंधूचे प्राध्यापक सह-कार्याचे योजले,
हे मेळ खेळ विद्येचे प्राविण्य कलाकुसरिचे निर्मिले,
हे भूषण महाराष्ट्राचे इथ सारे वीर उदयाचे गुंफिले,
चाल– हा काळ, पुढे ती वेळ, पुन्हा येईल,
भाग्य उदयास, हीच मनि आस,
गातिल हे जन गुणनाम, मानिले ॥ ३ ॥

विदर्भ कवि
**तात्याराव काळे, नागपूर**

# राखी

मानवतेचे प्रेम विलसते 'राखी' ह्या शब्दात ।
बंधुभगिनीचे जुळते नाते मानवी मनात ॥
अमर प्रीतीची अमर कहानी आठवुनी यादिनी ।
मन हे फुलते हृदयी भरते बंधुत्वाच्या गीतांनी ॥ १ ॥
एक वेलीची दोन बालके असता दोघेजण ।
सुदिनि आजच्या करी बांधते प्रीती ओळखण ॥
बंधुप्रीतीची अमर घडण ही राखीच्या लेण्यात ।
अमर कृतींची संस्कृती प्रतीत होई तीत ॥ २ ॥
कुणी देइ तिज रंग गुलाबी, कुणी हरित पांढरा ।
विभिन्न रंगांतून नांदतो एकच रेशमी दोरा ॥
बंधुप्रीतीचे अमर गीत ते राखी ह्या शब्दात ।
अफाट सागरी संसाराच्या मानव भुलला त्यात ॥ ३ ॥

**आ. द. भेंडारकर**
बी. ए. अन्त्य

# भारताच्या मुला

भारताच्या मुला !! कशी झोप लागली तुला ?
ऊठ वीरा उभा रहा । गवस समशेरीला ॥धृ॥
जगीं जन म्हणती । हे असे कसे झाले !!
भारताचे दिव्य तेज । आज कोठे लपले ?
नको राहू लेचापेचा । नको भीक घालू याला ॥ ऊठ वीरा ॥ १ ॥
जननी जन्मभूमी आहे । स्वर्गाहूनी श्रेष्ठ ॥
तत्पर राहा । तिच्यासाठी करावया कष्ट ॥
पडशिल जरी रणी । तरी पोहचशील स्वर्गाला ॥ ऊठ वीरा ॥ २ ॥
कमी नको लेखू । तिने जगाला शिकविले ॥
अज्ञानी जगाला । ज्ञान-दीप दिले ॥
आठव पूर्वजांना । आणि त्यांच्या विक्रमाला ॥ ऊठ वीरा ॥ ३ ॥
सिंहाचा छावा तू । दडत कसा राहतो ॥
मांजरांच्या पोरामध्ये । शिव्याशाप घेतो ॥
हे शोभते का तुला ? तुझ्या ह्या शौर्याला ॥ ऊठ वीरा ॥ ४ ॥

**दे. भा. निर्वाण**
(बी. कॉम. प्रथम वर्ष)

## असणारच . . . . .

वृक्ष तिथे छाया
मानव तिथे माया
असणारच...

पाप तिथे पुण्य
माती तिथे कण
असणारच...

पृथ्वी तिथे पाणी
समुद्रात जलचर
असणारच...

राम तिथे सीता
बाळ तिथे माता
असणारच...

चांगले तिथे वाईट
चिखलामध्ये कमळ
असणारच...

शक्ती तिथे मस्ती
देव तिथे भक्ती
असणारच...

जय तिथे पराजय
भारत तिथे विजय
असणारच...

लालचंद्र मेश्राम
बी. ए. (द्वितीय)

## व्यथा

विजेचे काहूर
निळ्या अंबरात
माझ्या अंतरात
व्यथा तुझी ॥१॥

वनातून गर्द
भरे अन्धकार
माझेही मानस
उदास तुझ्यामुळे ॥२॥

तार ती भंगता
थांबवी झंकार
तुझ्यावीण सुर
लुप्त माझा ॥३॥

हिमगिरी तेजे
करी तगमग
मनात वियोग
तुझ्यामुळे ॥४॥

कंपित ओंजळ
जैसी जल साडी
तैसी तनु सोडी
पाहे आत्मा ॥५॥

दीप विझविता
पतंगाला व्यथा
माझी तीच कथा
कशी सांगू ॥६॥

माधव सन्तारामजी भुसारी
बी. कॉम्. (प्रथम वर्ष)

स्व. लाल बहादूर शास्त्रीजींना

# अमुचे नम्र प्रणाम

जय जवान, जय किसान हा मंत्र ऐकता
धन्य जाहली भारत–जनता
अशा आमुच्या शास्त्रीजींना
अमुचे नम्र प्रणाम ॥१॥

भारत-पाक शांतीची करू गर्जना
ज्यांची अशी ही मनोकामना
अशा आमुच्या शास्त्रीजींना
अमुचे नम्र प्रणाम ॥२॥

करुनी ज्यांनी अखंड कर्म
उजाळिले गीतेतील मर्म
अशा आमुच्या शास्त्रीजींना
अमुचे नम्र प्रणाम ॥३॥

चंदनसम ही निर्मल सेवा
अर्पुनी, भूषविले भारत भूला
अशा आमुच्या शास्त्रीजींना
अमुचे नम्र प्रणाम ॥४॥

रवि, शशी जरी जातिल अस्ता
कीर्ती-दीप राहील नांदता
अशा आमुच्या शास्त्रीजींना
अमुचे नम्र प्रणाम ॥५॥

गु. ना. मेन्ढे
बी. काम्. पार्ट २

# जीवन माझे

जीवनातल्या लाटावरचा
मी प्रवाशी नावाडी
पैलतीरावर कशी वल्हवीन
मी आपुली जीवनहोडी ॥१॥

प्रत्येक लाट भासविते मजला
असमर्थ रे तू क्षुद्र जीवा
अफाट जीवनसागर तुजला
भासवील जड अशक्य क्षणाक्षणा ॥२॥

लाटा येती काही चांगल्या
सुखकारक नी प्रोत्साहित करणाऱ्या
अशक्य ते शक्य घडून येते
उत्साह उमेद भरतीला जाते ॥३॥

काही लाटा अफाट असती
ध्येयदृष्टिला पार अडविती
विचलित न होता सिद्ध राहतो
प्रसंगावधाने लाटेवर त्या मात करतो ॥४॥

जवळ येता ध्येयपूर्तीचा काळ
स्मरतो पुन: निज जीवन-पथ
कधी पोहोचेन त्या क्षणाते
वाटे क्षणभंगूर जीवन माझे ॥५॥

यादव झलके
बी. कॉम्. (अन्त्य)

## तीर्थांचा सागर

जयजयकार असे महाराष्ट्राचा
मान मिळाला धवल कीर्तीचा
साक्षात्कार इथे इतिहासाचा
सागर शोभे जणु तीर्थांचा ॥१॥

गोदा-कृष्णा संगम प्रीतीचा
पंढरीस आला महिमा काशीचा
महाराष्ट्र बहुगुणी थोर मनाचा
मान मिळाला तया तीर्थांचा ॥२॥

इथे ना जातीपातीची बंधने
असती साधी-भोळी मराठी मने
साक्ष देती तयाची निबिड मने
सागर गातो स्वच्छंदी गाणे ॥३॥

अमृतापरी गोड आमुची भाषा
स्तुती स्तोत्रें गाता उजळते निशा
स्वर्गसुख अनुभवतो सागर तीर्थांचा
पायगुण असे "काळचा" मातीचा ॥४॥

शूराच्या देशा, धैर्याची तू खाण
परचक्राशी करू सामना उडवू दाणादाण
शांत जरी चहुकडे, घुमते आजि तुफान,
तीर्थांच्या सागरा तुला कोटीकोटी प्रणाम॥५॥

–मारोती गरपडे
बी. कॉम्. अन्त्य

## तरुण मने

तरुणपणाच्या उंबरठ्यावर
असती तरुण–तरुणीही जोवर
स्वप्ने करिती मनात काहूर
कधी कुठे मज मिळेल सुस्वर ॥१॥

तरुणपणाच्या उंबरठ्यावर
वाढत असला तरुण जोवर
कादंबरीची ओढच तोवर
मिळेल शांती मनास जोवर ॥२॥

तरुणपणाच्या उंबरठ्यावर
वाढत असली तरुणी जोवर
ध्यास धरी ती मनात तोवर
मिळेल कधी मज आतुर प्रियकर ॥३॥

तरुणपणाच्या उंबरठ्यावर
वाढत असला तरुण जोवर
स्वप्न रंगते मनात तोवर
मिळेल कधी मम प्रेयसी सुंदर ॥४॥

तरुणपणाच्या उंबरठ्यावर
वाढती तरुण-तरुणीही जोवर
आकांक्षा ह्या फुलती तोवर
मधुर मीलन न होत परस्पर ॥५॥

कवि : आर. व्ही. ठाकरे
बी. ए. फायनल

## दोन घडीचा डाव

दोन घडीचा डाव . . .
क्षणांत हसते, क्षणांत रडते
'जीवन' याला नांव ॥धृ॥
अथांग ऐशा खोल सागरी
आयुष्याला भरती ये जरी
वादळ होई क्षणोक्षणी ते
डुलते तरीहि नाव ॥१॥
शुभ्र चांदणे नित पुनवेला
क्षिती येतसे तरीहि चंद्राला
लपंडाव हा आयुष्याचा
'जीवन' याचे नांव ॥२॥
रहाट फिरते आयुष्याचे
सौख्य कधि अन् दुःखहि यायचे
दैवाने हा खेळ मांडला
नसे कुणाला ठाव ॥३॥

–माधव भुसारी
बी. कॉम्. (प्रथम वर्ष)

## प्रीत

गुलाबी तुझा सुंदर शालू ।
नक्षत्रांची त्यावर वेली ॥
झुळझुळ उडे वाऱ्यावर तो ।
साक्ष देतसे प्रीत हावरी ॥१॥
फुलले दिसती तुझे अधर ते ।
गुलाबाची देत प्रचीती ॥
परिमल मिलींद घेऊन जाती ।
ठेव ठेवूनी अमर प्रीतीची ॥२॥

–आ. द. भेंडारकर
बी. ए. (अन्त्य)

## भास . . .

तुझी आठवण होता
मन माझे विव्हळते
उषेच्या उदयापूर्वी
प्रभाच दिसू लागते ॥ १ ॥
भर उन्हांत होताना
भास सारखा संध्येचा
संध्येच्या निवांत वेळी
वाटे, अंधार रात्रीचा ॥ २ ॥
झोपडीसम वाटत–
आहे, विशाल महाल
कधी ग होणार, माझा
जीवनाचा उषःकाल ॥ ३ ॥

राम धुले
उपान्त्य वाणिज्य स्नात
(B. Com. II)

## घायाळलेल्या मनाचे

मुखावरील तो भाव
झाला मीलनाने कसा !
बहरलेल्या बागेत
फुलला गुलाब जसा ॥१॥
क्षणाक्षणात चालतो
नाजुक चंचल खेळ
पाकळी एकेक गळता
होई हृदय घायाळ ॥२॥
घायाळलेल्या मनाचे
घाव धुवाल ते कसे ?
मऊ कुंतल कुरळे
हळु फिरवावे जसे ॥३॥

माधव भुसारी
बी. कॉम्. (प्रथम)

# ना ट्य

## मुंग्यांची दुर्दैवी रांग

**दयाराम दौलतजी चौधरी**, वाणिज्य प्रथम वर्ष

(पावसाळच्यात तरतूद म्हणून धान्य साठविण्याची वृत्ती मुंग्यांमध्ये दिसून येते. अशा मुंग्यांच्या रांगा आपण पुष्कळदा पाहतो. अशाच एका रांगेत एका मुंगळचाने प्रवेश केला असता एक मुंगळा व एक मुंगी यांच्यात झालेला मजेदार संवाद–)

**मुंगी**–कुणी मला धक्का दिला ?

**मुंगळा**–मी ! तुझा प्रिय मुंगळा !

**मुंगी**–शी ! लाज कशी नाही वाटत तुम्हाला ? लोक काय म्हणतील ? बायकांच्या रांगेत तुम्ही कसे हो ?

**मुंगळा**–अरेच्या ! ही बायकांची रांग नाही का ! माझ्या लक्षातच नाही.

**मुंगी**–बरेच उल्लू दिसता तुम्ही ? चला, पळा इथून. पाहता काय माझ्या तोंडाकडे.

**मुंगळा**–तुझ्या तोंडात काय आहे ते बघतो. साखरेचा कण की रवा–

**मुंगी**–वेड लागलंय तुम्हाला ! अहो कुठची साखर आणि रवा ! आजकाल हे जिन्नस तर माणसाला मिळणे कठीण आहे, तिथे आमचा कुठे टिकाव ! जवळ जवळ ९ महिने झाले मी गव्हाचा रवा पाहून–

**मुंगळा**–आणि मला ९ महिने साखरेचा कण पाहून–

**मुंगी**–संत तुकाराम म्हणतात, मुंगी होऊन साखर खावी ! पण मुंग्यांना तरी कुठे मिळते ती ?

**मुंगळा**–हो ना ? म्हणे "लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा !"

**मुंगी**–कशाला हे शहाणपण ! उलट श्रीमंत लोकांनाच साखर आणि रवा मिळतो आज !

**मुंगळा**–रडू नकोस ! हा घे बाजरीचा दाणा !

**मुंगी**–मला पचायला कठीण जाते हो दाणा ! मला गहूच पाहिजे.

**मुंगळा**–अग, तुझ्यासाठी गहू कुठून आणायचा ?

**मुंगी**–अमेरिकेवरून गहू येणार होता त्याचं काय झालयं ?

**मुंगळा**–अग तो माणसांनी खाल्ला ! मुंग्यांना कुठून मिळेल ?

**मुंगी**–आता करावं तरी काय ? पावसाळा लवकरच येणार अन् घरात एक चिमूट-भर दाणे नाहीत. चला आपण सरकारी दुकानावर जाऊ !

**मुंगळा**–नको. अग, तिकडे माणसांची रांग आहे. तिथं मुंग्यांचा कसा टिकाव लागणार ? काल त्या सरकारी दुकानात १००० मुंग्यांची एक रांग माणसांच्या पायां-खाली चेंगरून ठार झाली ! काय सांगू तुला मुंगीताई !

**मुंगी**–इश्श ! मला ताई म्हणता आणि वरून धक्काही मारता ? तुमचं आणि माझं नातं काय हेही मला कळेनासं झालं आहे.

मुंगळा–पूर्वी मलाही हे कळत नव्हतं. एका महाविद्यालयाच्या कॅंटिनमध्ये मी गेलो आणि कोडं उलगडलं सारं. धक्का लागतो चुकून !

मुंगी–निर्लज्जच तुम्ही ! आम्हा बायकांना धान्याची चिंता, तुम्ही आपली महाजनकी करीत बसता ! चला आपण जरा गावात फिरून धान्य गोळा करून ठेवू !

मुंगळा–नको ! धान्य साठवून ठेवणे गुन्हा आहे.

मुंगी–गुन्हा !

मुंगळा–होय ! आजकाल धान्य साठविणाऱ्याला कडक शासन आहे. म्हणून आम्ही मुंग्यांनीही धान्य साठविता कामा नये.

मुंगी–मग खायचं काय आम्ही ?

मुंगळा–आपण मानवाप्रमाणे शिधापद्धती अमलात आणू ! सर्व मुंग्यांची कमेटी भरवून रेशनकार्डाची योजना करू म्हणजे धान्याची सारख्या प्रमाणात वाटणी होईल. प्रत्येक मुंगीला दर आठवड्याला २ युनिट–

मुंगी–युनिट म्हणजे काय ?

मुंगळा–तुला अक्कल नाही ! युनिट म्हणजे युनिट ! प्रत्येक मुंगीला दर हप्त्याला कणकण साखर व कणकण रवा व एक कण तांदुळ एवढं धान्य मिळेल. तुला ही पसंत आहे योजना ?

मुंगी–होय ! एकदम पसंत. चला आपण आत्ताच्या आता सर्व मुंग्यांची कमेटी भरवू.

(सर्व मुंग्या एकत्र जमतात. सभा रंगात येते. धान्यवाटपासंबंधी खूप चर्चा चालू असतानाच पावसाची जोरदार सर येते व सर्व सभा पाण्यात बुडून मुंग्यांच्या प्रेतांची रांग लागते. काय करणार बिचाऱ्या ! निसर्गच कोपला होता. म्हणूनच वर म्हटले आहे की मुंग्यांची दुर्दैवी रांग ! )

# सूरज – दर्शन

सूरज निकला चिडियाँ बोली ।
कलियों ने भी आँखे खोली ॥

हवा बही मन हरने वाली ।
घर घर में सुख भरने वाली ॥

पूरब में अब छायी लाली ।
पृथ्वीपर आयी उजियाली ॥

सुंदर सुंदर किरने आयी ।
फूल हँसे, कलियाँ मुसकायी ॥

आर. बी. रहिमतकर
बी. ए. प्रथम वर्ष

## व्यापार - धर्म शास्त्र - कला

अभिमन मारोतीजी डडेमल, बी. कॉम्. २ (कनिष्ठ)

असे ऐकिवात आहे की, परदेशातील एका फर्मचे तीनदा दिवाळे निघाले. "ह्या फर्मच्या कारभाराच्या चौकशीअंती असे दिसून आले की, या फर्ममध्ये काम करणारे कामगार, मॅनेजर पुरेसे आहेत व भांडवलसुद्धा. परंतु कुशल विक्रेता एकही नाही. त्यामुळे तिन्ही वेळा फर्म नुकसानीत आली". यावरून कोणत्याही प्रकारच्या व्यापारी कंपनीला उत्तम विक्रेत्याची गरज किती आवश्यक असते हे सहज ध्यानात येण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे एखाद्या मोटार-चालकाला ( Mator Driver ) विमान चालवायला दिले तर तो चालवू शकणार नाही. कारण वैमानिक होण्याकरिता शास्त्र अवगत असावे लागते. ते मोटार चालकाला अवगत नसते. तसेच व्यापारशास्त्रात उत्तम कुशल विक्रेता अत्यंत आवश्यक घटक आहे.

सध्याच्या युगात विक्री कशी करावी हे शिकविणारे शास्त्रशुद्ध ग्रंथ आहेत. वाणिज्य महाविद्यालयातून विक्रीकला शिकविली जाते. परंतु आपल्याकडील बी. कॉम्., एम्. कॉम्. झालेले तरुण स्वतंत्रपणे व्यापारधंदा सुरू करण्यास क्वचित उत्सुक असतात. याऐवजी ते एखादी सरकारी किंवा निमसरकारी नोकरी करणे पसंत करतात. याला काही अंशी आर्थिक परिस्थिती कारणीभूत असली तरी धाडसाने–जबाबदारीने स्वतंत्र उद्योगात पाऊल टाकण्याची उमेद कमी–ही प्रमुख कारणे आहेत. विक्रीचे शास्त्र शिकले तरी त्याला अनुभवाची जोड घातल्याशिवाय व्यापारात यश लाभत नाही.

ज्याला उत्तम विक्रेता म्हणून व्यापारात नावलौकिक मिळवायचा आहे त्याच्या अंगी काही उपजत गुण असणे जसे आवश्यक असतात तसे काही गुण परिश्रमाने व अनुभवाने अंगी बाणणे अत्यावश्यक आहे. असे गुण अंगी बाणवून व्यक्तिमत्वाचा विकास करता येतो.

" मधु तिष्ठति जिव्हाग्रे " म्हणजे जिभेवर जणू मध ठेवावे तितका मनमिळाऊ गोड स्वभाव पाहिजे. म्हणजे अंतःकरणात विष असून उपयोग होत नाही. खिन्न किंवा सचिंत बसलेला विक्रेता ग्राहकांना आकृष्ट करू शकत नाही.

विविध स्वभावाच्या ग्राहकांची मने जिंकण्यासाठी खूपच सहनशीलता व सोशिकता अंगी बाणावी लागते. कोणाचेही मन न दुखविता त्याने " विक्रीची परिस्थिती " सुखावह केली पाहिजे

ग्राहकांनी विचारलेल्या प्रश्नांना आत्मविश्वासाने उत्तरे दिल्यास त्याचा परिणाम स्वाभाविक व्यापाराला प्रतिकूल न होता अनुकूल होईल. त्याने स्वतःच्या कार्याबद्दल योग्य ते प्रेम बाळगले पाहिजे.

विक्रेत्याने आपला उत्साह अखंड कायम ठवून ग्राहकांना विविध वस्तूंचे नमुने दाखविणे. यशस्वी विक्रेता होण्याकरिता उपजत गुण नसूनही प्रयत्नपूर्वक इतर गोष्टी साध्य करून यशस्वी विक्रेता होणे सहज शक्य आहे.

ग्राहक दुकानात आले की, त्यांचे सुहास्य मुद्रेने स्वागत करून त्यांच्या ख्याली–खुशाली

आस्थेने विचाराव्या. ग्राहकाने मागितलेल्या वस्तू नेहमी स्वच्छ पुसून, आकर्षकरीत्या त्यांना द्याव्या. ग्राहकाने मागणी केल्याशिवाय विशेष महाग अथवा विशेष स्वस्त वस्तू दाखवू नये. मध्यम प्रतीच्या वस्तू दाखवाव्या.

एकदम अनेक वस्तू दाखवू नये. त्यामुळे ग्राहक गोंधळून जाण्याचा संभव असतो. ग्राहकाला वस्तूची किंमत त्याने विचारल्याशिवाय अथवा वस्तू पसंत केल्याशिवाय सांगण्याची घाई करू नये.

विक्रेत्याचे ग्राहकांशी संभाषण म्हणजे मुख्यतः वस्तूच्या उपयुक्ततेसंबंधीचे राहील. ग्राहकाने जी वस्तू पसंत केली असेल त्याबद्दल दुसरी देण्याचा आग्रह धरू नये. ग्राहक शंकाखोर असेल तर त्याच्याशी वाद करणे टाळावे. त्याच्या शंकांचे मोजक्या शब्दात निरसन करण्याचा प्रयत्न करावा.

विक्रेत्याने विक्री करताना काही पथ्ये जरूर पाळावी.

ग्राहकाला मालाची किंमत प्रथमच सांगू नये, भरपूर नमुने दाखवून देखील ग्राहकाने माल खरेदी न केल्यास त्याबद्दल चेहऱ्यावर नापसंती व्यक्त करू नये.

ग्राहक दुकानात येताच उधारी मागू नये, तर शेवटी जातेवेळी शांतपणे विचारावे.

यापूर्वी कधी तक्रार आली असेल त्याची आठवण करून देऊ नये.

आपल्या जवळ जी वस्तू नसेल ती दुसरीकडून आणून द्यावी.

दुसऱ्या दुकानदाराची निंदा ग्राहकासमोर करू नये.

वादविवाद करून ग्राहकाला निराश करू नये.

आपल्या जातिधर्माप्रमाणे व्यापार हा धर्म मानून व्यापारी निष्ठा विक्रेत्याच्या अंगी पाहिजे. समाजाचे आपण जबाबदार घटक आहोत अशा दृष्टीने त्यांच्या सुखदु:खाशी समरस झाले पाहिजे. वीज बंद पडली की मेणबत्त्या दुप्पट किंमतीने विक, मातीच्या तेलाची कमतरता भासत असेल तर ते महाग विक, मद्रासला वादळाने तडाखा दिला म्हणून साबुदाणा महाग कर, ही व्यापारी नीती नव्हे. ग्राहकांना लुबाडून श्रीमंत होणे हा व्यापार नव्हे. सच्चा व्यापारी ग्राहकाला अन्नदाता समजून त्याच्या कृपेवर व शुभेच्छेवर आपल्या व्यापाराची व स्वतःची प्रगती करीत असतो. तोच समाजापुढे आदर्श म्हणून मानला जाईल. राष्ट्रीय दृष्टिकोण डोळ्यांसमोर ठेवूनच व्यापार केल्यास देशाच्या, समाजाच्या विकासाच्या मार्गातील व्यापारी हा एक प्रमुख घटक ठरण्यास मुळीच अडचण पडणार नाही.

Real education consists in drowing the best out of yourself. What better can there be than book of humanity.

—Mahatma Gandhi

* * *

प्रत्येक लहान मोठी गोष्ट करताना मन नेहमी प्रसन्न असावे. प्रसन्नता म्हणजे देवाचा आशीर्वाद !

# भारतात हिंदीचे स्थान

अनील रामकृष्णबापू खेडीकर

सध्या भारताची राष्ट्रभाषा हिन्दी की इंग्रजी हा वादग्रस्त प्रश्न झाला आहे. पण हा वाद भारताच्या ऐक्याला विघातक ठरेल व भारतात भाषाभेदाला थारा मिळेल.

सध्या एका बाजूला हिन्दी मुळी राष्ट्र-भाषाच होऊ शकत नाही व तो मान 'इंग्रजीलाच' दिला पाहिजे. असे म्हणणारे अविवेकी लोक तिला इतरांवर ती लादण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण दुसऱ्या बाजूचे लोक हिन्दी ही संपूर्ण भारताची 'राष्ट्रभाषा' व्हावी असा आग्रह करतात.

सत्यत: हिन्दी ही राष्ट्रभाषा आहे की नाही हा वादाचा प्रश्न नसून स्वतंत्र भारताला 'राष्ट्र' मानायचे की नाही व मानायचे झाल्यास ह्या राष्ट्राला एक 'राष्ट्रभाषा' हवी की नको. हवी असेल तर ती कोणती हा खरा प्रश्न आहे.

अखिल भारताच्या जनसंपर्कासाठी एक सर्वसामान्य भाषा असणे आवश्यक आहे. हे मानल्यास मग भारतातील जास्तीत जास्त लोक कमीत कमी वेळात व कमीत कमी त्रासात जी भाषा शिकू शकतील अशी भाषा निवडावी लागेल.

आज आपल्या देशात जनतेपर्यंत सहज शिकता व शिकविता येईल अशी भाषा मातृ-भाषेनंतर एकच आहे आणि ती म्हणजे 'हिन्दी'. हे नाकबूल करता येणार नाही.

भारतातील ५४ टक्के लोक हिन्दी व हिन्दीसदृश अशा भाषा जाणतात असे मानले तर उरलेल्या ४६ टक्के लोकांचा प्रश्न उरतो.

परंतु 'इंग्रजी' फक्त २० टक्के लोकांना समजते व उरलेल्या ८० टक्के लोकांना ती समजत नाही.

आता पहा, ८० टक्के लोकांना इंग्रजी शिकविणे सोपे की ४६ टक्के लोकांना हिन्दी शिकविणे सोपे ? अर्थात हिन्दी !

तसेच देवनागरी लिपीशी जुळणाऱ्या लिपीतील ज्या भाषा आहेत त्यांना तर हिन्दी शिकणे अगदी सोपे आहे. मुख्य अडचण दक्षिणेतील भाषिकांची (मद्रास, आंध्र, म्हैसूर या राज्यांची) आहे. पण त्यांच्याही बाबतीत जर दमाने व समजूतदारपणे घेतल्यास तेदेखील हिन्दीचा स्वीकार करतील. तसेच तेथील विद्या-लयात व महाविद्यालयात 'इंग्रजी' ऐच्छिक करून 'हिन्दी' आवश्यक करावी. स्वाभाविकपणे हिन्दी सर्व राष्ट्राची आंतरप्रांतीय भाषा बनेल तेव्हा हिन्दीला महत्त्व येईल. उर्दूच्या प्रभावाने तिला जसा रूबाब आला तसाच बंगालीमुळे गोडवा येईल.

ज्याप्रमाणे रात्री आकाशाला चंद्राशिवाय शोभा येत नाही; पुत्राला आईविना जगता येत नाही. त्याचप्रमाणे भारताला हिन्दीशिवाय स्वातंत्र्य नाही.

भारत सरकारने जर १९५० पासूनच प्राथमिक शाळांतून मातृभाषेबरोबरच 'हिन्दी' एक आवश्यक विषय म्हणून शिकवावयास सुरुवात केली असती तर पुढे प्रत्येकाला उत्तम ज्ञान राहिले असते व नंतर आंदोलनाची भीती वाटली नसती. कारण पुढे २० वर्षांत तयार होणारी पिढी ही सर्व भारतात हिंदी जाणणारी झाली असती.

इंग्रजी ही परकीय भाषा आहे. 'इंग्रजी' भाषा भारताच्या खेड्यापाड्यांत राहणाऱ्या व शहरांत मोलमजुरी करणाऱ्या ८० टक्के जनतेला ज्ञात करणे कठीण होईल. इंग्रजीच्या पुरस्कर्त्यांनी थोडी बुद्धी चालवून इंग्रजीचा कमी प्रमाणात आणि हिंदीचा जास्त प्रमाणात उपयोग करावा म्हणजे हा 'वाद', हा 'प्रश्न' सोडविणे कठीण जाणार नाही.

भारत राष्ट्राला एक राष्ट्रभाषा असणे आवश्यक आहे व ते स्थान हिंदीलाच देणे योग्य आहे. आपण जे आंदोलन करतो त्यामुळे भारतीय एकता कमी होऊन भारतात कटू वातावरण निष्कारण निर्माण करू पाहतो. ते आपण प्रयत्नपूर्वक नष्ट करू व भारतीय ऐक्याला व राष्ट्रभावनेला पोषक असे वातावरण निर्माण करू.

—जय हिंद—

## व्यथा

कुणा सांगू माझी व्यथा
कुणीच ऐकून घेत नाही
खरंच्, ही नाही दंत–कथा
कुणीच कसा भेटत नाही ? ॥१॥

वाट पाहत आहे उभा
समाधान कुणी करीत नाही
येत नाहीत कुणी सामोरा
कुणी विचारीतसुद्धा नाही ॥२॥

चंद्र मला जाळतो आहे
स्वप्नास सोबत उरली नाही
व्यथा अजून वाढत आहे
कुणास कशी कळत नाही. ॥३॥

मनात ठिणगी पेटली तरी
आकाश कसे पेटले नाही !
मी हे सांगत असलो तरी
व्यथा मात्र संपत नाही. ॥४॥

र. डो. शामकुंवर
बी. कॉम. उपान्त्य

# मा तृ प्रे म

कु. उषा वसंतराव देशपांडे, अुपान्त्य बी. ए.

प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधु आई
बोलावू तुज आता मी कोणत्या उपायी ॥

आई ह्या मूर्तिमंत वात्सल्याच्या प्रतिमेबद्दल अनेक विचार प्रकट केले गेले आहेत व आजही केले जात आहेत.

आजच्या जगात म्हणजेच आधुनिक जगात मनुष्याच्या अनेक इच्छा अतृप्त असतात. त्या पूर्ण करण्यासाठी मनुष्य सारखा धडपडत असतो. मनुष्याला अनेक गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते. चैनीच्या वस्तूदेखील आपल्याजवळ असाव्या असे प्रत्येक व्यक्तीलाच वाटत असते. ज्याप्रमाणे मासोळी पाण्याबाहेर राहूच शकत नाही त्याप्रमाणे मनुष्य हा आपल्या सुखासाठी सारखा मासोळीप्रमाणेच धडपडत असतो. म्हणजेच मनुष्य हा सुखाच्याच पाठीमागे लागतो असे म्हणता येणार नाही तर त्याला ह्या जीवनात सुख आणि दुःख दोन्हीही भोगावी लागतात. आता असे दिसून येईल की आजकालचे शास्त्रज्ञ आपल्या सुखासाठी अहोरात्र कष्ट करीत असतात. आपले मनोरंजन व्हावे म्हणून रेडिओ, बाहेर भटकण्यासाठी मोटार इत्यादी वस्तू मनुष्य घेऊ शकतो. अशा प्रकारच्या वस्तूंकरिता तो मनुष्य स्वतःच्या रक्ताचे पाणी पाणी करतो व ह्या विज्ञानयुगातील वस्तू स्वतःच्या नशिबाशी झगडा करून मिळवू शकतो. परंतु ह्या जगात अशी एक वस्तू आहे की तिच्यासाठी कितीही कष्ट भोगले तरी ती मिळणे अशक्य आहे. ती म्हणजे स्वर्गीय झालेल्या मातेची माया.

कवी यशवंतांनी 'आई' ह्या कवितेत आपले विचार प्रगट केलेले आहेत.

'ही न्यूनता सुखाची चित्ता सदा विदारी ।
स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी ॥'

ज्याप्रमाणे उन्हात गेल्याशिवाय सावलीचे सुख कळत नाही, त्याचप्रमाणे आपली स्थिती असते. जोपर्यंत मातेचे प्रेम आपल्याला प्राप्त होते तोपर्यंत तिच्या त्या प्रेमाची कदर आपल्या ठायी नसते. इतरांनी आपल्याला कितीही प्रेम दिले तरी आईच्या प्रेमाची श्रेष्ठता त्याला प्राप्त होत नाही. आई आपल्याजवळ आहे तोपर्यंत तिची महती कळत नाही. ज्यावेळी दुर्दैवाने ती आपल्याला सोडून जाते त्यावेळी खरोखरच असे वाटायला लागते की आता उन्हाचे चटके आपल्या अंगाला लागत आहे.

'आईचे प्रेम हे नैसर्गिकरीत्या पिकलेल्या फळाप्रमाणे असते तर इतरांचे प्रेम हे जाणूनबुजून पिकवलेल्या फळाप्रमाणे असते'.

कवी यशवंत म्हणतात––

आई ! तुझ्याच ठायी सामर्थ्य नंदिनीचे
माहेर मंगलाचे अद्वैत तापसांचे ।
गांभीर्य सागराचें औदार्य या धरेचे
नेत्रांत तेज नाचे त्या शांत चंद्रिकेचे ॥

एखाद्या अज्ञान मातृविहीन बालकाला विचारले की तुझी आई कोठे गेली रे? तर तो म्हणेल 'आई कुणा म्हणू मी ? आई घरी न दारी !' व आसवांनी भरलेल्या डोळ्यांनी तो आपल्याकडे पाहातच राहील, त्याच्या दुःखी

अवस्थेची आपल्याला त्यावेळी कल्पना करविली जाणार नाही, आपल्याही डोळयांत पाणी आल्याशिवाय राहणार नाही. ते अज्ञानी बालक मोठे झाल्यावर, इतरांच्या आईकडे बघितल्यावर त्याला आईची महती कळल्याशिवाय राहणार नाही. ह्याचवेळी तो सर्व जगाचे वाईट अनुभव घेतो व त्याला असे वाटते की आपल्यावर काळयाकुट्ट मेघांची दाट छाया पसरली असून आपण फार मोठ्या संकटात पडलो आहोत.

वात्सल्य गाढ पोटी त्या मेघमंडळाचें
वास्तव्य या गुणांचे आई तुझ्यात साचें ।

आपल्या मराठी भाषेत अशी एक म्हण आहे ती म्हणजे "दुसऱ्याचा दुधाचा हात तर आईचा कोरडा हात" केव्हाही चांगलाच असतो. ज्या ठिकाणी मातृप्रेम नाही त्या ठिकाणी काहीच नाही असे म्हणावे लागते. आईचे प्रेम हे चंद्राहून शीतल पाण्याहून पातळ अशा-प्रकारचे असते.

अशा प्रकारचे मातृप्रेम बाळपणी ज्यांनी पूर्णपणे अनुभवले ते खरोखरच आपल्या जीव-नात सुखी आहेत असे म्हणावे लागते व भाग्य-वानही आहे. ज्याप्रमाणे वाळवंटातील वाळूचे कण मोजू शकत नाही, सागरांच्या लाटांची गणती होऊ शकत नाही, आकाशातील चांदण्यांची मोजदाद होऊ शकत नाही त्याप्रमाणे मातृ-प्रेमाची मोजदाद कोणीही करू शकत नाही. आईचे मूल इकडेतिकडे गेले की तिला ते मूल घरी येईपर्यंत चैन पडत नाही. तिचे मन द्विधा होऊन जे नाही ते विचार तिच्या मनात येऊ लागतात. मूल घरी आल्यानंतर––

प्रेमा तिचा तै उसळून आला ।
शिक्षा म्हणे मी करु काय त्याला ।
कडेवरी घे उचलुनि त्याला ।
मुखी मुक्यांचा भडिमार केला ।

साने गुरूजी ह्यांच्या स्त्री-जीवन ह्या ग्रंथातून आपल्याला मातेच्या प्रेमाची कल्पना येते––

माऊलीचा मार त्यांत अमृताचा चारा ।
बाळाच्या कल्याणासाठी त्यात
कोटीकोटी धारा ।
फुलामध्ये फुल हुंगावे जाईचे ।
सुख भोगावे आईचे बाळपणी ।

भूक, तहान लागलेल्या माणसाला अन्नाची व पाण्याचीच आवश्यकता असते त्याप्रमाणे बाळपणी आईच्याच प्रेमाची अत्यंत आवश्यकता असते. आईला मूल हवेहवेसेच वाटत असते. एखादे कोवळे रोप आपण अंगणात लावले व त्याला नियमितपणे पाणी टाकले नाही तर ते सुकून जाईल त्याचप्रमाणे ज्या बाळाला आई नाही त्याचीही स्थिती त्या कोमल रोपा-प्रमाणेच होईल.

मुलावर आईचेच संस्कार होत असतात. "संस्कारात् द्विज उच्यते" आईच मुलाला वळण लावू शकते. मुलगा जर वाईट निघाला तर त्याचा दोष त्याच्या आईवरच येत असतो. प्रत्येक माऊलीला वाटत असते की आपला मुलगा चांगला निपजावा व आपले नाव कमवावे अशा प्रकारच्या अनेक आकांक्षा तिच्या मनात घर करून बसलेल्या असतात.

खरोखरच आईची महती फार मोठी आहे. एका कवीने म्हटलेच आहे की––

न मातुःपरदैवतम्,

आई एखाद्या वेळेस आपल्या मुलावर खूप रागावते, त्याला मारते पण नंतर त्याची कीव तिलाच येते व नंतर त्याला स्वतःच्या अंकी निजवून चार चांगल्या गोष्टी सांगते म्हणून मला शेवटी असे म्हणावेसे वाटते की––
किती ओव्यामध्ये गाऊ माऊलीच्या प्रेमाला ॥
कोण प्रदक्षिणा घाली आकाशाच्या सीमेला ॥
जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥

# प्रचलित शिक्षण पद्धतीतील दोष व उपाय

**मार्तंड आडकुजी हर्षे**
बी. कॉम. अन्त्य

**शिक्षणाचा उद्देश**–मानवाचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास करणे हाच शिक्षणाचा मूळ उद्देश होय. डॉ. बेनिप्रसाद यांच्या मते, "शिक्षण म्हणजे मनुष्याचे सामाजीकरण करण्याचे व समाजाच्या विस्तृत जीवनाशी मनुष्याच्या व्यक्तित्वाचा समन्वय घडवून आणण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन होय महात्मा गांधींच्या दृष्टीने मानवाला मुक्ती मिळवून देणारे ते शिक्षण असून शिक्षणामुळे माणसाचा सर्वांगीण विकास होण व तो सुसंस्कृत होणे होय. डॉ. सी. ई. एम. जोड यांनी शिक्षणाची मुख्य ३ उदिष्टे सांगितली आहेत:–(१) उदरनिर्वाहाची योग्यता निर्माण करून स्वावलंबी बनणे, (२) नागरिकांच्या अंगी कर्तव्यपालनाची योग्यता निर्माण करणे, (३) सभ्य व सुसंस्कृत जीवन जगण्याची योग्यता निर्माण करणे. अशा प्रकारच्या शिक्षणामुळे माणसाच्या शरीराचा, मनाचा व बुद्धीचा विकास होऊन देशाचा व समाजाचा फायदा होईल.

प्रचलित शिक्षणपद्धती ही इंग्रजांनी सुरू केली आहे. मेकॉले साहेब म्हणतात–"भारताला गुलाम ठेवायचे असेल तर त्याला इंग्रजी शिकविलेच पाहिजे. आपली राज्ययंत्रणा राबविण्यासाठी, कारकून तयार करण्यासाठी ही शिक्षणपद्धती अंमलात आली म्हणून कै. रवीन्द्रनाथ टागोर म्हणत होते. ( " All the Schools & Colleges are the factories of the slaves").शाळा व कॉलेज हे गुलाम बनविण्याचे कारखाने आहेत. ही जाणीव राष्ट्रीय पुढाऱ्यांना होऊन गांधीजींनी जीवनशिक्षण योजना पुढे मांडली.

## प्रचलित शिक्षणप्रणालीतील दोष

(१) भारतीय भाषांकडे दुर्लक्ष करून परकीय भाषेचे व्यर्थच स्तोत्र माजते.

(२) परकीय भाषेतून विषय नीट समजत नाही म्हणून नवीन संशोधन करता येत नाही व परावलंबित्व येते. व निम्मा वेळ भाषा ग्रहण करण्यात जातो.

(३) उच्च शिक्षण परकीय भाषेतून देणारा आमचाच देश आहे. त्यामुळे त्या भाषेचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी आयुष्यातील निम्मा वेळ द्यावा लागतो.

(४) इंग्रजी ही आमची मातृभाषा नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांवर ताण पडून अभ्यासात वेळ खर्च होतो.

(५) प्राथमिक शिक्षण दोषास्पद असून शिक्षक प्रशिक्षित नाही. जागा नाही, त्याकडे दुर्लक्ष केल्या जाते म्हणून शिक्षणाचे प्रमाण वाढत नाही.

(६) कोणत्याही विषयाचे संपूर्ण ज्ञान होत नाही. प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणात त्याच विषयाची पुनरावृत्ती होते म्हणून नवे विषय कळत नाहीत.

(७) परीक्षांना विशेष प्राधान्य देण्यात आल्यामुळे व ती सदोष असल्यामुळे परीक्षा

पास होणे हेच ध्येय ठरून अनेक गैरसाधनांचा वापर होतो.

(८) वैज्ञानिक व धंदेशिक्षणाचा अभाव असल्यामुळे शिक्षण संपले की कारकूनच व्हावे लागते. त्याशिवाय त्याला जीवन जगण्यास दुसरा मार्ग नसतो.

(९) वारंवार बदलणाऱ्या पुस्तकांमुळे खर्च फार वाढतो.

(१०) परीक्षापद्धतीत एकता नसून कार्यालयीन गोंधळ फार आहे. प्रवेशाच्या बाबतीत 'मेरीट' पेक्षा दडपणाला बळी पडण्याची प्रथा आढळून येते

(११) भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञानापेक्षा परदेशाचा इतिहास शिकविल्या जात असून त्यात त्याला अभिमान वाटतो. नैतिक व धार्मिक शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्या जाते. त्यामुळे सामाजिक नीतिमत्ता ढासळली असून परकीय विचारांचा अभिमान वाटतो.

(१२) शिक्षकांना वेतन कमी व संस्थाचालकांच्या वर्चस्वाखाली राबावे लागत असून त्यात स्वाभिमानवृत्तीस बांध बसून विद्यार्थ्यांतही तेच गुण आढळतात.

(१३) खेळांची उत्कृष्ट मैदाने नाहीत. त्यामुळे उत्कृष्ट खेळाडू तयार होत नसून एकोप्याचे व शिस्तीचे शिक्षण मिळत नाही.

## वरील दोषनिवारणार्थ खालील उपाय मांडता येतील

(१) **वर्धा योजना**—ह्या योजनेचे जनक महात्मा गांधी असून त्यांनी प्रथम आपली योजना 'नवजीवन' पत्रात जाहीर केली. १९३७ मध्ये राष्ट्रीय मंत्रिमंडळे स्थापन करण्यात आली. तेव्हा या योजनेला मान्यता मिळाली. डॉ. झकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमेटी स्थापन करण्यात येऊन तिचा रिपोर्ट १९३८ साली प्रकाशित करण्यात आला. ही योजना ७ ते १४ वर्षांच्या मुलांमुलींसाठी म्हणजेच ७ वर्गपर्यंतच्या मुलांसाठीच आहे. ह्या पद्धतीचे मुख्य सूत्र आहे–'कृतीद्वारा शिक्षण', 'शिकता शिकता जगा' त्यासाठी (१) प्राथमिक शिक्षण फुकट व सक्तीचे, (२) प्रशिक्षित व भरपूर वेतनावर शिक्षकांची नेमणूक (३) धंदेशिक्षण दिले पाहिजे. विद्यार्थ्यांद्वारा निर्मित वस्तूतूनच शाळेचा खर्च व शिक्षकांचा पगार निघावा असा उद्देश ह्या योजनेचा होता.

(२) **सार्जंट योजना**—ह्या योजनेचा रिपोर्ट १९४४ मध्ये प्रकाशित झाला. ह्या कमेटीला कृतीतून शिक्षण व शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गरज ही तत्त्वे मान्य असून सर्व दर्जाच्या शिक्षणाचा त्यात समावेश केला आहे.

**उद्दिष्टे** —(१) प्रत्येक विद्यार्थ्याला ६ व्या वर्षी शाळेत भरती केले पाहिजे, (२) प्राथमिक शिक्षणाच्या दोन अवस्था करण्यात याव्या, (अ) प्राथमिक ५ वर्षांची (ब) द्वितीय अवस्था ३ वर्षांची मिळून ८ वर्षे संपल्यानंतर खास योग्यता दाखविल्यावरच त्याला हायस्कूलमध्ये प्रवेश देण्यात यावा, (३) हायस्कूलचे प्रकार दोन, (अ) शैक्षणिक, (ब) तांत्रिक, (४) १७ व्या वर्षानंतर हायस्कूल संपल्यानंतर विद्यार्थी कॉलेजमध्ये भरती होऊ शकतो.

ह्या योजनेवर ३८३ को. रु. खर्च होणार असून ती ४० वर्षेपर्यंत अंमलात येण्याचा अवधी होता म्हणून ती अंमलात आली नाही.

(३) **विद्यापीठ समितीची योजना**—स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उच्च शिक्षणक्षेत्रात सुधारणा करण्यासाठी डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात येऊन तिचा अहवाल १९४९ मध्ये प्रसिद्ध झाला.

**उद्दिष्टे** (१)—प्रादेशिक विद्यापिठाच्या स्थापनेला प्रोत्साहन न देणे, (२) ग्रामीण विद्यापिठे स्थापन करण्यास उत्तेजन देणे,

(३) शिक्षणाचे माध्यम प्रादेशिक भाषा असावे, (४) विद्यापीठ अनुदान मंडळ स्थापन करावेत, (५) धार्मिक शिक्षणाला स्थान द्यावे (६) संघराज्याची भाषा ही शिक्षणाचे माध्यम म्हणून केन्द्रसरकारच्या ताब्यातील विद्यापिठात असावे.

प्रस्तुत पद्धतीने प्राध्यापकवर्ग, त्यांची योग्यता, पगार, परीक्षापद्धती इ० बाबींचा पूर्ण विचार केला आहे. त्या सर्व सूचनांचा अवलंब झाल्यास उच्च शिक्षणात सुधारणा होईल अशी आशा व्यक्त करता येईल. त्याचप्रमाणे डॉ. मुदलियार यांच्या कमिटीने माध्यमिक शिक्षणात आमुलाग्र बदल घडवून आणणारी योजना मांडली आहे. स्त्रीशिक्षणाचा विचार करण्याकरिता श्रीमती दुर्गाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी भारत सरकारने नेमली आहे. एकंदरीत स्वातंत्र्यानंतर शिक्षण-प्रगतीच्या अनेक उपाययोजना आखण्यात आल्या असून शिक्षणाची प्रगती होत आहे.

---

युरोपातील हॉटेलमधून भोजनाबरोबर दारू विनामूल्य दिली जाते. पण पाणी हवे असल्यास पैसे द्यावे लागतात.

–संग्राहक केशव बान्ते

* * *

संकटेच माणसाला धीट बनवितात.

* * *

मनुष्य अन्नापेक्षा प्रेमाचा भुकेला आहे.

–संग्राहक मा. स. भुसारी

* * *

" जगात अनंत दुःखे आधीच आहेत, ते दूर न करता आले तर निदान त्यात भर घालू नका. "

* * *

" विश्वविख्यात नाटककार शेक्सपीअर याची मुलगी पूर्णपणे निरक्षर होती ".

* * *

" जगाच्या पाठीवर जवळ जवळ पन्नास लाख आंधळे आहेत. त्यांतील २० लाख आंधळे केवळ भारतात आहेत. "

* * *

विचार ही कृतीची जननी आहे.

# सरकारी योजना व तिचा उपयोग

**वेजराम भुरे,** बी. कॉम. अन्त्य

वैभवाचे शिखर गाठू पाहणाऱ्या सहकारी चळवळीचा उद्देश प्रामाणिकपणा, निःस्वार्थ सेवा व स्वतःचे भांडवल हा होता. ही चळवळ भारतात प्रस्तुत शतकाच्या सुरुवातीस १९०४ सालापासून ब्रिटीश सरकारच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाली. परंतु ह्या चळवळीसंबंधी शास्त्रशुद्ध माहिती त्या वेळच्या कार्यकर्त्यांना विशेष अशी नव्हती. बोटावर मोजण्याजोगे म्हणजे फार थोडे असे कार्यकर्ते होते की ते स्वतः त्या योजनेत भाग घेण्यास पुढे येत. सर्वसामान्य जनता तर ह्यासंबंधी उदासीनच राहिली. तिचा फारसा टेंभा मिरविला गेला नाही.

असे असले तरी धान्याची नियंत्रित पद्धती मध्यम काळात सुरू करून व सहकारी स्वस्त धान्याचे दुकान उघडून हा मान प्रथम सहकारी चळवळीलाच मिळाला. येथपर्यंत ही चळवळ प्रामाणिक लोकांच्या हातात राहिली व ब्रिटीश राजवटीत कासवाच्या गतीने तिची प्रगती होत गेली. याला कारण सहकारी कडक व योग्य शासन. पण त्यानंतर ह्या योजनेने प्रामाणिकपणा हळू हळू सोडणे सुरू केले.

**स्वातंत्र्यानंतरचा काळ**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कासवाची गतीच ह्या योजनेने स्वीकारली. १ एप्रिल १९५१ पासून पंचवार्षिक योजनेला सुरुवात झाली. योजनेमध्ये सहकाराला महत्त्वाचे स्थान मिळाले. त्यामुळे सहकारी योजनेने कासवाची गती सोडून हरणाची गती स्वीकारली. या चळवळीच्या प्रगतीचे प्रमाण १५% ते २०% देता येईल.

भारतीय प्रगतिपथावर चढलेल्या राज्यांपैकी महाराष्ट्र राज्याचे नाव आघाडीवर होते. सहकाराच्या किंवा कोणत्याही बाबतीत ह्या राज्याचा क्रमांक नेहमी वरचा असे. परंतु ह्यातील गुपित जेव्हा निदर्शनास आले तेव्हा मात्र त्यातील कोडे सुटले. ह्यापूर्वी महाराष्ट्रात ह्या चळवळीसाठी सरकारी पद्धतीचा जो अप्रतिहत लोंढा सुरू होता त्याकडे कोणीच लक्ष पुरविले नव्हते. आणि अशा परिस्थितीत प्रगती मंद होण्याचा प्रश्नच उरत नाही. उलट अधिक फोफावेल. ह्या राज्यातील अनेक अधिकारी असे म्हणत की " आम्ही नुकसानीची भरपाई करण्याकरिता सदासर्वकाळ तयार आहोत " त्या वेळेस एका अर्थशास्त्रज्ञानी (भारतीय) लगेच उत्तर दिले की, " एकदा का ही सरकारी मदत बंद पडली की सहकारी चळवळच संपुष्टात येईल."

**सहकारी चळवळीचे अनिष्ट परिणाम**

केंद्र सरकारने समाजवादाची घोषणा करून सहकारी चळवळीला त्याचे एक माध्यम ठरविले व मदतीचा ओघ ह्या योजनेकडे वळविला. प्रत्येक राज्यातील खेड्यापासून तर शहरापर्यंत स्पर्धा सुरू झाली. पण त्याच सुमारास राज्यपुनर्रचना झाल्यामुळे त्याचा सहकारी चळवळीवर अनिष्ट परिणाम झाला. आणि हा वेग पुनः

प्रस्थापित करण्यासाठी सरकारने कर्ज व मदत यांचा प्रवाह अधिक वाढविला. त्यामुळे सभासदांची संख्या व सहकारी संस्थांची संख्या वाढली. त्याचबरोबर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीतील अहमहमिका व चुरस ह्यांना अधिक जोर चढला. प्रामाणिकपणा घसरून त्याची जागा "स्वार्थाने" घेतली. व ज्यांना सहकारी संस्थेचे मुळीच अथवा काही अंशीतरी मूलतत्त्व ( Basic Principles ) माहीत नाही अशा व्यक्तिंनीही सहकारी चळवळीत आधार मिळविला. याचा परिणाम मात्र संस्थेची मुळे उघडे पडण्यावर झाला व श्रीमंत अधिक श्रीमंत बनले व गरीब अधिक गरीब बनले आणि ह्यातच समाजवाद (Socialism) स्थिरावला.

**त्यामुळे भ्रष्टाचार**

अशा तऱ्हेने हा सरकारी मदतीचा लोंढा अतोनात सुरू राहिल्यामुळे–

१) राजकारण खेळण्याचे व द्रव्यार्जनाचे सहकारी संस्था म्हणजे एक उत्कृष्ट साधन ठरले.

२) प्रामाणिकपणा, त्याग व काटकसर ह्यांना मूठमाती मिळून ते एक भ्रष्टाचाराचे माहेरघर बनले आहे.

३) हा भ्रष्टाचार जर कोणी उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला तर त्याला धमक्या देणे इतकेच नव्हे तर त्याच्या प्राणावरसुद्धा घसरते.

४) सरकारचे सहकारी खाते देखील वाहत्या गंगेत हात धुवून घेत आहे.

**सरकारनें नेमलेली मंडळे**

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळात सरकारने श्री. रा. कृ. पाटील ह्यांच्या अध्यक्षते-खाली एक प्रतिनिधी मंडळ चीन व जपान-च्या दौऱ्यावर पाठविले. पण वापस आल्यावर त्यापैकी काहींनी ह्या योजनेला आपला नकारच दर्शविला.

अशा प्रकाराने सुरू केलेल्या या सहकारी चळवळीचा लोकांनीच उपयोग केला.

म्हणून ही योजना जर पुढे जास्त विकासावयाची असेल तर त्याकरिता खालील गोष्टी अंमलात आणाव्यात. आतापर्यंत सहकारी चळवळीची जी खरी प्रगती झाली ती केवळ सरकारी मदतीमुळे. त्याकरिता सरकारने अतो-नात मदत दिली व पैसा कमी पडला म्हणून तुटीचे अर्थप्रबंधन केले. द्वितीय योजनेत १२०० रु. कोटींचे तुटीचे अर्थप्रबंधन केले (Deficit finance)

**उपाय**

१) सरकारी आर्थिक मदत अजिबात बंद करावी. फक्त जरूर पडल्यास एखाद्या वेळी कर्ज घ्यावे. तेही अल्पकालीन असावे.

२) ही चळवळ सभासदांच्या भांडवला-वरच उभारण्यात यावी.

३) राजकारणी लोकांना ह्यात वाव नसावा.

४) प्रामाणिक, त्यागी व अपत अशा लोकांनीच ह्यात हात घालावे.

५) सदस्यसंख्या नियंत्रित असावी.

६) एका व्यक्तीने एकाच संस्थेवर प्रतिनिधित्व करावे अशी कायद्यात सोय असावी.

७) मितव्ययी धोरण अंमलात आणावे.

८) अधिकारपदाकरिता प्रलोभन नसावे.

९) सरकारी धोरण ह्या बाबतीत अधिक कडक करावे. कारण जनता तिने गुंतविलेल्या भांडवलाला जबाबदार शासनाला धरील.

अशा प्रकारचे अनेक उपाय आहेत.

# कृषी उत्पादनाच्या नियंत्रणाच्या दृष्टीने

शा. तु. भोंगाडे, बी. कॉम. अन्त्य

(अ) एकाधिकार खरेदी-विक्रीचे व
(ब) गोदामपद्धतीचे फायदे, तोटे व मूल्यांकन.

## असले धोरण अवलंबनाचा उद्देश

जगातील भांडवलवादी अर्थव्यवस्थेच्या राष्ट्रांत उपरोक्त नियंत्रणपद्धतीचा अवलंब वा अवलंबनाच्या दृष्टीने विचारसुद्धा करण्यात आल्याचे अजूनही दृष्टोत्पत्तीस पडत नाही. पण जी काही जगात रशिया व चीनसारखी समाजवादी राष्ट्रे आहेत त्या राष्ट्रांत आज वरील नियंत्रणपद्धतीचा वापर फार मोठ्या प्रमाणावर केल्या जातो. रशियात तर असल्या पद्धतीचा वापर लहान सहान उद्योगात केल्या जातो. भारतानेही रशियाच्या अर्थव्यवस्थेचे अनुकरणीय धोरण अवलंबिले व अधिक थोड्या वर्षांच्या कालखंडात समाजवादी समाजरचनेच्या मार्गावरच वाटचाल करून देशाला परिपूर्ण समाजवादी राष्ट्र बनविण्याच्या दृष्टीने अनेक सामाजिक नियंत्रणाचा वापर करण्यास सुरुवात केली. या सामाजिक नियंत्रणापैकीच भारत सरकारने कृषी उत्पादनाची विल्हेवाट वा उत्पादनाचा पुरवठा नियंत्रित स्वरूपात होण्यासाठी (अ) एकाधिकार धान्य खरेदी-विक्रीचा व गोदाम पद्धतीचा अवलंब केला. आता ह्या पद्धतींना भारतात कायमचेच स्थान मिळाले आहे.

## अवलंबनापासून देशाला मिळणारे फायदे

### अन्नधान्याचा निश्चित साठा

(अ) भारतात एकाधिकार खरेदी-विक्री व गोदामपद्धतीचा वापर केल्यामुळे अनेक फायदे मिळत असतात. प्रमुख फायदा असा की देशात अन्नधान्याचा निश्चित साठा ठेवण्यात येतो. देशात फोफावत असलेली लोकसंख्या व त्या लोकसंख्येला लागणारा अन्नसाठा या नियंत्रित पद्धतीने संग्रहित करून ठेवण्यास अथवा अपुऱ्या साठ्याला आवश्यक तेवढा करण्यासाठी परदेशातून आयात करण्यास मदत होते.

### अनेकविध समस्यांना सामना देणे

(ब) भारतातील कृषी उद्योग जुगाराचा खेळ म्हणून संबोधिला जातो. भारतात कृषी उद्योगाला अग्रगण्य स्थान आहे. "A bad year for agriculture is a bad year for all round" अशी भारताची अवस्था आहे. कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ किंवा आकस्मिक घटना इत्यादी संकटांना तोंड द्यावे लागते. परंतु सध्याच्या नियंत्रित अर्थव्यवस्थेमुळे असल्या समस्यांना तोंड देणे थोड्या फार प्रमाणात सोपे होते.

### काळ्या बाजाराला आळा

(क) ज्या वेळेस देशात खुल्या बाजारभावाने कृषी उत्पादनाची खरेदी व विक्री केली जाई तेव्हा दलाल, अडते इत्यादी व्यापारी लोकांकडून देशात काळा बाजार करण्यात येई. परंतु सध्या कृषी उत्पादनाच्या मालात तरी असल्या प्रकारचा काळा बाजार दिसून येत नाही.

### सार्वजनिक हित

(ड) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने एकाधिकार अन्नधान्य खरेदीविक्रीला विशेष श्रेयस्कर

स्थान आहे. ज्या प्रांतात विशेषेकरून कृषी उद्योग नाही त्याही प्रांताला असल्या धोरणाद्वारे अन्नपुरवठा केल्या जातो.

**विदेशी चलनाची बचत**

(ई) सरकारी खर्चात थोड्याफार प्रमाणात काटकसर करण्यास या नियंत्रणाद्वारे मदत होते. देशातूनच आवश्यक अन्नधान्य घेतले जाते. व परदेशी आयातीला आळा घातल्या जातो. अशा प्रकारे देशी चलनाचा परदेशाकडील ओघ थांबून देशाला स्वावलंबी होण्यास चालना मिळते.

**आवश्यक आयातीला मदत**

(फ) कृषी उत्पादनाच्या नियंत्रित धोरणामुळे देशाला आणखी एक महत्त्वाचा फायदा होतो तो असा की, संग्रहित केलेला अन्नसाठा व एकंदर उपभोग यांच्यांत फारकत आढळून आल्यास कृषीच्या अधिकतर उत्पादनाच्या दृष्टीने कृषीकडे लक्ष पुरविण्यास आणि वेळीच योग्य ती उपाययोजना करण्यास सुलभ स्थिती मिळते.

## अवलंबनापासून देशात उद्‌भवणारे तोटे

देशात कृषी उत्पादनाच्या नियंत्रित धोरणाने बहुतांशी फायदेच उद्‌भवत असले तरी त्या धोरणाने देशात काही अंशी तोटेही उद्‌भवताना दिसतात. निम्नलिखित तोटे हे केवळ तोटेच नाहीत तर एकाधिकार खरेदी-विक्री व गोदामपद्धतीची वास्तविक स्थिती आहे.

**मानवी घुसखोरी**

१) एकाधिकार खरेदी-विक्रीने आजपर्यंत केलेल्या कामकाजावरून असे आढळून आले की देशातील बऱ्याचशा गोदामांत वर्षाच्या शेवटी हिशेबातच गोंधळ उडतो. गोदामात साठवलेला एकंदर माल व गोदामातून रवाना झालेला माल यांच्यांत एकरूपता दिसून येत नाही. किती तरी माल उंदरांनी केलेली नासाडी म्हणून दाखविण्यात येतो. राजकारणाच्या प्रभावी छापेमुळे भ्रष्टाचार व इतर घुसखोरीचे लोण ह्याही नियंत्रणाच्या धोरणात येऊन पोहोचले आहे. परिणामतः प्रत्यक्ष घुसखोरीपेक्षा माणुसखोरीच गोदाम खाली करण्यास कारणीभूत असल्याचे साक्षपुराव्यावरून अनेक ठिकाणी सिद्ध करण्यात आले.

**सरकारी मालाची तूट**

२) संग्रहित मालावर दुर्लक्ष म्हणून या धोरणातील दुसरा दोष दाखविल्या जातो. याच दोषामुळे एकाधिकार खरेदी-विक्रीत व गोदामपद्धतीत तोटे उद्‌भवतात. गोदामात येणारा माल व गोदामातून रवाना होणारा माल किती या योग्य गोष्टीवर ती पाळत ठेवली जात नाही. एका गोदामातून दुसऱ्या गोदामात माल स्थानांतरित करतेवेळी हमालवर्ग कमालीची गुंडगिरी करतो. हिशेबापेक्षा कितीतरी कमी माल बुक करणे, स्वतःच रेल्वे व्हॅगन फोडणे असल्या प्रकारची लुटालूट चालू असते. कारण माल सरकारचा असतो. समजा, एक्सेस म्हणून कितीतरी माल हिशोबापेक्षा जास्त आला तरी तो स्थानांतरित गोदामाला वापस पाठविल्या जात नाही. तर गोदाम मॅनेजर किंवा अन्य हेड अथवा सब् आफीसरच त्याची गुप्तरीतीने विल्हेवाट लावतात.

**नियंत्रित वातावरणात बेबंदशाही**

३) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने या नियंत्रणाद्वारे कोणतीच अनुकूल स्थिती निर्माण होत नाही. उलट नियंत्रित वातावरणामुळे देशात महागाई, काळाबाजार, भेसळीचे प्रकार घडून येतात.

**संग्रहित मालावर दुर्लक्ष**

४) संग्रहित मालाची योग्य रीतीने जोपासना केली जात नाही. कितीतरी धान्य पावसाच्या आकस्मिक आगमनामुळे व पूर्वदक्षतेच्या अभावामुळे सडते, कुजते. ही देशाला पोहोचणारी भयंकर हानी होय. अशा प्रकारे देशाला अन्नधान्यनियंत्रणापासून तोटे होतात.

## शेतकऱ्याच्या वैयक्तिक दृष्टिकोणातून मिळत असलेले फायदे

अन्नधान्याच्या नियंत्रित धोरणामुळे शेतकऱ्यांना पुष्कळसे फायदे मिळतात. अनेकविध फायद्यांतून पुढील काही उल्लेखनीय आहेत.

**१) कृषी उत्पादनाच्या विक्रीची सोय**

कृषी उत्पादित मालाच्या विक्रीच्या दृष्टीने एकाधिकार खरेदी म्हणजे निश्चित अशी बाजारपेठ होय की जेथे कास्तकारांना उत्पादित माल पूर्वनियोजित धोरणामुळे विकता येतो.

**२) ठरवून दिलेल्या योग्य किंमती**

सरकारने मालाच्या किंमती ठरवून दिलेल्या आहेत. आज एकाधिकार खरेदीचा भाव पूर्व निश्चित असल्यामुळे आम्हाला प्रतिक्विंटल रकम मिळेलच असे सांगता येते. या भागात सरकारच्या संशोधनाशिवाय बदल केल्या जाऊ शकत नाही. म्हणून एकाधिकार खरेदीपासून मंदीचे भय नाही.

**३) मध्यस्थाचे तोंडही पाहावे लागत नाही**

एकाधिकार खरेदी संस्थांचे सरकारी नोकर व शेतकरी या दोघांमध्येच क्रय-विक्रयाची क्रिया घडते. दलाल, अडते, इत्यादी मध्यस्थ ह्या पद्धतीने वगळून शेतकऱ्यांचे कल्याण करण्याचा एक उत्तम मार्गच शोधून काढला असे साहजिकच उद्गारल्या जाते.

**४) विक्रीत मालाच्या रकमेचे त्वरित शोधन**

एकाधिकार खरेदी विभागाने शेतकऱ्यांना त्यांच्या विक्रीत मालाच्या रकमेचे त्वरित शोधन करण्याची सोय बँकेच्याद्वारे केलेली आहे. काही सहकारी खरेदी एकाधिकार सोसायटचांत ही सोय खास आफीसमध्येच केलेली आहे.

**५) मालात भेसळही खपविल्या जाते**

लुचई जातीच्या धानात लुडका जातीचे धान मिसळवून शेतकरी गाड्याबरोबर नळ्यालाही यात्रा घडवून देतात. धानाचे चुरणे संपले ना संपले तोच धान एकाधिकार खरेदीक्षेत्रात पोहोचते केले जातात. पण या क्षणी मात्र धान चांगले वाळलेले नसतात किंवा कधी कधी ओल्या दुष्काळाने सडलेले, कुजलेले धान्य गोदामात विकल्या जातात.

**६) बाजारपेठेचे अंतर कमी झाले**

जेव्हा एकाधिकार खरेदीविभागाचे गोदामस् खेड्यापाड्यात स्थापन व्हायचे होते तेव्हा खेड्यातील शेतकऱ्यांना दूरवर असलेल्या शहरात धान्य विक्रीला न्यावे लागे यात शेतकऱ्यांना फारच जोखमेने वागावे लागत असे. परंतु आता प्रत्येक खेड्यात व काही खेड्यांच्या संयुक्त परिसरात गोदाम स्थापित झालेले दिसतात.

**७) संघटित मागणीद्वारे किंमतीत परिवर्तन**

एकाधिकार खरेदीच्या शेतकऱ्यांना मिळत असलेला आणखी एक फायदा म्हणजे संघटित मागणीद्वारे अन्नधान्याच्या किंमतीत बदल घडवून आणता येतात. १९६६ साली ज्वारीचा प्रतिक्विंटल भाव ७० रु. होता. परंतु शेतकऱ्याच्या संघटित मागणीने तो आता प्रतिक्विंटल ७५ रु. करण्यात आला.

## शेतकऱ्यांच्या दृष्टीने तोटे

शेतकऱ्यांच्या वैयक्तिक हिताच्या दृष्टीने ही नियंत्रित पद्धती काही अंशी सदोष आहे. अशा ह्या सदोष पद्धतीमुळे शेतकऱ्यांना पुष्कळसे तोटेही सहन करावे लागतात.

**(अ) धान्य वसुलीच्या धोरणात कडकपणा**

धान्य वसुलीमागे लेव्ही मागितली जाते. शेतकरी लेव्हीत मागितलेले धान्य एकाचवेळी खरेदीक्षेत्रात पोहोचते करील, असे एकाधिकार खरेदीचा दंडक असल्यामुळे शेत्यांना यात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. लेव्ही देण्यास थोडा फार अवधी झाल्यास तलाठी तहसीलदाराकडे रिपोर्ट पाठवितो व वरिष्ट अधिकाऱ्यांच्या सम्मतीने शेतकऱ्यांच्या घरास कुलूप

लावतो. अशी स्थिती उद्‌भवत असल्यामुळे शेतकरीवर्ग अजूनही एकाधिकार खरेदी-विक्री नियंत्रणाशी सहमत नाही.

**(ब) लेव्ही निर्धारणात घोडचुका**

लेव्ही तलाठ्याद्वारे निर्धारित केली जाते. परंतु या लेव्हीनिर्धारणात अनेक घोडचुका आहेत. प्रमुख चूक अशी की लेव्ही ठरविताना पटवारी शेतकऱ्यांच्या लागवडक्षेत्राकडे डोळेझाक करतो व मनाला जो आकडा पसंत पडेल तो लेव्हीसाठी निर्धारित करतो. यात त्याने शेतकऱ्याच्या (१) संपूर्ण वर्षभराच्या पालन पोषणासाठी किती धान्य लागते, (२) त्याला बी-बियाणासाठी व किरकोळ खर्च भागविण्यासाठी किती धान लागतात तसेच, (३) त्याचे एकंदर उत्पादन इत्यादी गोष्टींचा विचार केला असतो असे नाही. उत्पादन ५० खेड्यांचे तर कधी कधी लेव्ही ५०-६० क्विंटल मागितली जाते. अशी स्थिती म्हणजे शेतकऱ्यांना क्षती पोहोचविणारी स्थिती होय.

**(क) महागाईला अप्रत्यक्ष प्रोत्साहन**

नियंत्रित धान्य-एकाधिकार-पद्धतीमुळे आज महागाईला अप्रत्यक्षरीत्या प्रोत्साहन मिळत असते. शेतकऱ्यांना विकलेला माल गोदामात साठविल्या जातो. परिणामतः अन्नधान्याची चलनगती मंदावते. मुक्त व्यापार असल्यास व्यापारीवर्गातर्फे धान्याचे स्थानांतरण जोरात चालू असते. व त्यामुळे नापिकीच्या प्रदेशात धान्य पुरविले जाते. परिणाम असा होतो की त्या प्रदेशातील शेतकऱ्यांना थोड्या कमी दराने धान्य मिळते. शेतकऱ्याला बिना परवाना धान्य विक्रीसाठी बाजारात मांडता येत नाही; म्हणून बाजारभावही वाढतात. यात शेतकऱ्यांना हानी पोहचते.

**(ड) विक्रीकेंद्रातून देशी माल मिळत नाही**

देशातील शेतकऱ्यांनी जो माल एकाधिकार खरेदीला दिला तोच माल त्यांना अडीअडचणींच्या वेळेस मिळत नाही. शेतकऱ्याव्यतिरिक्त संपूर्ण जनतेला तर अमेरिकन गहू व अर्जेन्टीना मधला मका खावा लागतो व शेतकऱ्यानेही धान्याची मागणी केल्यास त्याला सुद्धा तेच धान्य दिल्या जाते. यात शेतकऱ्यांची शोचनीय स्थिती होते. कारण 'धन्यास धत्तुरा व चोरास मलीदा मिळत असतो.

**(इ) विक्रयासाठी केलेल्या मालाला कमालीची घट**

शेतकरी आपल्या अंदाजाप्रमाणे धान्य विक्रीकेंद्रात नेतो. परंतु त्यात शोचनीय घट झाल्याचे आढळून येते. याचे कारण म्हणजे ४०% प्रतिशत केरकचरा म्हणून समजल्या जाते.

**(फ) विक्रीत मालाचे मूल्य कमी दर्शविले जाते**

वजनात ज्याप्रमाणे केरकचरा सामील असतो, त्याचप्रमाणे विक्रीत मालाच्या किंमतीतही काही कपात केलेली असते. कुजके अन्न म्हणून, व्यवस्थित न वाळलेले अन्न म्हणून त्या धान्याची किंमत काही प्रतिशत कमी लावली जाते.

**(ग) शेतकऱ्यालाच खरेदीकेंद्राकडे जावे लागते**

अगदी शेवटचा तोटा म्हणजे शेतकऱ्यांनाच घरापासून बैलगाडीत धान्य टाकून ते खरेदीकेंद्रात गर्दी असल्यास शेतकऱ्याच्या वैयक्तिक कार्यात विलंब होऊन काही नुकसानही सहन करावे लागते.

**मूल्यांकन**—कृषी उत्पादन नियंत्रणाच्या दृष्टीने (अ) एकाधिकार धान्य-खरेदी-विक्री व (१) गोदामपद्धतीपासून अनेक फायदे व तोटे होत असले तरी भारतातून ह्या नियंत्रण पद्धतीचे उच्चाटन होणे अशक्य आहे. सरकार सध्या ह्या नियंत्रणात कार्यमग्न आहे. देशाला ही धोरणपद्धती अहितकारक असती तर आतापर्यंत समाजाने उच्चाटनाच्या दृष्टीने टीकास्त्र उचलले असते व देशात ह्या पद्धतीचा नामशेष

झाला असता. पण अजून तरी असे झाले नाही. याचे कारण म्हणजे अन्नधान्याच्या नियंत्रणाला असलेले मूल्य होय. आजपर्यंतच्या इतिहासावरून एकाधिकार नियंत्रणाने देशात मोलाचे कार्य केले. भारतात स्वातंत्र्याच्या प्राप्तीपासून तो आजपर्यंत देशातर्गत व परचक्राकडून समस्या अनेक उद्भवल्या, त्यांत स्वातंत्र्यानंतरची अर्थव्यवस्थेची अशक्त स्थिती, १९६२ सालचे चीनचे अस्मानी स्वरूपाचे आक्रमण व १९६५ सालचे पाकिस्थानशी जोरदार युद्ध तसेच १९६४-६५ सालात पडलेला कोरडा दुष्काळ इत्यादी समस्या देशाला हलवून, हादरून व अर्थव्यवस्थेला ढासळून पाडण्यासारख्या होत्या. परंतु सुनियंत्रित अर्थव्यवस्थेच्या वाटचालीने देशात फारशी हानी वगैरे उद्भवली नाही. आतापर्यंत भारतावर जवळ जवळ ४,००० कोटी रुपयाचे कर्ज झाले आहे. 'P.L. 480' कायद्यांतर्गत या देशाकडून गहू, त्या देशाकडून मका व अन्नधान्य आयात कर अशा प्रकारची भिक्षास्थिती भारताची आहे. परंतु अन्नधान्याच्या नियंत्रित खरेदी-विक्रीने ही भिक्षास्थिती काही अंशी सुधारली आहे. म्हणून निदान भारतात तरी कृषी उत्पादनाच्या नियंत्रणाचा अधिनियम देशप्रगतीसाठी विशेष फायदेशीर आहे, असेच शेवटी निष्कर्षरूपाने म्हणावेसे वाटते.

" माझ्या बाळपणातील पाळणा म्हणजे ही भारतभूमी, माझ्या तरुणपणातील उत्साहाची आशा-आकांक्षाची कर्मभूमी म्हणजे ही भारतभूमी आणि माझ्या उतार वयातील मोक्षाची वाराणशी म्हणजे हीच भारतमाता."

–स्वामीविवेकानंद

* * *

"डोळ्यात आशेचे स्वप्न, हातात मृत्यूचे फुल नि अंत:करणात स्वातंत्र्याचे वादळ हाच खरा क्रांतिकारकाचा बाणा होय."

–सुभाषचंद्र बोस

* * *

Take the prouerb to thine heard
Take and hold it fast—

" The mill cannot grind
With the water that is past"

–Doudney

# भारताची अन्न समस्या

बी. एस्. तितरमारे
प्री. कॉमर्स

१५० वर्षे गुलामगिरीनंतर आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ या सुवर्णदिवशी स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आम्हा भारतीय नागरिकांच्या समोर त्यांच्या प्रगतीचा प्रश्न उभा राहिला. आजवर परकीयांनी आम्हा भारतीयांची पिळवणूक केली. आज आम्हाला आमचा सर्वांगीण विकास घडवून आणावयाचा आहे. परंतु आमच्या देशासमोर ज्या सामाजिक, आर्थिक समस्या आहेत त्या सर्वांत वाढत्या लोकसंख्येची आहेत. देशाच्या आर्थिक व औद्योगिक विकासाच्या मार्गातील फार मोठी घोंड आहे.

भारत हा एक विशाल देश आहे. भारताची लोकसंख्या दरवर्षी फार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करणे ही फार मोठी समस्या आहे. आजच्या परिस्थितीकडे पाहीलं असता असे दिसून येईल की भारतामध्ये शे. ८० टक्के लोक शेतीचा धंदा करून आपले जीवन कंठीत असतात. परंतु वाढत्या लोकसंख्येसमोर अन्नधान्याचा पुरवठा कमी पडतो. त्यामुळे आपल्या सरकारला दरवर्षी २० कोटी टन अन्न परदेशातून आणावे लागते. तरीही लोकांना अन्न पुरत नाही. ज्या प्रमाणात लोकसंख्येची अतिशय जोराने वाढ होते त्या दृष्टिकोणातून पाहिलं असता आपल्या देशामध्ये उत्पन्नाची वाढ कमी होत आहे. त्यामुळे लोकांना अन्न मिळणे कठीण झाले आहे. वाढत्या लोकसंख्येच्या समस्येमुळे आपले सरकार अन्नसमस्या सोडविण्यास असमर्थ आहे. भारतामध्ये उत्पादन कमी होत असूनही मोठमोठे व्यापारी आणि श्रीमंत लोक अन्नधान्याचा साठा गोदामात भरून ठेवतात व ज्यावेळी अन्नधान्याचे भाव जास्त प्रमाणात वाढतात तेव्हा कुठे ते धनाच्या लालसेने धान्याचा साठा काळ्या बाजारात विकण्याकरिता काढीत असतात, तेव्हा गरजू, अडलेले ग्राहक (शेतकरी) खरेदीकरिता आले असता तोंडास येईल तो भाव सांगतात. ग्राहकांना त्या व्यापाऱ्यांच्या तोंडात मारावेसे वाटते. पण गरजेमुळे त्यांना स्वतःच्या तोंडात मारून मिटलेल्या तोंडाने पैशाचे पाकीट उघडावे लागते. या काळ्या बाजाराचा परिणाम काय होतो? तर व्यापारी किंवा श्रीमंत जास्त श्रीमंत बनतो आणि ग्राहक किंवा गरीब शेतकरी शेवटी भिकारी बनतो. आणि अशा भिकाऱ्यांची संख्या ज्या देशात जास्त होते तो देश विपन्नावस्थेस जातो. असा हा काळ्या बाजाराचा महिमा आहे. काळा बाजार करणाऱ्यांचे अंतःकरणही काळेच असते. स्वतः वैभवसंपन्न कसे होता येईल आणि चार मजली इमारती करून अव्वाच्या सव्वा भाडे त्यापासून आपण कसे घेऊ याकडे त्यांचे लक्ष असते. असे लोक कोण असतात? तर एकंदरीत मला म्हणावं लागेल हेच लोक राष्ट्राचे शत्रू आहेत. आपल्याजवळ जे आहे ते दुसऱ्यास थोडे देऊन पुण्य करावे ही जी धर्माची शिकवण ती ते पार विसरून जातात.

आपल्या हातून एखाद्याचे बरे होत असेल तर का करू नये !

आपल्या हातून परोपकार होत आहे तर
का करू नये !

आपण एखाद्याला सुमार्गाला लावीत आहोत तर
का लावू नये ?

आपण एखाद्याला अन्न मिळत नाही तर
त्याला अन्नाला
का लावू नये ?

जगात तर पुण्यप्राप्तीच्या अनेक वाटा आहेत. तेव्हा आपण ह्या मार्गात पुण्याचे वाटेकरी
का होऊ नये ?

आपल्या हातून सत्कार्य घडत आहे तर
का त्याचा फायदा घेऊ नये ?

तुम्ही जे कराल ते स्वतःच्या दृष्टीने पुण्य तर आहेच पण राष्ट्राच्या दृष्टीने एक महान कार्य आहे असे मी समजेन. पण उलट हे श्रीमंत आणि व्यापारी लोक लोकांजवळचे जे आहेत तेच आपल्या तिजोरीत कसे येऊन पडेल या चिंतेत असतात. सरकारने काळ्या बाजाराला आळा घालण्याचा प्रयत्न केला तरी त्यातून सुटण्याचा पद्धतशीर प्रयत्न हे "बच्चाई साकू" करतात. गिऱ्हाईकांनी जास्त किंमत देऊन माल खरेदी करू नये म्हणजे या बाजाराला आळा बसेल, असे आपले सरकार सांगते. पण नित्य लागणाऱ्या वस्तू जर मिळेनाशा झाल्या तर गिऱ्हाईकांनी तरी काय करावे सांगा ना सरकार ?

"आई जेवू घालीना आणि बाप भिक मागू देईना" अशी दुःखात सापडल्यागत त्यांची स्थिती होते.

शेतकीदृष्टिकोणातून पाहिलं असता भारत देशातील शेतकीप्रधान लोक विज्ञानाने निर्माण केलेल्या शेतीउपयोगी यंत्रांचा उपयोग करीत नाहीत तसेच नवीन पद्धतीने धान्याची लागवड करीत नाहीत. तर ते आपल्या पूर्वजांच्या मागासलेल्या पद्धतीने शेती करतात. अशा या आधुनिक पद्धतीच्या अभावामुळे खरोखर आपल्या भारतदेशामध्ये उत्पादनाची वाढ होत नाही. दुसरं असं म्हणता येईल की निसर्गाने आपल्या भारतदेशावर एक प्रकारची मातच केली आहे. कधी कधी जास्त पाऊस तर कधी कधी काहीच नाही. याचा परिणाम आज सतत ३ वर्षे झाली आहेत. भारतामध्ये निव्वळ अन्नाचा तुटवडा निर्माण होत आहे.

वरील गोष्टीचा विचार करून भारतसरकारने अन्न समस्यावर उपाय योजना काढली आहे. १९५२ मध्ये सरकारने अन्न धान्याचे उत्पादन वाढविण्याकरिता भारतीय शेतकऱ्यास प्रोत्साहन दिले आहे. तरी पण भारत सरकारने शेतीला उत्तम प्रकारचे आणि मुबलक प्रमाणात खत दिले पाहिजे. तसेच पाट, बंधारे आणि नद्यांना कालवे काढून आणि धरणं बांधून त्यापासून शेतीला पाणी पुरविणे तद्वत् शेतकरी बंधूंना शेती करण्यासाठी त्यांच्या आर्थिक गरजा नाहीशा केल्या पाहिजेत व त्यांना आर्थिक मदतही केली पाहिजे. त्यांना कर्ज (तगाई) द्यायला पाहिजेत. अशा प्रकारच्या अनेक सुधारणा करून सरकारनेसुद्धा शेतकरीबंधूंची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा मार्ग शोधून काढला पाहिजे. तरच या आपल्या भारतदेशाची परिस्थिती सुधारेल. कारण; म्हटलं आहे की...

"शेतकरी सुखी तरच देश सुखी"

तद्वत् शेतकरीवर्गाने सुद्धा आधुनिक पद्धतीचा अवलंब करून शेती करायला सुरुवात केली तर अन्न-धान्याची वृद्धी जास्त प्रमाणात होऊ शकेल. दुसरे महत्त्वाचे कारण असे की शेतीच्या लागवडीकरिता फारच थोडी जमीन उपयोगात आणली जाते. ज्या लोकांजवळ जास्त जमीन आहे ते २५ किंवा ३० एकरच जमीन फक्त

लागवडीखाली आणतात आणि जास्तीत जास्त जमीन कापूस लागवडीखाली आणतात. तसेच फार मोठ्या प्रमाणात जवळ-जवळ २७ कोटी एकर जमीन बिना लागवडीखाली आहे की, ज्या ठिकाणी जंगले वाढलेली आहेत. अधिक जमीन लागवडीखाली आणण्याकरिता काही उपाययोजना अंमलात आणावयास पाहिजे. जेथे लोकसंख्या जास्त; जमीनही मुबलक मग त्या जमिनीचा उपयोग लागवडीखाली का करू नये ? शेतकरी लोकांनी जपानी पद्धतीने धान टाकायला पाहिजे. आणि ज्वारी १८ इंचावर लावून त्यांना उत्तम खत देऊन पिकावर औषधी टाकायला पाहिजे व उत्तम पीक काढायला पाहिजे आणि आपल्या भारताला त्यामधून साहाय्य करायला पाहिजे.

असे पुष्कळ देश आहेत की; त्या देशांना अन्नधान्याची फारच गरज आहे. रशिया, चीन सारख्या देशांत अन्नधान्याची फारच आवश्यकता आहे. आपण जर जास्त प्रमाणात अन्नधान्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर आपणही लहानलहान देशाला सहारा देऊ शकू. मग आपल्याला मोठमोठ्या देशावर अन्नधान्यासाठी अवलंबून राहावे लागणार नाही. भारत सरकारने १९५६ पासून जी 'झोनल सीस्टिम' काढलेली आहे ती बंद करून ज्या प्रदेशात अन्न कमी पिकते त्या प्रदेशाकडे जास्त पिकणाऱ्या प्रदेशाकडून अन्न पाठवायला पाहिजे म्हणून प्रथम शेती नंतर औद्योगीकरण असा विचार करावयास पाहिजे.

लोकसंख्येच्या प्रश्नाकडे आणखी एका दृष्टिकोणातून पाहणे इष्ट ठरेल भारताचा भू-भाग तरी किती आहे ? त्यात मनुष्यबळ सामावून घेण्याला काही मर्यादा असणारच. भारतामधील जमीन जगातील एकूण जमिनीच्या २.४ टक्के आहे व लोकसंख्या मात्र जगातील लोकसंख्येच्या १४·६ टक्के आहे. लोकसंख्या ही थोडी फार वाढत राहणारच. पण त्याला काही प्रमाणबद्धता अवश्य पाहिजे. समाजाच्या प्रत्येक घटकाने वयात आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाने या बाबतीत विचार केला पाहिजे व एक प्रकारची आचारसंहिता अंमलात आणली पाहिजे. तरच लोकसंख्येचा आणि अन्नसमस्येचा हा अवघड प्रश्न सोडविला जाईल किंवा सोडविता येईल.

"जय जवान जय किसान"

An honest man is the noblest work of God.

—Pope

* * *

The only thing we have to fear itself.

—Roosevelt

* * *

"दुसऱ्याच्या दुःखाचा विचार करावयास शिकला तोच खरा सुशिक्षित होय."

# अवमूल्यन आणि भारताची आर्थिक स्थिती

मारोती गरपडे
बी. कॉम. (अन्त्य)

दिनांक ६ जून १९६६ रोजी अर्थमंत्र्यांनी रुपयाचे अवमूल्यन केल्याची घोषणा केली. ह्या महत्त्वपूर्ण व विचारपूर्ण आर्थिक उपायामुळे आपल्या देशाच्या आर्थिक विकासावर आणि अर्थकारणावर भयंकर परिणामाचा विचार करणे आवश्यक आहे. भारत सरकारने अवमूल्यन घोषित करण्याचे कारण म्हणजे आपल्या देशाची निर्यात वाढवून आंतरिक उद्योगाचा विकास साधणे हे होय. परंतु त्याचप्रमाणे मुद्रास्फीती होऊन चलनवाढ, मूल्यवाढ, विदेशी भांडवलाची आपल्या अर्थकारणावर पकड, भांडवली विकास, विदेशाचे वाढते देणे, आर्थिक कर्जबाजारी, व्याजाची डोईजड रकम, आर्थिक संतुलन, इत्यादी अनेक प्रकारचे धोकेसुद्धा संभाव्य आहेत.

आपल्या देशाचे आर्थिक असंतुलन सावरून धरण्यासाठी चलनाच्या अवमूल्यनाची उपाययोजना करण्यात आली. आपल्या देशाच्या अन्नधान्याच्या मोठ्या प्रमाणातील आयातीमुळे प्रतिकूल व्यापाराधिक्य सतत वाढत आहे. असंतुलित व्यापाराधिक्य १९५०–५१ साली ५० कोटी रु. होते. ही रकम १९६५–६६ साली ५४७ कोटी रुपयापर्यंत वाढलेली आहे. मागील पंधरा वर्षांच्या काळात एकूण आयात १४,६०८ कोटी रु. ची झाली व निर्यात फक्त ९,९०८ कोटी रु. ची होती. अशाप्रकारे ४७०० कोटी रु. चे अनिष्ट व्यापाराधिक्य निर्माण झालेले आहे. ही रकम प्रथम पंचवार्षिक योजनेच्या दुप्पटीपेक्षाही अधिक आहे. ही परिस्थिती बदलण्याकरिता भारत सरकारने रुपयाचे अवमूल्यन केले, हे जरी खरी असले तरी ज्या परिस्थितीत हा निर्णय घेण्यात आला त्याचा आढावा घेणे अत्यंत महत्त्वपूर्ण व अत्यावश्यक आहे.

**चलनवृद्धीचा दर**

आपल्या देशात १९५०–५१ पासून योजनेचा काळ सुरू झाला. योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता जास्तीत जास्त प्रमाणात तुटीचे अर्थप्रबंधन करण्यात आले. व परिणाम असा झाला की, एकूण चलनाचा प्रदाय वाढला. चलनाच्या वृद्धीचे स्वरूपही खालील आकडयावरून स्पष्ट होईल.

| वर्ष | एकूण खेळते चलन (कोटी रु.) |
|---|---|
| १९५६–५७ | २२३३ |
| १९६५–६६ | ४२३५ |

वरील दिलेल्या रुपयाच्या प्रदायासंबंधी मागील दहा वर्षांच्या काळात १०७ टक्के चलन वाढ झालेली आहे. पण प्रत्यक्षात राष्ट्रीय उत्पन्नात फक्त ४० टक्केच वाढ आहे. व म्हणून मूल्यवाढ ७८ टक्के दिसून येते, चलनवाढीमुळे रुपयाची क्रयशक्ती ४४ टक्क्यांनी कमी झालेली आहे. ही स्थिती कोणत्याही राष्ट्राकरिता भयानक होय. इतर काही देशांच्या तुलनेने मूल्यवाढ आपल्याच देशात अधिक आहे असे दिसून येते.

| राष्ट्र | मूल्यवाढ टक्के (काळ १९५० ते ६५) |
|---|---|
| भारत | ७८ |
| पाकिस्थान | ४९ |
| अमेरिका | ३१ |
| कॅनडा | १८ |
| सिलोन | १६ |
| प. जर्मनी | १० |

चलनाच्या फुगवटचामुळे देशात मुळातच मूल्यवाढ आहे. अवमूल्यनामुळे सर्वसामान्य वस्तूंच्या किमतीत वाढच होणार आहे देश औद्योगिकदृष्टचा स्वयंपूर्ण नसल्यामुळे यंत्र, जड, औद्योगिक साभग्री, आवश्यक कच्चा माल इत्यादीबाबत आयातीवरच किंमत वाढेल व परिणामत: उत्पादित मालाचे मूल्यसुद्धा वाढेल. अधिक उत्पादन मूल्यसुद्धा वाढेल. अधिक उत्पादनमूल्य असलेल्या भारतीय वस्तू अवमूल्यनानंतर सुद्धा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेत यशस्वीपणे टिकू शकतील किंवा नाही ही शंकाच आहे.

आपल्या देशाला अवमूल्यनाचा खरा फायदा ५७·५ टक्के निर्यात वाढीपेक्षा अधिक निर्यात केल्यासच मिळू शकेल.कारण 'इकॉनॉमिक टाईम्स'ने केलेल्या एका अनुमानानुसार डॉलर क्षेत्रात जर ५७·५ टक्के निर्यात वाढ झाली तर अवमूल्यनाच्या पूर्वीच्या स्थितीपर्यंत भारत पोहोचू शकेल. असे स्पष्ट केलेले आहे. भारत देश कोटी १०० टक्क्याने निर्यात वाढवील हे काही निश्चित सांगता येत नाही. निर्यातवृद्धी होण्याकरिता खालील गोष्टी घडणे किंवा तशी अनुकूल परिस्थिती अस्तित्वात असणे आवश्यक आहे.

१) निर्यातीकरिता उत्पादनाधिक्य असावे.

२) उत्पादित मालाचा तुलनात्मक दर्जा वाढवावा.

३) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमत-स्पर्धेत टिकाव.

४) व्यापारिक सचोटी.

५) भारतीय माल आयात करणाऱ्या देशातील राजकीय परिस्थिती.

आपल्या देशात अस्तित्वात असलेली अन्नधान्याची कमतरता, तुटीची परिस्थिती, कच्च्या मालाची कमतरता, इत्यादी गोष्टी लक्षात घेता उत्पादनाधिक्य राहील अशी अपेक्षा करणे फोल ठरेल. उलट वाढत्या जीवनामुळे लोकांचा उपभोग वाढून यंत्रकनिर्मित मालाला देशाची अंतर्गत मागणी वाढेल. तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे सुद्धा आंतरिक गरज अधिक राहील. अशा प्रमाणात निर्यातीकरिता वस्तू उपलब्ध राहणे कठीणच आहे. लोकांनी उपभोगाचा त्याग केल्याशिवाय निर्यातवाढ लाभदायक पद्धतीने होणे अशक्य आहे.

आपल्या देशातून विदेशात निर्यात होणाऱ्या वस्तू कोणत्या व त्यांच्या निर्यातीत वाढ होणे शक्य आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. १९६४-६५ साली निर्यातीत वस्तूंचे टक्केवारीने प्रमाण खालीलप्रमाणे होते.

| निर्यातव्यापार | एकूण निर्यातीत टक्के प्रमाण |
|---|---|
| ज्यूट वस्तू | २०.७ |
| चहा | १५.३ |
| कापड | ७.१ |
| कच्चे लोखंड | ४.६ |
| काजू | ३.६ |
| यांत्रिक सामान | ३.५ |
| साखर | २.४ |
| व्हिजीटेबल तेल | १.३ |
| इतर | ४१.५ |
| | १००.०० |

## बी. कॉम. ( अन्त्य ) विद्यार्थी




१. प्रा. निसाळ २. प्रा. लाखनकर ३. प्रा. देशपांडे ४. प्राचार्य देशपांडे ५. प्रा. हडप ६. प्रा. सोमण ७. प्रा. डे. ८. प्रा. मुंडले

१. एस्. टो. भोंगाडे २. पी. एन्. ब्रह्मपूरकर ३. सी. बी. राऊत ४. वाय्. एस्. झलके ५. डी. डी. वंजारी
६. जी. टी. चेटुले ७. यु. जे. सार्वे ८. एम्. एम्. कल्याणकर

१. बोरकर २. एम्. डी. साखरे ३. एम्. ए. हर्षे ४. एच्. पी. चोले ५. टी. एस्. भुरे

छायाचित्राचे वेळी अनुपस्थित- १. आर. एम्. वालदे २. टी. ए. रामटेके ३. डो. पी. पायोडे ४. एम्. एस्. मेश्राम

छात्र सेना १९६८–६९



आपल्या देशात निर्यातव्यापारात ज्यूट व चहा या प्रमुख वस्तू आहेत. ज्यूटची निर्यातवाढीची शक्यता कमी आहे. त्यातल्या त्यात जागतिक बाजारपेठेत पाकिस्थान एक शक्तिशाली स्पर्धक आहे. चहाबाबत सुद्धा हीच परिस्थिती आहे. १९६४ सालापर्यंत जगात चहा निर्यातीबाबत भारत पहिल्या क्रमांकाचे राष्ट्र होते. पण १९६५ साली सिलोनने ४९१ दशलक्ष पौंड चहा निर्यात करून हा क्रमांक पटकाविला. भारताची निर्यात ४४० दशलक्ष पौंड होती जागतिक निर्यातीत भारताचा हिस्सा १९४९ साली ५१ टक्के होता. तो १९६४ साली ३७ टक्केपर्यंत पसरला. जागतिक स्पर्धेत सिलोनच्या सोबत चीन व पाकिस्थान अथवा ऑफ्रिकन राष्ट्रेसुद्धा आहेत. म्हणून अवमूल्यनामुळे चहाच्या निर्यातीत आश्चर्यजनक वाढ होईल. ही शक्यता कमी आहे.

**विदेशी व्यापाराचे स्वरूप**

ज्या राष्ट्राशी भारताचा निर्यातव्यापार चालतो ती राष्ट्रे व त्याचे प्रतिशत प्रमाण खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| ब्रिटन | २०.३ टक्के |
| अमेरिका | १८.१ टक्के |
| रशिया व पौर्वात्य राष्ट्रे | १७.७ टक्के |
| जपान | ७.४ टक्के |
| ऑस्ट्रेलिया | २.५ टक्के |
| कॅनडा | २.१ टक्के |
| प. जर्मनी | २.१ टक्के |
| अरवलोकसत्ताक | २.०० टक्के |
| फ्रान्स | १.४ टक्के |
| पाकिस्थान | १.२ टक्के |
| वर्मा | ०.९ टक्के |

ह्यापैकी वहुतेक राष्ट्रे पुढारलेली असल्यामुळे भारताच्या मालाला अधिक मागणी घालतील ही शक्यता कमीच आहे. निर्यात वाढविण्याकरिता आंतरिक उद्योगाची शक्ती वाढविणे आवश्यक आहे.

देशाची अर्थव्यवस्था अप्रगल्भ असल्यामुळे निर्यातवाढीकरिता आवश्यक शक्तीची निर्मिती करण्यास असमर्थ ठरणार आहे. म्हणून सरकारचा रुपयाच्या अवमूल्यनाचा निर्णय हा आर्थिकदृष्टचा हानिकारक ठरणार असून राष्ट्राला आर्थिक गर्तेत नेणार की काय अशी शंका येते.

आयातीसंबंधीचा सरकारचा दृष्टिकोण सुद्धा अतिशय अवास्तव आहे सरकारने आयातीत काटछाट करण्याचा प्रयत्न करून सुद्धा आयात रकमेच्या दृष्टीने कमी होणार नाही. ज्या ६० वस्तूंना आयात सवलत सरकारने जाहीर केलेली आहे. त्यात चैनीच्या मोटार, सायकल्स, स्कुटर्स, मोपेड हृया सुद्धा आहेत. त्याव्यतिरिक्त चहा, कॉफी, सिमेंट, साखर, कापड, डब्यातील सुरक्षित मासळ्या इत्यादी अनावश्यक वस्तूंना आयात जाहीर केलेली आहे. हृयावरून आयातीत उधळपट्टी सुरूच राहणार आहे. अवमूल्यनाची घोषणा करताना अर्थमंत्र्यांनी "इम्पोर्ट सबस्टीटयूशन" मोठा आशावाद निर्माण केला होता. पण हा आशावाद भारतीय उत्पादनक्षेत्रात किती अनाठायी आहे.

**आर्थिक ओझे वाढणार ?**

अवमूल्यनाचा उद्योगविकासाला फायदा न होता देश अधिकाधिक कर्जबाजारी होईल. अवमूल्यनाच्या निर्णयामुळे विदेशी भांडवलाची किंमत वाढेल. अवमूल्यन घोषित केल्याक्षणीच अमेरिकेच्या ३२६६ कोटी रु. कर्जाची रकम वाढून ३५७० कोटी रु. झाली. अशाप्रकारे अमेरिकेला १३०४ कोटी रु. चा प्रचंड लाभ झाला. कर्जाचे ओझे १२,००० कोटी रुपयाहून वाढले असून व्याजाच्या परतफेडीची रकम

दरवर्षी १५० कोटी रु. राहणार आहे. असे अनुमान आहे. ह्या विशाल रकमेची परतफेड करता यावी म्हणून विदेशी कर्ज घेणे भाग पडणार आहे. अशाप्रकारे भारतीय अर्थव्यवस्था ऋणबाजारी होऊन आर्थिकदृष्टया भयावह परिस्थिती भविष्यकाळात निर्माण झाल्यास नवल नाही.

### विकासावर परिणाम

अवमूल्यनामुळे औद्योगिक उत्पादनात वाढ होईल. असे म्हणणेसुद्धा फोल ठरणार आहे. निर्यात-प्रोत्साहन-कार्य हाती घेतल्यानंतर सुद्धा औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक १९१.१ वरून १८६.५ पर्यंत ऱ्हासमान झालेला आढळून येतो. तृतीय पंचवार्षिक योजनेच्या काळात औद्योगिक उत्पादन ११.१ टक्कयाने प्रतिवर्षी वाढवावे हा उद्देश होता. पण प्रत्यक्षात वाढ ६.६ टक्क्यानेच झालेली आहे.

### सारांश

सरकारच्या धोरणानुसार अवमूल्यनामुळे उत्पादनशक्ती वाढेल, अर्थव्यवस्था विकासशील होईल. आंतरिक भरभराट होईल, आयात ऱ्हास पावेल, मूल्यवृद्धी होणार नाही, ह्या सर्व गोष्टीं-वर प्रत्यक्ष अनुभव जमेस धरता कोणाचाही विश्वास बसणे शक्य नाही. उलट आर्थिक गोंधळ माजून असंतुलन निर्माण होईल, हे निश्चित होय.

अवमूल्यनामुळे भारताचा समाजवादी राष्ट्राबरोबर असलेला व्यापारिक संबंध संपुष्टात येईल. हा फार मोठा तोटा संभवतो. भारताचे समाजवादी राष्ट्रांबरोबर असणारे आर्थिक संबंध ऱ्हास पावल्यामुळे आंतरराष्ट्रीय मक्तेदारी संस्थेची मूल्यनिर्धारण शक्ती वाढेल. भारताला रुपयाचे अवमूल्यन करण्यास भाग पाडण्या-मागील अमेरिकेचा राजकीय दूरदर्शी दृष्टिकोण ह्यामुळे स्पष्ट होतो.

# शेतीचा कायाकल्प

**परशुराम ब्रम्हपुरकर**
बी. कॉम, अन्त्य

सबंध देशाची जी चवथी पंचवार्षिक योजना नियोजन मंडळाने तयार केली आहे त्यात ज्या ज्या प्रश्नांना अग्रक्रम देण्यात आला आहे त्यापैकी शेती हे एक प्रधान आहे, तिसऱ्या योजनेत पडलेला दुष्काळ, परकीय चलनांचा तुटवडा, परदेशाकडून अन्नधान्य मिळण्याबाबत आलेल्या अडचणींचा अनुभव इत्यादी बाबींमुळे अन्नधान्य स्वावलंबनाचे महत्त्व साऱ्या जगाला पटले आहे.

अन्नधान्याची तुट ही तर महाराष्ट्राच्या पाचवीला पूजलेले एक दुखणेच आहे. सबंध देशाला जेवढी अन्नधान्याची तूट पडते त्याच्या ⅓ तूट एकटचा महाराष्ट्राची असते. म्हणूनच अन्नधान्याची आघाडी ही प्रत्यक्ष युद्ध-आघाडी आहे असे शासनाने व जनतेने मानले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक जेव्हा योजनांबद्दल बोलतात तेव्हा ते असेच म्हणतात.—"देशाला तुम्हाला औद्योगीकरण हवं ना? कबूल, परंतु त्यासाठी शेतीला प्रथम त्या सर्वांचा केंद्रबिंदू समजून शेतमालाच्या प्रक्रियेने कारखाने काढूनच ते केले पाहिजे". कृषी–औद्योगिक समाजरचना हे आपले ध्येय आहे ना? मग शेतीकडे दुर्लक्ष करून कसे चालणार? शेती हाच देशातील प्रमुख व सर्वात मोठा उद्योगधंदा आहे. आणि म्हणूनच हा धंदा करण्यासाठी शास्त्रीय वृत्ती व तांत्रिक शक्तीचा उपयोग करायला पाहिजे.

आपल्या शेतकरी बंधूंच्या कार्यपद्धतीवर तुमचा विश्वास असेल तर तो ह्या दिडशे वर्षांच्या पारतंत्र्याच्या काळात किती खचून गेला याची कल्पना येईल. ब्रिटिशांनी, सावकारांनी, दलालांनी, व्यापाऱ्यांनी त्यांचे शोषण केले. आणि म्हणून ह्या गोष्टींचा आपण योग्य विचार करायला पाहिजे.

म्हणून दुष्काळ निवारण्याचे कार्य चालू असताना व शेतकऱ्यांना तातडीचे साहाय्य देत असतानाच महाराष्ट्राच्या चवथ्या योजनेची निर्मिती होते. सर्वांत अग्रक्रम शेतीलाच दिला आहे व ९५१ कोटी रुपयांच्या एकूण खर्चापैकी ४३ टक्के खर्च शेतीविषयक कामावर होणार आहे. म्हणूनच शेतीशी संबंधित कार्यक्रमाला हे जे महत्त्वाचे स्थान दिले आहे त्यामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला मदतच नाही तर एक आवश्यक बाब म्हणून संबोधिले जाईल.

चवथ्या योजनेच्या अखेरपर्यंत म्हणजेच १९७१–७२ पर्यंत महाराष्ट्राची लोकसंख्या ५ कोटींच्या वर जाईल. कमीत कमी १ लक्ष टन अन्नधान्य पिकवावे लागेल. गेल्या तीन योजनांतून अन्नधान्य क्रमशः वाढतच गेले आहे. महाराष्ट्रातील एकूण जमिनीच्या ६९% जमीन पीकलागवडीखाली आणली जात आहे. "शेतमालाचे एकरी उत्पन्न वाढावे" म्हणून त्यासाठी चवथ्या योजनेत पुढील तरतूद करण्यात येणार आहे. हे पुढील तक्त्यावरून दिसेल.

| क्रमांक | | करण्यात येणारा खर्च |
|---|---|---|
| (१) | विहिरी व पाटबंधारे | २४०.५० कोटी रु. |
| (२) | पाटबंधाऱ्याखाली आलेल्या जागी योग्य शेती करणे | ३ .५० ,, |
| (३) | अवजारे व बी-बियाणे | ६ .९१ कोटी रु. |
| (४) | जमिनींची सुधारणा करणे | ४३. कोटी रु. |
| (५) | संकरीत बियाण्यांचा उपयोग | २.८ ,, |
| (६) | सघन शेती | .७५ कोटी रु. |
| (७) | पीकवाढी स्पर्धा व मोहिमा. | २.– कोटी रु. |

अशाप्रकारे शेतीवर जास्त प्रमाणात खर्च करूनच शेतीचा विकास म्हणजेच महाराष्ट्राचा-देशाचा-विकास आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना सुधारलेले व संकरीत बी, नांगरण्याच्या उत्तम सोयी, गरजेप्रमाणे आर्थिक मदत, पाणी-पुरवठ्यांच्या उत्तम सोयी, जंतुनाशक औषधांचा पुरवठा इत्यादी सोयी करून देऊन मगच शेतीकडून उत्पन्नाची अपेक्षा करणे यथार्थ ठरेल. एवढे करूनही अन्नधान्याचे आलेले उत्पन्न योग्य भावात विकण्यासाठी एकाधिकार-खरेदी या न्यायतत्त्वाखालीच व्हायला पाहिजे व त्याचा योग्य मोबदला शेतकऱ्यांच्या पदरात पडला पाहिजे.

त्यासाठी तुम्ही प्रथम आपला दृष्टिकोण बदला व शेतकरी प्रोत्साहित होतो किंवा नाही ते पाहा. सर्वसामान्य व न्याय्य सोयी शेतीला उपलब्ध करून देण्यात कोणत्याही प्रकारचा चुकारपणा केला जाऊ नये याची दखल घ्यावी. त्यामुळे सर्वच हंगामी व मोसमी पिके घेतली जातील. अन्नधान्याचे उत्पादन वाढेल; ग्रामीण विभागात भरभराट होईल; ग्रामीण कारखानदारीला चालना मिळेल; उत्पादन वाढेल; रोजगारी वाढेल व बेकारीचा प्रश्न काही अंशी तरी जरूर सुटेल. मालाची निर्यात वाढेल व त्यामुळे वाढत्या महागाइला खरे उत्तर मिळेल ते फक्त शेतीचा 'कायाकल्प' करूनच.

एकदा दिल्ली येथील एका सभेत इंदिरा गांधींनी शेतकऱ्यांचा गौरव केला व असे म्हटले की महाराष्ट्राने अंगीकारलेल्या स्वावलंबनाच्या सर्व कार्यक्रमांचा अंगीकार साऱ्या देशाने करावा. येत्या पांच वर्षात भारत अन्नधान्याच्या बाबतीत समृद्ध होईल. "त्यासाठी शेतीलाच अग्रक्रम दिला जाईल व चवथ्या योजनेतील प्रगती मंदावली तरी चालेल. आपणाला परदेशावर अन्नधान्यासाठी अवलंबून राहणे हे भारताच्या स्वाभिमानाशी सुसंगत नाही".

# भारतातील नियोजन

## एक सैद्धांतिक परीक्षण

लेखक : प्रा. गो. नी. हडप

आजच्या भारताच्या योजनांमध्ये सैद्धांतिक उणेपणा प्रकर्षानी जाणवतो, त्यात बेजबाबदारपणाही आहेच. डॉ. किन्स या अर्वाचीन अर्थशास्त्रज्ञानुसार प्रत्यक्ष विचार केलेला नाही. सैद्धांतिक गैरसमज, त्यात असलेली न्यूनता यामुळे आमच्या पुढील प्रश्न तसेच कायम राहिलेत. प्रश्नांचा योग्य उलगडा करण्यासाठी योग्य सैद्धांतिक योजनांची आवश्यकता आहे. नियोजन व आर्थिक विकास केवळ सैद्धांतिक विवादाचा प्रश्न आहे काय ? नाही ! 'अर्धविकसित राष्ट्राचे अर्थशास्त्र' किंवा 'प्रगतिशील राष्ट्राचे अर्थशास्त्र' यासंबंधी बराच विचारविमर्श केला जात आहे. प्रा. हिक्स यांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास "Underdevelopment economics is a vastly important subject, but it is not a formal or theoretical subject, it is a practical subject which must expect to call upon any branch of theory (including noneconomic, for instance sociological theory) which has any relevance."

आजच्या समकालीन अर्थव्यवस्थेशी काही प्रश्न अगदी निगडित आहेत. त्यादृष्टीनी आम्ही नव्यानी विचार करणे योग्य ठरेल. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत आर्थिक विकास गुंतागुंतीचा व चमत्कारिक दिसत आहे. जुनाट वस्तूंच्या प्रतिनिधित्वासाठी असलेले आलेख यांचे रूपांतर कृत्रिम व सुंदर पद्धतीने खर्च व उत्पादनाच्या सारणीत झाले आहे. यांचा उपयोग राष्ट्राच्या नियोजनासाठी कमी प्रमाणात करण्यात यावा असे नाही. परंतु जेव्हा अर्थशास्त्रज्ञ तांत्रिक परिपूर्णता व त्याचे उपभोग्य वस्तूच्या संबंधीचे आलेख यांचा काळजीपूर्वक विचार करतात तेव्हा ते जुने असोत वा नवीन असोत त्यांचे आवश्यकतेनुसार प्रतिनिधित्व करता येते.

### निर्णयांचा समुच्चय

आर्थिक पद्धतीचा अनेक निर्णयांद्वारे विचार केला जातो. यांत तीन निर्णयांचा विचार केला गेला आहे.उदा.–विनियोजन (Investment) निर्णय, (भांडवली वस्तू निर्माण करण्याविषयीचा निर्णय) बचत निर्णय (Saving Decision) (उत्पादनाचा किती भाग उपभोगासाठी खर्च करावयाचा व किती भविष्यासाठी संचित करावयाचा) आणि रोजगार निर्णय (Employment Decision) राष्ट्राच्या आर्थिक विकासाची विभाजनाची पद्धती दोन स्वरूपात असू शकते (१) परस्पराशी संबंधित (२) सामुदायिक परिपूर्ण विभाग– या निर्णयाच्या आधारावर अर्थव्यवस्थेची विभागणी (१) गुंतवणूक करणारे (२) गुंतवणूक न करणारे (३) रोजगार देणारे (४) रोजगार न देणारे प्रत्येकाचे दोन पोट विभागात विभाजन करता येते. उदा– (१) गुंतवणूक करणारा (अ) स्वतः भांडवल गुंतविणारे (ब) ऋण घेऊन भांडवल गुंतविणारे.

(२) बचत करणाऱ्यांचे (अ) बचतीचा उपयोग करणारे (ब) बचत कर्जाऊ देणारे.

(३) रोजगार देणाऱ्यांचे (अ) स्वतः रोजगार देणारे (ब) इतराद्वारे रोजगार देणारे.


राष्ट्राची अर्थव्यवस्था खालील नऊ भागात विभाजित केली जाते.

(१) गुंतवणूक निर्णयाच्या स्वरूपात
- अ) गुंतवणूक न करणारे (गु. न.)
- ब) स्वतः गुंतवणूक करणारे (स्व. गु.)
- क) कर्ज घेऊन गुंतवणारे (क. गु.)

(२) बचत निर्णयासंबंधी
- अ) बचत न करणारे (ब. न.)
- ब) बचतीचा उपयोग करणारे (ब. उ.)
- क) बचतीचा कर्जासाठी उपयोग करणारे (ब. क.)

(३) रोजगार निर्णयासंबंधी
- अ) रोजगार न देणारे (रो. न.)
- ब) स्वतः रोजगार देणारे (स्व. रो.)
- क) रोजगार देणारे इतर (रो. इ.)

आलेख क्र. १




ही विभागणी आलेखाच्या साहयाने क्र. १ मध्ये दर्शविली आहे. ही विभागणी एकत्रित स्वरूपात आलेख क्र. २ मध्ये दर्शविली आहे. या विभागणीचा उपयोग अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करणे हा आहे. त्याची विभागणी क्षेत्रात करण्यात आली आहे. त्या क्षेत्राचा समावेश निर्णय देण्यात केला जातो.

ही क्षेत्रीय विभागणी आपल्याला विशिष्ट आर्थिक पद्धतीची निर्मिती करायला भाग पाडते.

(क) उदा – १ अर्थव्यवस्थेचे पहिले स्वरूप.

स्व. गु–ब. उ.–स्व. रो.

अर्थव्यवस्थेचे दुसरे स्वरूप

(१) गु. न.–ब. न.–रो. न.


(२) स्व. गु.–ब. उ.–स्व. रो.

अर्थव्यवस्थेचे तिसरे स्वरूप

(१) गु. न.–ब. क.–रो. न. आणि


(२) क. गु.–ब. न.–रो. इ.

आलेख क्र. २




आलेख २ मधील उदाहरणे निराळ्या स्वरूपात आलेख तीन मध्ये दाखविली जाऊ शकतात. उदा. १ आलेख ३. (१) चे प्रतिनिधित्व करते. स्वतः रोजगारीत आहेत असे उत्पादक त्यांच्या निर्णयाद्वारे बचत निर्माण करतात. त्याची विभागणी उपभोग, बचत व बचतीचा भांडवली वस्तू निर्माण करण्यासाठी उपयोग केला जातो. त्याचा समावेश रॉबिन्सन क्रुसोच्या आर्थिक व्यवहारात, घरगुती उत्पादनापासूनचे (उत्पन्न) उत्पादन बचत व गुंतवणूक निर्माण करतात. ह्यांना योग्य शब्दात सांगावयाचे झाल्यास आर्थिक व्यवहाराचा गाभा म्हणता येईल. उदा–२ आलेख ३ (२) हे समाजवादी अर्थव्यवस्थेत केन्द्राद्वारे संघटित केलेले त्यात गुंतवणूक करणारे, बचत न करणारे आणि रोजगार न देणारे यांचाही समावेश करण्यात येतो. हे कामगार उपभोक्त्याचे क्षेत्र आहे. दुसरे क्षेत्र म्हणजे ज्यात राज्य रोजगार देते त्यात अन्य बचत करतात आणि त्याचा उपयोग गुंतवणुकीसाठी करतात. ह्या सर्वांचा आर्थिक विकासावर परिणाम होतो. हे आलेख ३ मध्ये दर्शविले आहे. किन्सनी याचा समावेश

आलेख क्र. ३




(१) (२) (३)

दोन क्षेत्रात केला आहे. (अ) कौटुंबिक क्षेत्र (ब) साहसी क्षेत्र. यात समाजवादी व किन्सचे अर्थशास्त्र यांचा समावेश आहे. आर्थिक विकासासाठी नियोजनात दोन भिन्न भागांचा एकमेकाच्या संबंधावरून समावेश केला आहे. पहिल्या भागात रोजगार, बचत व गुंतवणूक यांचा विकासावर होणारा परिणाम तसेच त्यांचा आपसातील संबंध. तसेच दुसरे म्हणजे त्याचे अमलात आणण्यासाठी कौशल्याचा विकास करणे या दोहोंचा आर्थिक नियोजनात वापर केला जातो. या दोन दृष्टिकोणातून समाजवादी व किन्सीयन नियोजनातील प्रश्नांचा विचार करण्यात आला आहे. समाजवादी अर्थव्यवस्थेचे विकासाच्या सर्व क्रियांवर मौद्रिक स्वरूपाचे (Monestic) नियंत्रण असते. विकासाची इच्छा व त्यानुसार प्रत्यक्ष प्रबंधन यंत्रणा (Administrative Machinery) ह्याची भारतीय नियोजनात कमतरता आहे. आलेख ३ (३) मध्ये दर्शविलेला निर्णय (बचत निर्णय) एका क्षेत्रावर केला जातो व बाकीचे दोन रोजगार व गुंतवणूक निर्णयाचा विचार दुसऱ्या क्षेत्रात केला जातो. अशा स्थितीत 'नियोजन' केवळ तांत्रिक प्रक्रिया असते. आणि आर्थिक विकास प्रत्येक क्षेत्रानी ठरविल्याप्रमाणे होत नाही. विकासासाठी बचत आवश्यक. विकासाच्या प्रयत्नांचा परिणाम एकंदर वाढीपेक्षा दीर्घ स्वरूपाच्या मंदीवर पडतो.

**मिश्र अर्थव्यवस्था**

भारताची मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे समाजवादी व किन्सची अर्थव्यवस्था यांचे मिश्रण आहे. याला पुष्टी देणारे आपले अर्थशास्त्रज्ञ, आपले राजकीय पक्ष यांनी सखोल विवेचन करून अंमलबजावणीसाठी योग्य प्रतिसाद द्यायला हवा. भारतीय अर्थव्यवस्था निर्भेळ असावी. सध्याशी असलेली सरकारी क्षेत्र व खाजगी क्षेत्रातील खेचातानी ताबडतोब बंद व्हावी.

आपल्या नियोजनाची शोकांतिका सांगावयाची झाल्यास योजना म्हणजे वैचारिक सभ्य युद्धातील एक शस्त्र होय. याचा दोष राजकारणी पुरुषाकडेच आहे. कारण शक्तीचा उपयोग वैचारिक साम्यावस्था निर्माण करण्यासाठी करतात. परंतु त्या सर्वाहून अधिक दोष आपल्या देशातील अर्थशास्त्रज्ञांना द्यावा लागेल. कारण मिश्र अर्थव्यवस्थेचा फोलपणा समजावून सांगण्यास ते असमर्थ ठरले. राजकारणाचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर नियंत्रण आहे. खाजगी व सरकारी क्षेत्राचा ढाचा पाश्चात्त्यांकडून घेतला. तेथील परिस्थिती व भारताची परिस्थिती सर्वथा भिन्न असल्यामुळे मिश्र अर्थव्यवस्था देशाचा खरा विकास घडवू शकेल याची खात्री देता येत नाही.

**वैचारिक दिशाभूल**

देशातील दैन्यावस्था मिश्र अर्थव्यवस्थेद्वारे दूर करण्यास अक्षमता दिसून आली आहे. आपल्या निश्चित रुढीवादी आर्थिक पद्धतीचा विचार केलेला नाही. भारतीय मिश्र अर्थव्यवस्था अर्थशास्त्रज्ञांच्या मतापेक्षा भिन्न आहे. त्यामुळे आर्थिक महत्त्व गमविले आहे ! हे म्हणणे सयुक्तिक आहे काय ?

ह्याचे उत्तर आपण या पद्धतीत ज्या अस्त्राचा उपयोग केला आहे त्याच्या समजुतीवर अवलंबून आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप व तिची पूर्वीपासूनची कौटुंबिक अंमलबजावणी यांचा विचार केल्यास उत्पादनाच्या मात्रेत ८० ते ९० प्रतिशत एककांचे उत्पन्न स्वतः रोजगार करून, प्रत्यक्ष गुंतवणूक करून, त्यांच्या स्वतःच्या बचतीतून केले जाते असेच आढळून येईल.

**बचतीचे स्वरूप**

गुंतवणुकीची संधी असेल तेव्हा बचत केली जाते. असे Gravin Friend व B. Kravis यांनी म्हटले आहे. Houthakkar यांनी उद्योगपतीच्या उत्पन्नापैकी स्वाभाविक बचतीची प्रवृत्ती मजुराच्या उत्पन्नापेक्षा जास्त असते कारण उद्योगपतीला प्रत्यक्ष गुंतविण्याची बरीचशी साधने उपलब्ध असतात. मद्रास शहरात मागच्या वर्षी जे सर्वेक्षण करण्यात आले त्यात स्वतः गुंतवणारे व्यापारी व्यापारात प्रत्यक्ष गुंतवणूक करून विस्ताराचे धोरण स्वीकारतात. ते भौतिक संपत्तीत विनियोजन करतात आणि ते जास्त बचत करतात. उपभोग कमी करून प्रत्यक्ष बचत करू शकतात. बचतीच्या गुंतवणुकीचा विचार करता आपल्या आर्थिक विकासाचे महत्त्व योग्य रीतीने समजावून घेतलेले दिसत नाही. तसेच समाजवादी व किन्सची पद्धती यांचे चमत्कारिक व धोक्याचे मिश्रण करण्यात राजकीय स्वार्थ व अज्ञान प्रामुख्यानी दिसतो. आपल्या आर्थिक नीतीचा विकास करण्याच्या दृष्टीनी गती वाढविण्यासाठी खालील तीन मुद्यांचा विचार अनिवार्य आहे. (१) आर्थिक विकासात गुंतवणूक वाढविणे. (२) गुंतवणुकीचे उद्योगात प्रमाण दर्शविणे व निश्चित करणे. (३) गुंतवणुकीचे विभाजनात सरकारी व खाजगी क्षेत्र यात बदल करणे. भारतातील एक अर्थशास्त्रज्ञ श्री. महालनोबीस म्हणतात—"विनियोजनासाठी वित्तीय स्रोत वाढविण्यासाठी आपले सैद्धतिक आदर्श विशिष्ट मार्गदर्शन करू शकत नाहीत. . . . आजच्या स्थितीत प्रयोगात्मक उपायांचा उपयोग करणे आवश्यक आहे. मौद्रिक नक्कल व तिचा पुरेपूर उपयोग वित्तीय तज्ज्ञांवर अवलंबून आहे. प्रत्यक्षपणे खऱ्या सिद्धांताद्वारे भौतिक स्वरूपात साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी राजकोषीय नीतीत आवश्यक ते कमीजास्त बदल केले जातात."

**निर्णयस्वातंत्र्य**

समाजवादी व किन्सची पद्धती यांचा विचार मिश्र अर्थव्यवस्थेत केलेला आहे. वास्तविकता, उपभोग व गुंतवणूक हे स्वतंत्र निर्णय आहेत. परंतु आजच्या आर्थिक पद्धतीत दुसऱ्या बाजूनी हे निर्णय स्वतंत्र नाहीत. आपल्या योजना मूलभूत चुकीच्या सिद्धांतावर आधारित आहेत. त्यामुळे गोंधळ निर्माण झाला आहे. कारण (१) गुंतवणूक वाढविण्यासाठी खाजगी कारखानदारांनी न वाटलेला फायदा उपयोगात आणून (२) सरकारी योजनांद्वारे न वाटलेला फायदा केवळ खाजगी कारखानदारच आणू शकतात. भांडवलाचे केन्द्रीकरण व वैत्तिक अधिकार प्रगतीला चालना देऊ शकत नाही. परंतु हे समाजवादी समाजरचना असलेल्या भारताला विसंगत आहे.

**दोन तर्कशुद्ध पद्धती**

केन्द्रीभूत गुंतवणुकीचे तत्त्व योजनांत स्वीकारले त्यासाठी ५० ते ६०% बचत हवी होती पण प्रत्यक्षात २०% पेक्षाही कमी होती त्यामुळे तुटीचे अर्थप्रबंधन दुसऱ्या योजनेत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करावे लागले. तिसऱ्या योजनेत तर गुंतवणुकीच्या योजना निष्फळ ठरल्यात. स्वगुंतवणूक क्षेत्र स्फितीयुक्त स्थितिपेक्षाही जास्त वाढले. विदेशी विनिमयाची स्थिती कशी झाली याचे प्रत्यक्ष परिणाम बघायला मिळतात. सरकारनी प्रत्ययनियंत्रण, भौतिक नियंत्रणाला सुरुवात केली. त्याचबरोबर अपसरणालाही सुरुवात झाली. त्याचबरोबर उपभोक्तांच्या मागणीचा भडका उडाला त्यामुळे अपसरण स्फितीयुक्त आहे असे म्हणावे लागेल,